


सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सदाफुलीसह

लातूर | बुधवार, २७ मे २०२६ | वर्ष ४ थे अंक ७९ | पाने १२+८ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## महत्त्वाचे

### कर्जमाफी योजनेला निवडणूक आयोगाची मंजुरी

**मुंबई :** विधानपरिषद निवडणुकीमुळे लागू झालेल्या आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर कर्जमाफीची प्रक्रिया रखडण्याची चर्चा सुरू होती. मात्र केंद्रीय निवडणूक आयोगाने या योजनेला मंजुरी दिल्याने कर्जमाफीच्या अंमलबजावणीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे ३० जूनपूर्वीच शेतकऱ्यांच्या खात्यात दिलासा पोहोचण्याची शक्यता वर्तवली जात आहे. महाराष्ट्रात सध्या विधान परिषदेची धूम सुरू आहे. त्यामुळे राज्यात निवडणूक आदर्श आचारसंहिता लागू आहे. त्यामुळे राज्य सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफीचा निर्णय या आचारसंहितेत अडकण्याची शक्यता होती.

# अबब! दिवसाढवळ्या ७० झाडांची कत्तल; ५ ट्रक लाकडाची विक्री

- सलगरवाडी परिसरातील घटना
- प्रत्येकी एक लाख रुपयांचा दंड
- उद्यान विभाग, वनविभाग प्रशासनाकडून पंचनामा

**तभा वृत्तसेवा । राजाराम मस्के**

**सोलापूर, दि. २६ मे-**

सोलापूर महानगरपालिका हद्दीतील सलगरवाडी परिसरात ५४ मीटर रोडलगत असलेल्या ८ हेक्टर शेतजमिनीतील ३० ते ५० वर्षे वयाची पिंपळ, जांभूळ, आंबा व बहुतांश लिंब जातीची सुमारे ७० झाडे दिवसाढवळ्या तोडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. प्रशासनाने प्रति झाडास





१ लाख रुपयांचा दंड ठोठावला. दरम्यान, प्लॉटिंगसाठी जागा रिकामी करणेसाठी गेल्या दहा दिवसांत ही झाडे तोडून सुमारे पाच ट्रक लाकूड विक्री केल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, संबंधित शेतमालकाबाबत विचारणा केली असता कोणीही स्पष्ट माहिती देण्यास पुढे आले नाही.

याबाबत उपवनसंचालक कार्यालयाशी संपर्क साधला असता त्यांनी महानगरपालिका उद्यान विभागाशी संपर्क साधण्यास सांगितले. उद्यान प्रमुख कोमल काशीद यांनी वृक्ष प्राधिकरण विभागातील दिलीप बेंबरे यांना माहिती देण्यास सांगितले. दिलीप बेंबरे यांनी तत्काळ स्पॉट व्हिजिट करून पाहणी करण्याचे सांगितले होते. मात्र सायंकाळपर्यंत त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. उद्यान प्रमुख कोमल काशीद यांनी मच्छिंद्र गेंजगे व हलसंगी यांना घटनास्थळी पाठविले. महापालिका आयुक्तांशी संपर्क साधण्याचाही प्रयत्न करण्यात आला, मात्र संपर्क होऊ शकला नाही.

महापौर विनायक कोंड्याल यांनाही सदर विषयी कल्पना दिली असता कठोर कार्यवाई महानगरपालिकेकडून करण्यात येईल, असे सांगितले. दरम्यान, महेश देवकर या पर्यावरणप्रेमीने चक १३ उग ९०४७ हे वाहन अडवून ठेवत वनविभाग व पोलिसांना माहिती दिली. वनविभागाच्या शिंदे यांनी रात्री उशिरापर्यंत पंचनामा केला. यावेळी कोमल काशीद, दिलीप बेंबरे, मच्छिंद्र जमादार, सोमशंकर हलसंगी, सिद्राम बोराडे, विठ्ठल यातकर, यल्लप्पा पुजारी, मनोज सरवदे आदी उपस्थित होते. पोलिस उपनिरीक्षक सुरज कोतवाल व त्यांच्या सहकाऱ्यांनीही घटनास्थळी पाहणी केली.

(पुढील वृत्त पान २ वर)

# अनैसर्गिक लोकसांख्यिकीय बदलांच्या अभ्यासासाठी समिती

- घुसखोरीवर केंद्राची कठोर भूमिका
- न्या. प्रकाश नावलेकर अध्यक्षपदी

**नवी दिल्ली, २६ मे**

बेकायदेशीर स्थलांतर आणि इतर अनैसर्गिक कारणांमुळे संपूर्ण भारतात होत असलेल्या लोकसांख्यिकीय बदलांचे सर्वंकष मूल्यमापन करण्यासाठी केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती प्रकाश प्रभाकर नावलेकर यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली, अशी माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मंगळवारी दिली.

घुसखोरी आणि इतर कारणांमुळे होणारे अनैसर्गिक लोकसांख्यिकीय बदल कोणत्याही देशाच्या वर्तमान आणि भविष्यासाठी एक मोठे आव्हान असते. या आव्हानाचा सामना करण्यासाठी १५ ऑगस्ट २०२५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसांख्यिकीय बदलांवर उच्चस्तरीय समिती स्थापन केली जाईल, अशी घोषणा केली होती. सरकारने या समितीची स्थापना केली असल्याची घोषणा करताना मला अत्यानंद होत असल्याचे अमित शाह यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले. लोकसंख्येतील असामान्य बदलांमुळे सार्वभौमत्वासोबतच राष्ट्रीय सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था, सामाजिक संरचनेत गंभीर बदल होतात तसेच आदिवासी समाजाच्या संरक्षणाशी संबंधित ही एक अत्यंत गंभीर समस्या आहे. देशातील नागरिकांच्या कल्याणासाठी सरकारने लोकसांख्यिकीय बदलांवर उच्च अधिकार असलेले एक अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतलेला आहे. घुसखोर देशातील बहिणी-मुलींना लक्ष्य करीत आहेत.

सीमावर्ती भागात लोकसांख्यिकीय बदल होतात, त्यावेळी देशाच्या सुरक्षेवर संकट येते. आज मला एका चिंतेबाबत आणि एका आव्हानाबाबत देशाला सावध करायचे आहे. एका सुनियोजित कारस्थानाद्वारे देशाची लोकसांख्यिकी बदलली जात आहे. एका नव्या संकटाची बीजे रोवली जात आहेत. हे घुसखोर माझ्या देशातील तरुणांचा रोजगार हिरावून घेत आहेत, माझ्या देशातील भगिनींना आणि कन्यांना लक्ष्य करीत आहेत. हे घुसखोर आदिवासी समाजाच्या घरांमध्ये घुसखोरी करीत आहेत आणि त्यांच्या जमिनी बळकावत आहे.

हा देश हे कदापि सहन करणार नाही, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट २०२५ रोजी म्हटले होते. सुनियोजित, कालबद्ध पद्धतीने तोडगा काढणार ही समिती घुसखोर आणि इतर अनैसर्गिक कारणांमुळे भारतात होत असलेल्या लोकसांख्यिकीय बदलांचे व्यापक मूल्यांकन करेल आणि धार्मिक तसेच सामाजिक समुदायांच्या पातळीवर अनैसर्गिक लोकसंख्या बदलांच्या पद्धतीचे विश्लेषण करेल. केवळ इतकेच नव्हे, तर यावर कालबद्ध पद्धतीने तोडगा काढेल, असे अमित शाह यांनी सांगितले.

> **समितीतील सदस्य**
>
> न्या. प्रकाश प्रभाकर नावलेकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या या समितीत जनगणना आयुक्तांसोबत सेवानिवृत्त आयएएस अधिकारी दुर्गाशंकर मिश्रा, सेवानिवृत्त आयपीएस बालाजी श्रीवास्तव आणि डॉ. शमिका रवी यांचा समावेश आहे. गृह मंत्रालयाचे संयुक्त सचिव या समितीचे सदस्य सचिव राहतील.

## शाळा आठवड्यातून तीन दिवस ठेवा

**मुंबई :** राज्यात पेट्रोल-डिझेल वाढत्या दरांमुळे शाळेच्या बस आणि व्हॅन चालकांवर मोठे आर्थिक संकट ओढावले असून, त्याचा थेट परिणाम शालेय शिक्षण व्यवस्थेवर होण्याची शक्यता आहे.

पुढील महिन्यात शाळा सुरू होण्याच्या पृष्ठभूमीवर स्कूल बस संघटनांनी सरकारसमोर महत्त्वाची मागणी मांडली आहे. आठवड्यातून केवळ तीन दिवस शाळा सुरू ठेवाव्यात आणि उर्वरित दोन दिवस ऑनलाइन वर्ग घेण्यात यावेत, असा प्रस्ताव ठेवला आहे. स्कूल ॲण्ड कंपनी बस ओनर्स असोसिएशनने इंधनाच्या सातत्याने वाढणाऱ्या किमतींमुळे जुन्या दरात बससेवा चालवणे शक्य नसल्याचे स्पष्ट केले आहे.

# कर्नाटकात नेतृत्वबदल होणार

### सिध्दारामैया यांना मुख्यमंत्रिपद सोडण्याचे निर्देश

**नवी दिल्ली, २६ मे**

कर्नाटकमध्ये सिध्दारामैया यांना मुख्यमंत्रिपद सोडण्याचे निर्देश काँग्रेसच्या नेतृत्वाने दिल्याचे समजते. यामुळे कर्नाटकात आता नेतृत्वबदल अटळ झाला आहे. सध्या उपमुख्यमंत्री असलेले डी. के. शिवकुमार राज्याचे नवे मुख्यमंत्री असतील, असा अंदाज आहे, कर्नाटकातील नेतृत्वबदलाच्या मुद्यावर मंगळवारी दिल्लीत काँग्रेसमध्ये बैठकांचे सत्र झाले. त्यात काँग्रेसच्या नेतृत्वाने सिध्दारामैया यांना मुख्यमत्रिपद सोडण्यास सांगितले आहे. सिध्दारामैया यांना दिल्लीत पक्षसंघटनेत मोठे पद देण्याचे तसेच राज्यसभेत पाठवण्याचे आश्वासन देण्यात आल्याचे समजते. मात्र सिध्दारामैया यांना काँग्रेस नेतृत्वाचे हे निर्देश मान्य आहेत का, ते कोणतीही खळखळ



न करता मुख्यमंत्रिपद सोडतील का, हे स्पष्ट झाले नाही. तसे झाले नाही तर काँग्रेसमध्ये नवा पेचप्रसंग उदभवण्याची शक्यता नाकारता येत नाही. कर्नाटकमध्ये मुख्यमंत्री सिध्दारामैया यांच्या नेतृत्वातील काँग्रेसच्या सरकारला तीन वर्षपूर्ण झाले आहेत. कर्नाटकमधील विधानसभा निवडणुकीनंतर सिध्दारामैया यांना मुख्यमंत्री करतांना अडीच वर्षाचे सूत्र ठरले होते, असा उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांचा दावा आहे. त्यामुळे सिध्दारामैया यांना मुख्यमंत्रिपदावरुन हटवून आपल्याला मुख्यमंत्री करावे, असा शिवकुमार यांचा आग्रह आहे. तर असे कोणताही सूत्र ठरले नव्हते, असा सिध्दारामैया यांचा प्रतिदावा आहे.

## इंधन माफिया, साठेबाजांवर होणार कारवाई


**मुंबई :** राज्यात अचानक निर्माण झालेल्या पेट्रोल आणि डिझेलच्या कृत्रिम टंचाईमागे मोठा काळाबाजार आणि साठेबाजी सुरू असल्याचा दाट संशय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. सर्वसामान्यांच्या हक्काच्या इंधनावर डल्ला मारणाऱ्या या इंधन माफियांवर आता गृह विभाग आणि अन्न नागरी पुरवठा विभागामार्फत अत्यंत कठोर आणि संयुक्त कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये सध्या इंधनाची अभूतपूर्व टंचाई जाणवत आहे. मात्र, सरकारने सरासरीच्या तुलनेत पेट्रोलचा पुरवठा २३ टक्क्यांनी, तर डिझेलचा पुरवठा तब्बल ५२ टक्क्यांनी वाढवला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर



पुरवठा करूनही पेट्रोल पंप कोरडे कसे? असा सवाल उपस्थित होत आहे. काही जिल्ह्यांतील आकडेवारी तर अत्यंत धक्कादायक आहे. अकोला जिल्ह्यात इंधनाच्या मागणीत तब्बल १५४ टक्के इतकी अनैसर्गिक वाढ नोंदवली गेली आहे. तर छत्रपती संभाजीनगर, बीड, बुलढाणा, भंडारा, गोंदिया आणि हिंगोली यांसारख्या जिल्ह्यांमध्ये हे प्रमाण ७० टक्क्यांच्याही पुढे गेले आहे. या वाढत्या आणि संशयास्पद खपमागील मोडस ऑपरेंडी (काम करण्याची पद्धत) मुख्यमंत्र्यांनी उघड केली. ते म्हणाले की, सध्या सर्वसामान्य ग्राहकांसाठीच्या पेट्रोल-डिझेलच्या विक्रीत अचानक मोठी उसळी पाहायला मिळत आहे.







CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### निर्माणाधीन सेप्टिक टँकमध्ये गुदमरुन सहा जणांचा मृत्यू

**कालाहंडी** : ओडिशाच्या कालाहंडी जिल्ह्यात मंगळवारी एक धक्कादायक घटना घडली. निमार्णधीन सेप्टिक टँकमध्ये गुदमरून सुमारे सहा कामगारांचा मृत्यू झाला. ही घटना मदनपूर-रामपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील करियाखुंटा गावात घडली. यात जखमी एका व्यक्तीला उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निर्माणाधीन इमारतीमधील सेप्टिक टँकची पाहणी करताना बिल्डर चुकून टँकमध्ये पडला. दरम्यान, त्याला वाचवण्यासाठी कामावर असलेले काही जण टँकमध्ये उतरले. विषारी वायू किंवा ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे सर्वजण आतमध्ये बुशुद्ध पडले. माहिती मिळताच पोलिस आणि बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली आणि त्यांनी सर्वांना बाहेर काढून मदनपूर-रामपूर सामुदायिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी सहा जणांना मृत घोषित केले. मृतांमध्ये तीन गवंडी, एक मजूर, एक सेप्टिक टँक बांधणारा आणि त्याच्या मुलाचा समावेश आहे.

# ममता बॅनर्जींना बसणार झटका

## १२ खासदार भाजपात जाण्याच्या तयारीत

◆ **कोलकाता, २६ मे**

पंधरा वर्षे सत्तेत राहिल्यानंतर पश्चिम बंगालच्या जनतेने तृणमूल काँग्रेसला सत्तेवरून खाली खेचले. आता पक्षात अंतर्गत कलह सुरू झाले असून तृणमूल काँग्रेसमध्ये फूट पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कुंपणावर असलेले जवळपास १२ खासदार भारतीय जनता पार्टीत जाण्याची चिन्हे असल्याने ममता बॅनर्जींना मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे.

विधानसभा निवडणुकीत मोठा पराभव झाल्यानंतर तृणमूल काँग्रेसमध्ये अंतर्गत संघर्ष उफाळण्याची शक्यता आहे. लोकसभा खासदार काकोरी घोष दस्तीदार यांनी विधानसभा निवडणुकीतील पराभवाची जबाबदारी घेत बरासत जिल्हा संघटनात्मक पदाचा राजीनामा दिला. त्या लोकसभेत तृणमूलच्या मुख्य मुख्य प्रतोद होत्या. राजीनाम्यानंतर ममता बॅनर्जी यांनी त्यांची प्रतोपदावरून हकालपट्टी केली. या सर्व घडामोडीनंतर केंद्र सरकारने



त्यांना वाय दर्जाची सुरक्षा पुरविली आहे. काकोरी यांच्याबरोबरच आणखी काही खासदार पक्ष सोडण्याच्या तयारीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. वाय दर्जाची सुरक्षा पुरविणे म्हणजे त्या लवकरच पक्ष बदलणार असल्याचे बोलले जात आहे.

आपचे राज्यसभा खासदार यांना वाय दर्जाची सुरक्षा पुरविल्यानंतर लगेच ते भाजपात सामील झाले होते. झारखंड मुक्ती मोर्चाचे चंपाई सोरेन ऑगस्ट २०२४ मध्ये झेड दर्जाची सुरक्षा पुरविल्यानंतर तीन महिन्यांनी भाजपात आले. उत्तर प्रदेशातील समाजवादी पक्षाचे आमदार मनोज पांडेय यांनाही वाय दर्जाची सुरक्षा दिल्यानंतर ते योगी सरकारमध्ये मंत्री झाले आहेत. विशेष म्हणजे डिसेंबर २०२० मध्ये शुभेन्दू अधिकारी यांना झेड दर्जाची सुरक्षा मिळाल्यानंतर दुसऱ्याच दिवसी त्यांनी तृणमूलला सोडचिठ्ठी देत भाजपात प्रवेश केला होता. लोकसभेत तृणमूलचे २९ खासदार आहेत. ◂(वृत्तसंस्था)

### पक्षांतरविरोधी कायद्यापासून बचावासाठी २० खासदारांची गरज

तृणमूल काँग्रेसच्या खासदारांची संख्या पाहता पक्षांतरबंदी कायद्याच्या कचाट्यातून सुटण्यासाठी कमीत कमी २० खासदारांनी गट तयार करून भाजपात प्रवेश करण्याची गरज आहे. सध्या फुटणाऱ्या खासदारांचा आकडा १२ पर्यंत निश्चित मानला जात आहे. विशेष म्हणजे अभिषेक बॅनर्जी यांचे जवळचे मानले जाणारे खासदार वेगळे होण्याच्या विचारात असल्याचे बोलले जात आहे.

### तृणमूल एकसंघ ठेवण्याचे आव्हान

पक्षात फुटीची बीजे पेरल्या गेल्याची जाणीव ममता बॅनर्जी आणि अभिषेक बॅनर्जी यांना झाली आहे. शुभेन्दू अधिकारी यांनी अवैध बांधकामे आणि घुसखोरांविरोधातील बेधडक कारवाया पाहता तृणमूल काँग्रेसला येत्या काळात गळती लागण्याची भीती ममता बॅनर्जी यांना वाटत आहे. त्यामुळे पक्षातील संभाव्य फूट रोखण्याचे आव्हान ममता यांच्यासमोर आहे.

# व्होटबँकेच्या राजकारणासाठी मायबोलीशी तडजोड?

## महायुतीतील बड्या नेत्यांचा बैठकीवर अघोषित बहिष्कार

◆ **मुंबई, २६ मे**

मुंबईतील रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषेचे ज्ञान सक्तीचे करण्याच्या अत्यंत महत्त्वाच्या आणि संवेदनशील मुद्द्यावर परिवहन विभागाने आज बोलावलेल्या उच्चस्तरीय बैठकीकडे दोन बड्या नेत्यांनी जाणीवपूर्वक पाठ फिरवली आहे. काँग्रेसमधून शिवसेनेत आलेले नेते संजय निरुपम आणि रिक्षा-टॅक्सी युनियनचे भाजपावासी झालेले नेते शशांक राव यांनी या बैठकीला थेट दांडी मारल्याने राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे.

मुंबईत परप्रांतीय रिक्षा आणि टॅक्सी चालकांची वाढती संख्या, भाडे नाकारण्याचे प्रकार आणि प्रवाशांशी उडणारे खटके पाहता, सर्व चालकांसाठी स्थानिक मराठी भाषेचे ज्ञान सक्तीचे असावे, या नियमाची कडक अंमलबजावणी करण्याच्या हालचाली परिवहन विभागाने सुरू केल्या आहेत. याच अनुषंगाने आज सर्व संबंधित नेते, युनियन प्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक महत्त्वाची बैठक बोलावण्यात आली होती. मात्र, मुंबईतील उत्तर भारतीय मतदारांवर प्रभाव असलेले संजय निरुपम आणि बहुतांश अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांचे नेतृत्व करणारे शशांक राव यांनी या बैठकीला हजेरी न लावता मराठीच्या मुद्द्याला बगल दिल्याचे स्पष्ट झाले आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या बैठकीसाठी निरुपम आणि राव या दोघांनाही परिवहन मंत्रालयाकडून रीतसर निमंत्रण पाठवण्यात आले होते. त्यांच्या उपस्थितीत चालकांच्या अडचणी आणि मराठी सक्तीबाबत काही ठोस निर्णय घेण्याची सरकारची तयारी होती. मात्र, ऐन वेळी या दोघांनीही बैठकीला अघोषित बहिष्कार टाकत दांडी मारली. मुंबईत व्यवसाय करायचा असेल, तर इथली मायबोली मराठी आलीच पाहिजे, या भूमिकेवर राज्य सरकार ठाम असताना, या नेत्यांनी घेतलेला हा पळपुटेपणाचा पवित्रा त्यांच्या राजकीय आणि संघटनात्मक अडचणी उघड करत असल्याचे मंत्रालयातील सूत्रांचे म्हणणे आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

### रात्री उशिरा निमंत्रण, मी व्यस्त होतोः निरुपम

सदर बैठकीस अनुपस्थित राहिलेल्या संजय निरुपम यांना तरुण भारतने संपर्क केला असता त्यांनी आपली बाजू मांडली. ''बैठकीचे निमंत्रण मला रात्री खूप उशिरा आले. मी आधीच इतर ठिकाणी व्यस्त होतो आणि तिथे माझी कमिटमेंट होती. त्यामुळे या बैठकीला जाऊ शकलो नाही,'' असे उत्तर निरुपम यांनी दिले. दरम्यान, शशांक राव यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

# ५० हजारांपर्यंत पीक कर्ज माफ

**तामिळनाडुतील शेतकऱ्यांना होणार फायदा**

◆ **चेन्नई, २६ मे**

तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी शेतकऱ्यांसाठी एक मोठे पाऊल उचलले आहे. सोमवारी थलपथी विजय यांनी तामिळनाडूतील अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी सहकारी बँकांकडून घेतलेल्या ५०,००० रुपयांपर्यंतच्या पीक कर्जमाफीची घोषणा केली. राज्यातील मोठ्या शेतकऱ्यांचे ५,००० रुपयांपर्यंतचे पीक कर्जही माफ करण्यात आले. या निर्णयामुळे राज्यातील १४.२२ लाख शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. या निर्णयामुळे सरकारी तिजोरीवर २,०४४ कोटी रुपयांचा आर्थिक भार पडणार आहे.

तामिळनाडूचे मुख्यमंत्री विजय यांच्या नेतृत्वात सचिवालयात एक आढावा बैठक झाली. बैठकीदरम्यान, कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री आर. विनोद, सहकार मंत्री व्ही. गांधीराज, वित्त, नियोजन आणि विकास मंत्री एन. मारिया विल्सन आणि इतर विभागीय अधिकाऱ्यांशी सल्लामसलत करून शेतकऱ्यांच्या पीक कर्जमाफीच्या मुद्द्याचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

सरकारने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सरकारी कर्जमाफी योजनांसाठीच्या आदर्श कार्यान्वयन मार्गदर्शक तत्त्वांनुसार हे पाऊल उचलले आहे. या मार्गदर्शक तत्त्वांनुसार सरकारने संपूर्ण पीक कर्जमाफीची रक्कम ४५ ते ६० दिवसांच्या आत वितरित करणे बंधनकारक आहे. या आव्हानात्मक परिस्थितीतही मुख्यमंत्र्यांनी १ मे २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत शेतकऱ्यांनी सहकारी बँकांकडून घेतलेली पीक कर्जे माफ करण्याचे आदेश जारी केले आहेत. ◂(वृत्तसंस्था)

# बस उलटून सात ठार

◆ **उन्नाव, २६ मे**

दिल्लीहून गोरखपूरला जाणारी एक खाजगी स्लीपर बस उन्नाव जिल्ह्यातील लखनौ-आग्रा द्रुतगती मार्गावर उलटली. या अपघातात उपनिरीक्षकासह सात प्रवाशांचा मृत्यू झाला. तर तीन पोलिसांसह चोवीस प्रवासी जखमी झाले. ही घटना मंगळवारी पहाटे ५ वाजता घडली.

या स्लीपर बसमध्ये एकूण ५२ प्रवासी होते. जास्त वेगामुळे चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस एका पुलाला धडकून उलटली. अपघातानंतर बस सुमारे १०० मीटरपर्यंत घसरत गेली. यामुळे प्रवाशांमध्ये घबराट पसरली. सुमारे अर्ध्या तासानंतर यूपीडीएचे कर्मचारी आणि पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी बचाव व मदतकार्य सुरू केले. जखमींना रुग्णवाहिकेने सर्वप्रथम सेंट्रल हेल्थ सेंटर येथे नेण्यात आले. तिथे थमोपचारानंतर गंभीर जखमी २४ जणांना लखनौ ट्रॉमा सेंटरमध्ये दाखल करण्यात आले. ◂(वृत्तसंस्था)

# भारताची ‘आत्मनिर्भर’तेकडे झेप : मुख्यमंत्री

## ‘राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती’ विशेष ग्रंथाचे प्रकाशन

◆ **मुंबई, २६ मे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने गेल्या १२ वर्षांत देशाचा कायापालट केला असून, कधीकाळी याचकाच्या भूमिकेत असणारा भारत आज जगात स्वाभिमानाने आणि आत्मनिर्भर भारत म्हणून ताठ मानेने उभा आहे, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधानपदाच्या १२ वर्षांच्या यशस्वी वाटचालीवर आणि राष्ट्रविकासावर आधारित राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती या विशेष संग्राह्य ग्रंथाच्या (कॉफी टेबल बुक) प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते.




हा कार्यक्रम महाराष्ट्र भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्या संकल्पनेतून साकारण्यात आला. याप्रसंगी मंत्री मंगलप्रभात लोढा, मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार अमित साटम, आमदार निरंजन डावखरे, संजय कुटे, योगेश सागर, सुनील राणे, सरचिटणीस राजेश पांडे यांच्यासह माध्यम क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मराठी आणि हिंदी अशा दोन्ही भाषांमधील ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. आपल्या भाषणात मुख्यमंत्र्यांनी गेल्या १२ वर्षांतील देशाच्या प्रगतीचा विस्तृत आलेख मांडला.

**पायाभूत सुविधांची क्रांती आणि लष्करी सक्षमीकरण**

पायाभूत सुविधांच्या विकासावर भर देताना फडणवीस म्हणाले की, देशाचा लॉजिस्टिक खर्च १६ टक्क्यांवरून ११ टक्क्यांवर आला असून तो ८ टक्क्यांवर आणण्याचे ध्येय आहे. यामुळे जागतिक पुरवठा साखळीत भारत चीनलाही मागे टाकेल. तसेच, महाराष्ट्रातील वाढवण बंदर हे पूर्ण झाल्यानंतर जगातील टॉप १० बंदरांपैकी एक ठरेल आणि भारताला पुढील ३० वर्षे मेरीटाइम पॉवर (सामुद्रिक शक्ती) म्हणून जागतिक स्तरावर पुढे नेईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ◂(तभा वृत्तसेवा)

### जीएसटी आणि डिजिटल इंडियाचे यश

जीएसटीमुळे महाराष्ट्र देशात अव्वल ठरला असून, राज्याचे महसूल संकलन विक्रमी २ लाख ७५ हजार कोटींवर गेले आहे. यूपीआय प्रणालीचे आज ब्राझीलसह जगभरातील २५ देश अनुकरण करत असून, थेट लाभ हस्तांतरणामुळे (डीबीटी) तळागाळातील भ्रष्टाचार पूर्णपणे संपुष्टात आला आहे. पूर्वी दिल्लीतून पाठवलेल्या एका रुपयातील केवळ १५ पैसे गरिबांपर्यंत पोहोचायचे, आता मात्र १०० टक्के रक्कम थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.



# अबब! दिवसाढवळ्या ७० झाडांची...

पान १ वरुन...

### पर्यावरणप्रेमींमध्ये संताप

सोलापुरात सध्या उन्हाचा पारा ४४ अंशांपर्यंत पोहोचला असताना जनावरे, पशुपक्षी आणि नागरिकांना सावली देणारी मोठी झाडे दिवसाढवळ्या तोडली जात असल्याने पर्यावरणप्रेमींमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

### वृक्षतोडीसाठी शासकीय नियम काय?

महाराष्ट्रात झाडतोडीसाठी विशिष्ट शासकीय नियम व निकष लागू आहेत. झाडाचा प्रकार, जागा आणि झाड तोडण्यामागील उद्देश यावर परवानगी अवलंबून असते. खाजगी शेतातील झाडे तोडण्यासाठी वनविभाग, तहसील कार्यालय, ग्रामपंचायत किंवा नगरपालिका यांची पूर्वपरवानगी आवश्यक असते. अर्ज केल्यानंतर संबंधित विभागाकडून तपासणी केली जाते व आवश्यक असल्यासच परवानगी दिली जाते. वड, पिंपळ, आंबा, साग, चंदन यांसारख्या झाडांसाठी विशेष निकष लागू असतात. एका झाडाच्या बदल्यात ठराविक नवीन झाडे लावणे बंधनकारक असते. विना परवानगी वृक्षतोड केल्यास दंड, गुन्हा दाखल होणे तसेच पर्यावरणीय नियमांनुसार कठोर कारवाईची तरतूद आहे. प्लॉटिंगसाठीदेखील नॉन-ॲग्रीकल्चर (छ), ले-आउट मंजुरी आणि पर्यावरणीय अहवाल आवश्यक असतो.

### खूप चुकीचं आणि वेदनादायी

माझ्या प्रभागात जर असे झाले असेल तर ते खूप चुकीचं आणि वेदनादायी आहे.आम्ही आमच्या प्रभागात जागा उपलब्ध असलेल्या ठिकाणी नवीन झाडे लावण्याचे काम कित्येक वर्षांपासून करतो आहे. झाडे तोडणारे कोणीही असो विनापरवानगी झाडे तोडली असतील तर संबधितवर नियमानुसार मालक व झाडे तोडणारे कामगार यांच्यावर कडक कार्यवाही केली पाहिजे, असे नगरसेविका आरती वाकसे यांनी सांगितले.

### बिल्डरांची चौकशी; वृक्षतोडीचा छडा

आम्ही घटनास्थळी पोहोचलो माहिती घेतली असता १० दिवसांपासून झाडी तोडली जात असल्याचे सांगण्यात आले. आजतागायत ४ ट्रक भरुन लाकडे नेली आहेत. आज आम्ही एक ट्रक पकडला. उपमहापौर देवकर यांनीही घटनास्थळाची पाहणी केली. आपल्या शक्तीचा वापर करुन विनापरवाना वृक्षतोड करणाऱ्या मोठ्या बिल्डरांची चौकशी व्हावी अशी प्रशासनास विनंती आहे. वृक्षतोडीचा छडा लावण्याच्या अनुषंगाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असे पर्यावरण दूत डॉ.मनोज देवकर यांनी सांगितले.

# अमेरिकेचा इराणवर हल्ला

## संघर्षविरामाला गालबोट; क्षेपणास्त्र तळ उद्ध्वस्त



◆ **दुबई, २६ मे**

अमेरिका-इराणमध्ये शांतता करारासाठी वाटाघाटी सुरू असताना आणि अनिश्चितकाळासाठी दोन्ही देशात संघर्षविराम लागू असताना अमेरिकेने मंगळवारी पहाटे इराणच्या लष्करी तळांवर आणि नौकांवर भीषण हवाई हल्ले चढविले. अमेरिकन सैनिक आणि युद्धनौकांच्या सुरक्षेसाठी ही मोठी कारवाई करण्यात आल्याचे अमेरिकन सेंट्रल कमांडने म्हटले आहे. दरम्यान, अमेरिकेचे हे हल्ले मर्यादित स्वरूपाचे होते. इराणसोबतचा वाद अधिक वाढवण्याचा अमेरिकेचा कोणताही हेतू नाही आणि या कारवाईचा अर्थ युद्धविराम संपला असा घेतला जाऊ नये, असे अमेरिकन प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

होर्मुझच्या सामुद्रधुनीत सागरी सुरुंग पेरणाऱ्या इराणी नौका आणि क्षेपणास्त्र प्रक्षेपण केंद्रांना लक्ष्य करत अमेरिकेने हा हल्ला चढवला. सेंटकॉमचे प्रवक्ते कॅप्टन टिम हॉकिन्स यांनी जारी केलेल्या पत्रकात म्हटले की, अमेरिकन सैन्याने दक्षिण इराणमध्ये स्वसंरक्षणार्थ हे हवाई हल्ले केले. इराणकडून निर्माण झालेला धोका नष्ट करण्यासाठी ही कारवाई करणे भाग होते.

सध्या सुरू असलेल्या संघर्षविरामाचे अमेरिका पालन करत आहे, मात्र आपल्या सैनिकांच्या सुरक्षेसाठी कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. सोमवारी रात्री इराणच्या रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स च्या दोन नौका होर्मुझमध्ये समुद्री सुरुंग पेरताना आढळून आल्या. अमेरिकन गुप्तचर यंत्रणांनी हा प्रकार टिपताच अमेरिकन नौदल आणि वायुदलाने तातडीने संयुक्त कारवाई केली. अवघ्या काही मिनिटांतच अमेरिकेने या दोन्ही इराणी नौका समुद्रातच उद्ध्वस्त केल्या. ◂(वृत्तसंस्था)

**इराणचाही प्रतिहल्ला**

### अमेरिकेचे महागडे एमक्यू-९ ड्रोन उद्ध्वस्त

◆ **तेहरान, २६ मे**

अमेरिकेने होर्मुझ सामुद्रधुनीत इराणच्या नौका आणि बंदरावर केलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर देत इराणने अमेरिकी वायुदलाचे एमक्यू-९ ए रिपर ड्रोन नष्ट केले. याशिवाय एफ-३५ लढाऊ विमानाला इराणी हवाई हद्दीतून हाकलून लावण्यात यश आल्याचा दावा इराणच्या इस्लामिक रिव्हाल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने (आयआरजीसी) केला आहे.



इराण-अमेरिकेत शांतता करारासाठी वाटाघाटी सुरू असताना होर्मुझमध्ये अमेरिकेने इराणच्या नौका आणि एका बंदरावर हल्ले चढवले. याला प्रत्युत्तर म्हणून आयआरजीसीने क्षेपणास्त्र आणि ड्रोनने अमेरिकेच्या वायुदलावर प्रहार केला. यात अमेरिकेचे एमक्यू ९ ए रिपर ड्रोन नष्ट झाले, याची किंमत ३० मिलियन डॉलर्स आहे. याशियाव आरक्यू ४ ड्रोन हवेतच उधळण्यात आले, तर एफ-३५ लढाऊ विमानाला इराणच्या हद्दीतून बाहेर काढण्यास भाग पाडल्याचाही दावा आयआरजीसीने केला आहे. ◂(वृत्तसंस्था)

# सोन्याचे दागिने, रोख रक्कम घेऊन नववधू पसार

**मंगळवेढा, दि. २६ मे-**

बावची येथे एका नवविवाहित तरुणीने तीन महिने संसार करुन रोख रक्कम व सोन्याचे दागीने घेवून निघून गेल्याचा प्रकार घडला आहे. याप्रकरणी अश्विनी मारुती दानोळे (रा. देवरुख जि.रत्नागिरी) युवराज कांबळे, पिंटू उर्फ नाना कोळेकर, शिवाजी गंगाराम कोळेकर (सर्व रा.रड्डे) यांच्या विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. यातील फिर्यादी नामदेव सुखदेव जाधव (रा.बावची,वय ३८) याचे लग्न अश्विनी हिचे सोबत जमविण्याकरिता १ लाख ५० हजार रुपये रोख रक्कम घेवून ३ महिने संसार करुन घरातून फिर्यादीच्या आईचे दीड तोळे वजनाचे गंठण, रोख तीन हजार रुपये घेऊन देवरुख जि.रत्नागिरी येथे निघून गेली. तिचे पुर्वी लग्न झाले असून तिला पहिल्या पतीपासून एक मुलगी असल्याचे पिंटू कोळेकर, शिवाजी कोळेकर, युवराज कांबळे यांना माहिती होती.

# सामाजिक प्रतिष्ठेसाठी मुलीला ढकलतात मृत्यूच्या दारात

## सर्वोच्च न्यायालयाची पालकांच्या वर्तनावर टिप्पणी; आरोपी पतीला जन्मठेप

◆ **नवी दिल्ली, २६ मे**

मुलीचा संसार कसातरी टिकावा, या चिंतेपोटी पालक अनेकदा तिला मृत्यूच्या खाईत ढकलतात. सासरच्या छळाबाबत मुलीने वारंवार तक्रार करूनही, केवळ सामाजिक प्रतिष्ठेसाठी तिला पुन्हा सासरी पाठवले जाते, असे निरीक्षण हुंड्यासाठी पत्नीची हत्या करणाऱ्या आरोपी पतीला जन्मठेपेची शिक्षा सुनावताना सर्वोच्च न्यायालयाने नोंदविले.

देशभरात हुंडाबळीच्या वाढत्या घटनांबद्दल चिंता व्यक्त करीत सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाच्या निकालाची सुरुवातच समाजाला विचार करायला लावणाऱ्या एका प्रश्नाने केली. न्या. पी. के. मिश्रा आणि न्या. के. व्ही. विश्वनाथन यांच्या न्यायासनाने विचारले, सोमा आचार्यचा जीव वाचवता आला असता का? केवळ



सामाजिक बदनामीच्या भीतीने आपण सोमाला लांडग्यांच्या स्वाधीन केले का?

सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्याच्या वकिलाने सांगितले की, मृत सोमाने तिच्यावर होणाऱ्या छळाबाबत वारंवार आपल्या पालकांना सांगितले होते. परंतु घरातील वडीलधाऱ्यांनी पती-पत्नीत समेट घडवून आणला आणि तिला पुन्हा सासरी पाठवले.

यावर न्या. विश्वनाथन म्हणाले, सोमाने वाचवण्यासाठी आई-वडिलांकडे वारंवार विनवणी केली. ती माहेरी येऊन काही दिवस राहिलीही होती. परंतु, जेव्हा जेव्हा तिने होणाऱ्या छळाबद्दल सांगितले तेव्हा केवळ तडजोड करून तिला परत सासरी पाठवण्याचेच प्रयत्न झाले, हा प्रकार निश्चितच दुर्दैवी आहे. ◂(वृत्तसंस्था)

### नातेवाईकांची खोटी आशा मुलीच्या जीवावर बेतली

**»» न्यायासनाने म्हटले की, या प्रकरणात गावातील प्रतिष्ठित मंडळींनी मध्यस्थी केली होती आणि कथित तडजोडीनंतर ठराव मंजूर केले. सोमाच्या जवळच्या आणि प्रिय व्यक्तींना भाबडेपणाने वाटले की, परिस्थिती हळूहळू सुधारेल. ते एका खोट्या आशेवर होते. पण, जेव्हा सासरच्या घरी सोमाचा मृत्यू झाला, तेव्हा त्यांचे डोळे उघडले.**

# आषाढी यात्रेत दि. १६ जुलैपासून २४ तास दर्शन

## जुलैमध्ये महालक्ष्मी व व्यंकटेश मंदिरे दर्शनासाठी खुली होणार : गहिनीनाथ महाराज औसेकर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.२६ मे-**

२०२६ मधील आषाढी एकादशी शनिवार, दि. २५ जुलै रोजी साजरी होत असून पहाटे २.२० वाजता राज्याचे मुख्यमंत्री तसेच मानाचे वारकरी यांच्या हस्ते सपत्नीक श्रींची शासकीय महापूजा संपन्न होणार आहे. आषाढी यात्रा कालावधी दि.१५ ते २९ जुलै असा असून, या कालावधीत श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिराशी संबंधित प्रथा, परंपरा व भाविकांना देण्यात येणाऱ्या विविध सोयी-सुविधांचा आढावा घेण्यात आला.

दि.१६ जुलै रोजी श्रींचा पलंग काढून भाविकांसाठी २४ तास दर्शन व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. मंदिर समितीची सभा दि.२६ मे रोजी भक्तनिवास येथे श्री. औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. महाराष्ट्र विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहितेचे पालन करून ही सभा आयोजित करण्यात आली होती. सभेस शकुंतला नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख (जळगांवकर), ड. माधवी निगडे, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक प्रविणकुमार घम, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, पुरातत्व विभागाचे विलास वाहणे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे श्रीनिवास गुजरे, वास्तुविशारद तेजस्विनी आफळे, जतन-संवर्धन कामाचे ठेकेदार प्रतिनिधी तसेच मंदिर समितीचे सर्व खाते प्रमुख उपस्थित होते. सभेमध्ये आषाढी यात्रा नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. त्यामध्ये शासकीय महापूजा, २४ तास दर्शन व्यवस्था, दर्शनरांग नियोजन, लाईव्ह दर्शन, सुरक्षा व्यवस्था, निवास व्यवस्था, स्वच्छता, पिण्याचे पाणी, अन्नछत्र तसेच इतर अनुषंगिक सोयी-सुविधांबाबत चर्चा करण्यात आली. तसेच प्रतिवर्षीप्रमाणे श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार देण्याचे निश्चित करण्यात आले. जतन व संवर्धन कामांच्या आढाव्यामध्ये श्री महालक्ष्मी मंदिर व श्री व्यंकटेश मंदिर येथे मूर्ती प्राणप्रतिष्ठा करून माहे जुलैमध्ये मंदिरे दर्शनास खुली करण्याचा निर्णय घेण्यात आला.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# पाकिस्तान अमेरिकेच्या सापळ्यात

## अब्राहम करार स्वीकारण्याचा दबाव; मुनीर, शाहबाजची कोंडी



**वॉशिंग्टन, २६ मे**

इराणसोबत सुरू असलेल्या वाटाघाटीत मध्यस्थाच्या भूमिकेत असलेला पाकिस्तान अब्राहम करारामुळे अमेरिकेच्या सापळ्यात अडकला आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायलसोबतचे संबंध सुधारण्याच्या उद्देशाने अब्राहम करार स्वीकारण्यासाठी पाकिस्तानवर दबाव आणल्याने लष्करप्रमुख असीम मुनीर आणि पंतप्रधान शाहबाज शरीफ यांची चांगलीच कोंडी झाली आहे. कराराचा भाग होण्यास तुर्तास पाकिस्तानने नकार दिला आहे.

आपल्या मूळ विचारसरणीशी आणि धोरणांशी कोणतीही तडजोड करणे शक्य नसल्याचे सांगत पाकिस्तानने इस्रायलला अधिकृत देश म्हणून मान्यता देणारा करारच फेटाळून लावला आहे. पाकिस्तानच्या कृतीने ट्रम्प यांनी नाराजी व्यक्त केली. समाज माध्यमावरील पोस्टमध्ये त्यांनी म्हटले की, मी पाकिस्तानसह सौदी अरब, कतार, तुर्की आणि जॉर्डन या देशांना अब्राहम करारात सामील होण्याचे आणि इस्रायलला अधिकृत मान्यता देण्याचे आवाहन केले आहे. मध्यपूर्वेतील संघर्ष संपवण्यासाठी हे अत्यंत आवश्यक आहे. करारात देशांचा सहभाग अनिवार्य असायला हवा, याला विरोध करणारे देश स्वतःचे नुकसान करून घेईल. दरम्यान ट्रम्प यांना नकार देऊन स्वतःचा जीव धोक्यात घालायचा की कट्टर शत्रू इस्रायलशी मैत्री करायची, असा प्रश्न शाहबाज, मुनीर यांच्यापुढे आहे. अशातच पाकिस्तानने ट्रम्प यांच्या दबावाला बळी न पडता आपल्या मूळ विचारधारेवर ठाम राहण्याचा निर्णय घेतला आहे.

पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी ट्रम्प यांच्या पोस्टवर प्रत्युत्तर देताना म्हटले की, आमच्या मूलभूत विचारसरणीशी विसंगत असलेल्या कोणत्याही करारात आम्ही सहभागी होणार नाही. ज्यांच्या शब्दावर एका दिवसासाठीही विश्वास ठेवता येत नाही, अशा लोकांसोबत (इस्रायल) आम्ही एकत्र येऊ शकत नाही. ७८ वर्षांच्या इतिहासात पाकिस्तानने कधीही इस्रायलला मान्यता दिलेली नाही आणि यापुढेही धोरणात बदल होणार नाही. आमचा देश जगातील एकमेव असा देश आहे, ज्याच्या पासपोर्टवर इस्रायलचे नावदेखील समाविष्ट नाही. (वृत्तसंस्था)

### काय आहे 'अब्राहम करार'?

- **सुरुवात:** अब्राहम कराराची सुरुवात २०२० मध्ये डोनाल्ड ट्रम्प यांच्या पहिल्या राष्ट्राध्यक्षपदाच्या कार्यकाळात झाली
- **उद्देश:** इस्रायल आणि अरब राष्ट्रांमधील राजनैतिक, आर्थिक आणि सुरक्षाविषयक संबंध पूर्ववत करणे हा या कराराचा मुख्य उद्देश आहे.
- **सहभागी देश:** २०२० मध्ये संयुक्त अरब अमिराती (यूएई) आणि बहरीन यांनी सर्वात आधी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. त्यानंतर मोरोक्को आणि सुदान हे देशही यात सामील झाले.

### गाझा युद्धानंतर नाराजी वाढली

अब्राहम कराराचा उद्देश केवळ राजनैतिक संबंध नाही. यामागे सुरक्षा, व्यापार, तंत्रज्ञान, संरक्षण सहकार्य आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे इराणबद्दलची सामायिक चिंता आहे. अमेरिकेने याला पश्चिम आशियातील नवीन रणनीतिक व्यवस्था म्हणून सादर केले होते. अरब देशांमध्ये इस्रायलविरोधात संताप वाढला आहे आणि पॅलेस्टाईनचा मुद्दा पुन्हा केंद्रस्थानी आला आहे.



अधिक मास सुरू असल्याने देशभरातील तीर्थस्थळांवर भाविकांची मोठी गर्दी होत आहे. उत्तर भारतात साजरा केल्या जाणाऱ्या गंगा दशेहरा महोत्सवानिमित्त प्रयागराज येथील पवित्र संगमावर मंगळवारी स्नानासाठी लाखो भाविकांनी गर्दी केली होती

## बांधकामाधीन विहीर कोसळून पाच मजुरांचा मृत्यू

**पन्ना :** पन्ना जिल्ह्यात बिहारपूरवा गावातील नयापूरवा येथे शेतात विहीर खोदताना एक मोठा अपघात झाला. यात पाच मजुरांचा मृत्यू झाला आहे. गत १० दिवसांपासून सात मजूर बिनू अहिरवार यांच्या शेतात विहीर खोदत होते. मंगळवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास अचानक माती कोसळल्याने आत काम करणारे मजूर ढिगाऱ्याखाली गाडल्या गेले. मिळालेल्या माहितीनुसार, दोन मजूर पाणी पिण्यासाठी वर आले असता अचानक विहिरीची माती कोसळली आणि आत काम करणारे मजूर गाडले गेले.

## भोंदू खरातला न्यायालयीन कोठडी

**मुंबई, २६ मे**

येथील विशेष न्यायालयाने भोंदू अशोक खरातला १४ दिवस न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचा आदेश मंगळवारी दिला.

खरातवर यापूर्वी बलात्कार आणि फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्याला ईडीने मागील आठवड्यात मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात अटक केली होती. त्याला मंगळवारी विशेष न्यायालयासमोर हजर करण्यात आले. सध्या आम्हाला खरातच्या कोठडीची गरज नाही. पण, गरज भासल्यास भविष्यात त्याची मागणी केली जाऊ शकते, असे ईडीने न्यायालयास सांगितले. त्यानंतर त्याला न्यायालयीन कोठडीत पाठविण्याचा आदेश देण्यात आला.



अशोक खरात हा ४७ कोटी रुपयांच्या लॉण्ड्रिंगचा कटकर्ता आणि लाभार्थी आहे, असा ईडीचा आरोप आहे. बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत ६ एप्रिल रोजी खरातच्या विरोधात ईडीने गुन्हा दाखल केला होता. खंडणी, धार्मिक फसवणूक आणि अनेक महिला पीडितांवर मादकपदार्थांचा वापर करून केलेल्या हल्ल्यांच्या आरोपांखाली नाशिक पोलिसांनी त्याच्याकडून दाखल केलेल्या एफआयआरची दखल ईडीने घेतली होती. (वृत्तसंस्था)

# केंद्र सरकारकडून नवे आधार ॲप लाँच

## 'एम-आधार' लवकरच होणार बंद

**नवी दिल्ली, २६ मे**

केंद्र सरकारने जुने एम-आधार ॲप लवकरच बंद करण्यात येणार असल्याची घोषणा केली आहे. त्याऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाकडून (यूआयडीएआय) आधार सेवा अधिक सुरक्षित, जलद आणि अत्याधुनिक फीचर्स असलेले नवीन आधार ॲप सुरू करण्यात आले आहे. वापरकर्त्यांची वैयक्तिक माहिती अधिक सुरक्षित ठेवणे आणि डिजिटल पडताळणीची प्रक्रिया अधिक सोपी व आधुनिक करणे हा यामागील मुख्य उद्देश आहे.

यूआयडीएआयच्या अधिकृत 'एक्स' खात्यावरून याबाबत माहिती देण्यात आली. एम-आधार लवकरच बंद होणार आहे. नवीन आधार ॲप डाऊनलोड करा आणि अधिक वेगवान सेवा, स्मार्ट फीचर्स आणि सोपी आधार सुविधा अनुभवा, असे पोस्टमध्ये म्हटले आहे. नवे आधार ॲप हे केवळ जुन्या ॲपचे अपडेटेड व्हर्जन नसून, आधार पडताळणी आणि माहिती शेअरिंगची पद्धतच बदलण्यात आली आहे. जुन्या ॲपमध्ये प्रमाणीकरणावेळी संपूर्ण आधार माहिती दिसत असे. मात्र, नव्या ॲपमध्ये फक्त आवश्यक माहितीच शेअर केली जाईल. त्यामुळे वैयक्तिक माहिती अधिक सुरक्षित राहणार आहे. नवीन ॲपमधील सर्वांत महत्त्वाचे फीचर म्हणजे सुरक्षित क्यूआर आधारित आधार शेअरिंग. हॉटेल, रुग्णालये, सरकारी कार्यालये किंवा इतर सेवा केंद्रांवर आता संपूर्ण आधार क्रमांक दाखविण्याची गरज भासणार नाही. कोड स्कॅन करून आवश्यक माहिती शेअर करता येणार आहे. याशिवाय, प्रमाणीकरण प्रक्रियेतही मोठा बदल करण्यात आला आहे. याआधी केवळ मोबाईलवर येणाऱ्या ओटीपीवर अवलंबून असलेली प्रणाली आता अधिक सुरक्षित करण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

# 'इंधन बचत... म्हणजेच इंधन निर्मिती!'

# एसटीत राबविणार डिझेल बचतीची मोहीम

**मुंबई, २६ मे**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) वाढत्या इंधन खर्चाला लगाम घालण्यासाठी आता 'इंधन बचत... म्हणजेच इंधन निर्मिती' ही व्यापक संकल्पना राज्यभरात प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. इंधन खर्चात कपात करण्यासाठी एसटीच्या प्रत्येक आगाराला डिझेल बचतीचे उद्दिष्ट दिले जाणार असून, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या चालकांना विशेष प्रोत्साहन भत्ता देण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली आहे.

मंत्रालयात एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत आयोजित करण्यात आलेल्या विशेष बैठकीत ते बोलत होते. एसटीला सध्या दररोज सरासरी १०.८७ लाख लिटर डिझेलची आवश्यकता भासते.



त्यामुळे वाढत्या खर्चावर नियंत्रण मिळवण्यासाठी इंधन बचत ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.एसटीच्या प्रत्येक आगाराने दररोज किमान ५ लिटर डिझेल बचतीचे उद्दिष्ट निश्चित केले, तरी संपूर्ण राज्यभरातून दररोज किमान १००० लिटर डिझेलची बचत होऊ शकते. सध्याच्या डिझेल दरानुसार ही बचत दररोज जवळपास १ लाख रुपयांच्या घरात जाते. ''लहान बचतीतून मोठी आर्थिक शिस्त निर्माण होते आणि हीच बचत भविष्यात एसटीसाठी मोठी ताकद ठरू शकते,'' असा विश्वास मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केला.

''एसटीचा चालक हा केवळ वाहनचालक नसून तो संस्थेच्या अर्थकारणाचा शिल्पकार आहे. जबाबदारीने वाहन चालवणारा चालक एसटीचे लाखो रुपये वाचवू शकतो,'' असे गौरवोद्गार प्रताप सरनाईक यांनी काढले.

डिझेल बचतीमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या चालकांचा विशेष सत्कार करून त्यांना प्रोत्साहनपर भत्ता देण्याची नवी योजना सुरू करण्यात येणार आहे. तसेच, निश्चित उद्दिष्टांपेक्षा अधिक डिझेल बचत करणाऱ्या आगारांना दरमहा विशेष पुरस्कार आणि आर्थिक प्रोत्साहन देऊन त्यांच्यात सकारात्मक स्पर्धा निर्माण केली जाईल. (तभा वृत्तसेवा)

### कमी केपीएल देणाऱ्या चालकांना पुनर्प्रशिक्षण

वाहन चालविण्याच्या चुकीच्या पद्धतीमुळे ज्या चालकांच्या बसचे केपीएल (किलोमीटर प्रति लिटर) प्रमाण कमी येत असेल, अशा चालकांचे समुपदेशन केले जाणार आहे. इंधन बचतीसाठी वेग नियंत्रण, योग्य गिअरचा वापर, थांब्यावर असताना इंजिन बंद ठेवणे आणि ब्रेकिंग पद्धतीत सुधारणा यांसारख्या बाबींवर त्यांना विशेष पुनर्प्रशिक्षण दिले जाईल.

### इंधन बचत ही राष्ट्रीय संपत्तीची जपणूक

एसटीची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी महसूल वाढीसोबतच खर्चावर नियंत्रण ठेवणे तितकेच महत्त्वाचे आहे. इंधन बचत ही केवळ आर्थिक बाब नसून ती राष्ट्रीय संपत्तीच्या जतनाशी संबंधित जबाबदारी आहे. त्यामुळे महामंडळाच्या प्रत्येक अधिकारी, कर्मचारी आणि चालकाने ही मोहीम आपली स्वतःची समजून राबवावी, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

# जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी नेटवर्क पुन्हा सक्रिय

## अल बद्र-हिजबुलच्या युतीबाबत गुप्तचर यंत्रणांनी केले सतर्क

**नवी दिल्ली, २६ मे**

भारतीय गुप्तचर यंत्रणांनी जम्मू आणि काश्मीरमधील दहशतवादी कारवायांबाबत मोठा इशारा दिला आहे. यंत्रणांच्या मते, बऱ्याच काळापासून कमकुवत झालेली अल-बद्र संघटना आता खोऱ्यात पुन्हा सक्रिय होण्याचा प्रयत्न करत आहे. ती हिजबुल मुजाहिदीनसोबत संयुक्त पुनरागमनाच्या रणनीतीवर काम करत आहे.

सूत्रांनुसार, पाकिस्तानात अल-बद्रचा सर्वोच्च कमांडर हमजा बुरहानचा झालेला मृत्यू हा संघटनेसाठी एक मोठा धक्का होता. असे असूनही, भारतीय यंत्रणांचा असा विश्वास आहे की, या संघटनेला कमी लेखणे ही एक मोठी चूक ठरू शकते. अलीकडील संभाषणांवरून असे दिसून येते की, अल-बद्र आणि हिजबुल मुजाहिदीन जम्मू व काश्मीरमध्ये आपले नेटवर्क पुन्हा स्थापित करण्याचा प्रयत्न करत आहेत.

गुप्तचर अधिकाऱ्यांच्या मते, या दोन संघटनांचे एकत्र येणे पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयसाठी सामरिकदृष्ट्या फायदेशीर आहे. कारण या दोन्ही संघटनांना देशांतर्गत दहशतवादी संघटना म्हणून चित्रित केले जाऊ शकते. यापैकी अनेक संघटनांमध्ये अशा व्यक्तींचा समावेश आहे, जे अनेक वर्षांपूर्वी शिक्षणाच्या नावाखाली पाकिस्तानात गेले होते. परंतु, तिथे त्यांना खोऱ्यातील दहशतवादी कारवायांसाठी प्रशिक्षित करून तयार करण्यात आले होते.

एका अधिकाऱ्याने सांगितले की, अल-बद्र एकटीने काम करण्याच्या स्थितीत नाही, कारण तिच्याकडे पुरेसे कार्यकर्ते नाहीत आणि तिचा पूर्वीचा प्रभावही नाही. तथापि, हिजबुल मुजाहिदीनसोबत हातमिळवणी केल्याने तिला खोऱ्यात आपले स्थान पुन्हा मिळवण्याची संधी मिळू शकते. या दोन्ही संघटना आता जैश-ए-मोहम्मद आणि लश्कर-ए-तैबामधील असंतुष्ट दहशतवाद्यांची भरती करण्याचा प्रयत्न करत आहेत.

**हमजावर होती मोहिमेची जबाबदारी**

गुप्तचर सूत्रांनी उघड केले आहे की, खोऱ्यातील तरुणांची भरती आणि प्रचार मोहिमेची जबाबदारी हमजा बुरहानवर होती. तो पोस्टर युद्धाच्या माध्यमातून तरुणांना कट्टरपंथी बनवून त्यांना संघटनांशी जोडण्याच्या रणनीतीवर काम करत होता. कलम ३७० रद्द करणे आणि तरुणांवरील कथित अन्याय यांसारखे मुद्दे अधोरेखित करण्यासाठी या पोस्टर्सची योजना आखण्यात आली होती. हमजाच्या अंत्यविधीला अल-बद्र आणि हिजबुल मुजाहिदीनचे नेते आणि कार्यकर्ते उपस्थित राहिल्याने या दोन संघटनांमधील घनिष्ठ संबंधही अधोरेखित झाले आहे. (वृत्तसंस्था)



केरळचे मुख्यमंत्री व्ही.डी. सतीशन् यांनी मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दिल्लीत येऊन सदिच्छा भेट घेतली

# सीएनजीच्या दरात पुन्हा २ रुपयांची वाढ

**नवी दिल्ली, २६ मे**

पेट्रोल आणि डिझेलच्या दरवाढीनंतर मंगळवारी सीएनजीच्या दरात पुन्हा वाढ करण्यात आली. सीएनजीच्या दरात प्रति किलो २ रुपयांची वाढ झाल्यामुळे सीएनजीवर चालणाऱ्या वाहनांचा वापर करणाऱ्यांचा प्रवासखर्च आणखी वाढला आहे. यापूर्वी शनिवारी सीएनजीच्या दरात १ रुपयाची वाढ झाली होती.

सीएनजीच्या दरवाढीचा परिणाम दिल्ली आणि मुंबईसारख्या शहरांमधील सार्वजनिक वाहतुकीवरही झाला आहे. तिथे मोठ्या प्रमाणात बस आणि टॅक्सी याच इंधनावर चालतात. पश्चिम आशियातील सुरू असलेला भू-राजकीय तणाव आणि जागतिक कच्च्या तेलाच्या बाजारातील सततच्या चढ-उतारांच्या पार्श्वभूमीवर ही दरवाढ झाली आहे. दिल्लीत सीएनजीचे नवे दर प्रति लिटर ८३.०९ रुपयांवर पोहोचले आहे. (वृत्तसंस्था)

## राम रहीम तुरुंगाबाहेर; ३० दिवसांचा पॅरोल मंजूर

**रोहतक, २६ मे**

सुनारिया तुरुंगात कैद असलेले डेरा सच्चा सौदाचे प्रमुख गुरमीत राम रहीम पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. त्यांना ३० दिवसांचा पॅरोल मंजूर झाला आहे. ही त्यांची १६ वी सुटका आहे, जी नेहमीच चर्चेचा विषय ठरते. राम रहीम यांना बलात्कार आणि हत्येप्रकरणी शिक्षा झाली होती. परंतु, त्यांच्या पॅरोलवर वारंवार प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले आहे. पॅरोल मंजूर झाल्यानंतर गुरमीत राम रहीम सिरसा येथील डेरा सच्चा सौदा येथे राहणार आहेत. त्यांच्या सुटकेमुळे डेरा सच्चा सौदाच्या अनुयायांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. सिरसा डेरा हे त्यांच्यासाठी एक महत्त्वाचे ठिकाण राहिले आहे, जिथे ते आपल्या अनुयायांना भेटतात. गुरमीत राम रहीम यांचा पॅरोल यापूर्वीही विवादास्पद ठरला आहे. प्रत्येक वेळी त्यांची सुटका निवडणुका किंवा इतर मोठ्या घटनांच्या वेळीच केली जाते. मात्र, यावेळी पॅरोलचे कारण स्पष्ट करण्यात आलेले नाही. (वृत्तसंस्था)

# हितेंद्र ठाकूर यांचा बच्चू कडू होणार?

## ठाणे विधान परिषदेत नवा ट्विस्ट; शिंदेंचे पुन्हा धक्कातंत्र

**मुंबई, २६ मे**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीत एकापाठोपाठ एक मोठे राजकीय ट्विस्ट पाहायला मिळत आहेत. शिवसेनेकडून उमेदवारीसाठी इच्छुक असलेले माजी आमदार रवींद्र फाटक हे आपला मार्ग सुकर करण्यासाठी बहुजन विकास आघाडीचा पाठिंबा मिळवण्याच्या प्रयत्नात आहेत; तर दुसरीकडे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आपले 'धक्कातंत्र' वापरून 'बविआ'लाच थेट शिवसेनेत विलीन करण्याच्या तयारीत असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून समजली आहे. शिंदेंचा हा विलीनीकरणाचा प्रस्ताव जर ठाकूर पिता-पुत्रांनी स्वीकारला, तर रवींद्र फाटक यांचा पत्ता कट होऊन थेट क्षितिज ठाकूर यांनाच विधान परिषदेचे तिकीट देऊन शिंदे सर्वांनाच मोठा धक्का देण्याची शक्यता आहे.



ठाणे विधान परिषदेची निवडणूक जिंकण्यासाठी वसई-विरारमधील बहुजन विकास आघाडीची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. 'बविआ'कडे तब्बल ७१ नगरसेवकांचे भक्कम संख्याबळ आहे. हा पाठिंबा मिळाल्यास शिवसेनेसाठी ही निवडणूक अत्यंत सोपी ठरू शकते. याच गणिताची जुळवाजुळव करण्यासाठी शिवसेनेचे इच्छुक उमेदवार रविंद्र फाटक यांनी नुकतीच आमदार क्षितिज ठाकूर आणि 'बविआ'चे सर्वेसर्वा हितेंद्र ठाकूर यांची प्रत्यक्ष भेट घेतली. पक्षश्रेष्ठींनी आपल्यालाच उमेदवारी द्यावी आणि विजयाचे पारडे जड व्हावे, यासाठी फाटक यांनी ही मोर्चेबांधणी सुरू केली.

**शिंदेंचा मास्टरस्ट्रोक आणि विलीनीकरणाचा प्रस्ताव**

रवींद्र फाटक जरी पाठिंब्यासाठी धावपळ करत असले तरी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मात्र वेगळाच आणि मोठा डाव टाकला आहे. विदर्भात बच्चू कडू यांच्यासारख्या नेत्याला सोबत घेत शिवसेनेची ताकद वाढवण्याचा प्रयोग केल्यानंतर, आता ठाण्यात 'बविआ'ला थेट शिवसेनेत विलीन करण्याचा प्रस्ताव शिंदेंनी दिल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे. (तभा वृत्तसेवा)

### हितेंद्र ठाकूर काय निर्णय घेणार?



आता संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष हितेंद्र ठाकूर यांच्या निर्णयाकडे लागले आहे. विधानसभा निवडणुकीत वसई आणि नालासोपारा या दोन्ही ठिकाणांहून ठाकूर पिता-पुत्रांना भाजपाकडून पराभवाचा झटका बसला होता. विधिमंडळातून बाहेर फेकल्या गेलेल्या बविआला शिवसेनेच्या माध्यमातून विधिमंडळात परतायची ही एक संधी आहे. फाटक यांच्या विनंतीला मान देऊन शिवसेनेच्या उमेदवाराला केवळ पाठिंबा द्यायचा, की उपमुख्यमंत्री शिंदेंचा विलीनीकरणाचा प्रस्ताव स्वीकारून क्षितिज ठाकूरांसाठी विधान परिषदेची आमदारकी पदरात पाडून घ्यायची? या एका निर्णयावरच ठाणे विधान परिषदेचा संपूर्ण नवा ट्विस्ट अवलंबून आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत १ जून रोजी संपत आहे.

# न्यायिक अधिकाऱ्यांच्या घेराव; आणखी १४ जणांना अटक

## बंगालमध्ये एनआयएने आवळला पाश

**कोलकाता, २६ मे**

पश्चिम बंगालच्या मालदा जिल्ह्यात विधानसभा निवडणुकांपूर्वी न्यायिक अधिकाऱ्यांचा घेराव केल्याप्रकरणी एनआयएने आणखी १४ जणांना अटक केली असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी मंगळवारी दिली.

मालदातील कालिआचक आणि मोथाबारी भागातील अनेक ठिकाणी केलेल्या छापेमारीनंतर सोमवारी रात्री अटकसत्र राबविण्यात आले, असे त्यांनी सांगितले. यासह आतापर्यंत या प्रकरणात ६८ जणांना अटक करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले.

अटक करण्यात आलेल्यांचा मागील महिन्यात मोथाबारी येथे न्यायिक अधिकाऱ्यांच्या छळ आणि त्यांना डांबून ठेवण्यात थेट सहभाग होता. मतदार यादीतून नाव वगळल्याच्या निषेधार्थ आंदोलन करणाऱ्या एका मोठ्या जमावाने रस्ते रोखून धरत, वाहनांची तोडफोड करीत आणि पोलिस कर्मचाऱ्यांवर हल्ला करीत हिंसक रूप धारण केल्यानंतर १ एप्रिल रोजी मोथाबारी येथील बीडीओ कार्यालयात सात न्यायिक अधिकाऱ्यांना ओलीस धरण्यात आले, तर आठव्या अधिकाऱ्याला एका वाहनात सुमारे नऊ तास डांबून ठेवण्यात आले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

या न्यायिक अधिकाऱ्यांना मतदार याद्यांच्या विशेष सखोल सुधारणा कार्यासाठी नियुक्त करण्यात आले होते. रात्री उशिरा सुरक्षा दलांनी त्यांची सुटका केली. या घटनेमुळे विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर राज्यात राजकीय गदारोळ झाला होता. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# नियोजनशून्यतेच्या विळख्यातली शेती

नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळ, वाढते कर्ज, शेतमालास न मिळणारा भाव आणि उत्पादन खर्चात झालेल्या प्रचंड वाढीमुळे शेतकरी आधीच आर्थिक आणि मानसिक तणावाखाली जगत आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून ठोस आणि वेळेवर नियोजनाची अपेक्षा असते; पण खरीप हंगाम तोंडावर आला असला तरी प्रशासकीय गोंधळ संपण्याची चिन्हे नाहीत. बियाणांचा काळाबाजार सुरूच आहे, खतांचा कृत्रिम तुटवडा आहेच, इंधनाच्या वाढत्या दरांचा आणि टंचाईचा प्रश्न गंभीर बनला आहे. कर्जमाफीची घोषणा करण्यात आली; पण प्रत्यक्षात पेरणीसाठी शेतकऱ्याच्या खिशात पैसा येणार कुठून, याचे उत्तर कुणाकडेच नाही. एका बाजूला पावसाची चाहूल लागलेली आहे आणि दुसऱ्या बाजूला यंत्रणेचा हा गोंधळ शेतकऱ्याला सतत छळतो आहे. खरिपाचे नियोजन म्हणजे फक्त बैठका घेणे, घोषणा करणे नसते. शासनाच्या दृष्टीने तो शेतकऱ्यांच्या उपजीविकेला आधार देण्याचा प्रयत्न असायला हवा. दुर्दैवाने प्रत्येक वर्षी तोच गोंधळ, तोच ढिसाळपणा आणि त्याच चुका केल्या जातात. शेतकरी आणि संकट हे दोन्ही शब्द समानार्थी वाटावेत, अशी आजची परिस्थिती आहे. प्रत्येक हंगामाच्या सुरुवातीलाच शेतकरी निसर्गाशी कमी आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेशी जास्त झुंजताना आपल्याला दिसतो.

यंदाच्या खरीप हंगामाकडे पाहताना पहिला प्रश्न उभा राहतो तो पावसाचा. हवामान खात्याचे अंदाज दरवर्षी बदलतात. कधी 'सरासरीपेक्षा जास्त पाऊस' असे सांगितले जाते, तर प्रत्यक्षात पाऊस दडी मारतो. कधी मुसळधार पावसाचा इशारा दिला जातो, पण पाऊस येतच नाही. हवामान अंदाजातील ही विसंगती शेतकऱ्याला आर्थिक खाईत ढकलते. पाऊस येईल या अपेक्षेने तो पेरणी करतो; पण नंतर जमीन कोरडी पडली की संपूर्ण बियाणे वाया जाते. दुबार पेरणीचा खर्च वेगळाच. खतांच्या बाबतीतही परिस्थिती वेगळी नाही. डीएपी, युरिया, मिश्र खतांचे दर वाढले आहेत. काही भागांत कृत्रिम तुटवडा निर्माण करून काळाबाजार सुरू असल्याच्या तक्रारी आहेत. शासन बैठका घेते, अधिकारी दौरे करतात, पण गावपातळीवर शेतकऱ्याला वेळेवर खत मिळत नाही. अनेकदा खतांसोबत इतर उत्पादने घेण्याची सक्ती केली जाते. कृषी सेवा केंद्रांतील ही उघड लूट प्रशासनाला दिसत नाही का की ती जाणीवपूर्वक दुर्लक्षित केली जाते?

हवामान बदल शेतकऱ्यांसमोरीलच नव्हे सर्वांच्या दृष्टीने फारच मोठे संकट आहे. कारण त्याचा संबंध थेट अर्थकारणाशी आहे. पूर्वी पावसाळ्याचा एक ठरावीक क्रम होता. मृग नक्षत्रात पाऊस सुरू व्हायचा, पेरण्या व्हायच्या, मध्यम पाऊस पडायचा आणि पिके उभी राहायची. आता चित्र पूर्ण बदलले आहे. कधी जून कोरडा जातो, तर जुलैमध्ये महापुरासारखा पाऊस होतो आणि ऑगस्टमध्ये पुन्हा खंड पडतो. अवकाळी पावसाने शेतीचे सारेच गणित कोलमडते. सध्या उन्हाची दाहकता प्रचंड वाढली आहे. विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील अनेक भागांत तापमान ४५ अंशांच्या पुढे गेले. जमिनीतील ओलावा संपला असून पाण्याचे स्रोतही आटले आहेत. जनावरांसाठी चारा आणि पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. उष्णतेच्या लाटेचा परिणाम थेट शेतीवरही होत असतो. अति उष्ण वातावरणात जमिनीतील सूक्ष्मजीव नष्ट होतात, मातीची सुपीकता कमी होते आणि उत्पादनावरही परिणाम होत असतो. पण कृषी विभागाकडे या संकटावर ठोस उपाययोजना आहेत का? याचे उत्तर दुर्दैवाने नकारात्मकच. कृषी विभागाची भूमिका केवळ कागदी घोडे नाचविण्यापुरतीच आहे. शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी अधिकारी गावात किती वेळा पोहोचतात? पीकपद्धती बदल, हवामान आधारित शेती, कमी पाण्यातील पिके याबाबत माहितीच दिली जात नाही. शेतकरी अजूनही खाजगी कंपन्यांच्या एजंट्सकडून माहिती घेतो, कारण सरकारी यंत्रणा त्याच्यापर्यंत पोहोचतच नाही. शासनाच्या योजनांची घोषणाबाजी मोठी असते; पण प्रत्यक्ष लाभ मिळवताना शेतकरी हैराण होतो. पीकविमा योजना हे त्याचे उत्तम उदाहरण. विम्यासाठी पैसे कापले जातात; पण नुकसानभरपाई मिळवण्यासाठी शेतकऱ्याला महिनोन्‌महिने प्रतीक्षा करावी लागते. अनेकदा पंचनामेच होत नाहीत. झाले तर नुकसान कमी दाखवले जाते. विमा कंपन्या आणि प्रशासन यांच्यात शेतकरी भरडला जातो. प्रत्येक निवडणुकीत कर्जमाफीची घोषणा होते; पण प्रत्यक्षात पात्र-अपात्रतेच्या निकषांत अनेक खरे शेतकरी वंचित राहतात. कर्जमाफी हा उपाय नाही. शेतीला स्थैर्य देणारे धोरण हवे. उत्पादनाला हमीभाव, साठवणूक सुविधा, प्रक्रिया उद्योग आणि बाजारपेठेची साखळी मजबूत केल्याशिवाय शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. खरीप हंगामाच्या तोंडावर बाजारातील बियाणे कंपन्या प्रचंड नफा कमावत आहेत. जाहिरातींचा भडिमार करून विक्रमी उत्पादन देण्याचे दावे केले जातात. प्रत्यक्षात हवामान साथ देत नसल्याने उत्पादन घटते आणि तोटा शेतकऱ्याचाच होतो. शेतकऱ्यांच्या मानसिकतेचा ही व्यवस्था फायदा घेत आहे. ग्रामीण भागात आत्महत्येचा प्रश्न पुन्हा गंभीर होत आहे. आर्थिक संकट, वाढते कर्ज, अनिश्चित हवामान आणि बाजारातील अस्थिरतेमुळे शेतकरी मानसिक तणावाखाली आहे. सरकारे बदलली, घोषणा बदलल्या; पण शेतकऱ्याचे आयुष्य बदलले नाही. उलट त्याच्या संकटांची तीव्रता वाढत गेली. पाणी व्यवस्थापनाच्या बाबतीतही महाराष्ट्राचे चित्र फार चांगले नाही. हजारो कोटींचे सिंचन प्रकल्प झाले; पण अजूनही मोठा भाग कोरडवाहू आहे. ज्या राज्यात धरणे आहेत, कालवे आहेत, तिथे टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो, हा प्रशासनाच्या अपयशाचा पुरावाच म्हटला पाहिजे. शेतकरी फक्त उत्पादन करतो; पण त्याच्या मालाला योग्य भाव मिळत नाही. कांदा, टोमॅटो, सोयाबीन, कापूस यांचे दर सतत घसरत असतात. पिकवताना खर्च वाढतो; पण विकताना भाव कोसळतो. बाजार समित्या, व्यापारी आणि निर्यात धोरणातील विसंगतीमुळे शेतकरी अडचणीत येतो. शेतमाल आयात-निर्यात निर्णय अचानक घेतले जातात आणि त्यांचा फटका थेट शेतकऱ्याला बसतो. राज्याच्या कृषी धोरणात सातत्याचा अभाव आहे. एखाद्या वर्षी सोयाबीनला प्रोत्साहन, पुढच्या वर्षी कापूस, मग डाळी. परिणामी पीकपद्धतीत असंतुलन निर्माण होते. हवामान बदलाच्या पृष्ठभूमीवर राज्याने दीर्घकालीन कृषी आराखडा तयार करण्याची गरज आहे. कोणत्या भागात कोणती पिके शाश्वत राहतील, पाण्याचा वापर कसा कमी करायचा, स्थानिक बियाणांचे संवर्धन कसे करायचे, याचा गंभीर विचार व्हायला हवा. शेतकरी त्याच्या श्रमाचे मोल मागतो आहे. गावागावात कृषी सहायक पोहोचले पाहिजेत. हवामानाच्या सूचना वेळेवर मिळाल्या पाहिजेत. बनावट बियाणे आणि खतांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. पीकविम्याची प्रक्रिया पारदर्शक झाली पाहिजे. खरी गरज आहे ती शेतीला उद्योगाइतके महत्त्व देण्याची. उद्योगासाठी जशा धोरणात्मक सवलती दिल्या जातात, तसेच पाठबळ शेतीलाही मिळाले पाहिजे.

खरीप हंगाम हा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पाऊस चांगला झाला तर बाजारपेठा जिवंत राहतात, ग्रामीण अर्थचक्र फिरते. पावसाने हुलकावणी दिली किंवा अतिवृष्टी झाली तरी अर्थव्यवस्था डळमळते. त्यामुळेच शेतीचा प्रश्न हा केवळ शेतकऱ्यांपुरता मर्यादित नसून तो संपूर्ण राज्याच्या जगण्याचा प्रश्न आहे. शेतकरी आभाळाकडे पाहतोय, पण त्याचवेळी सरकारकडेही पाहतो आहे. पाऊस पडेल की नाही हे निसर्ग ठरवेल; पण शेतकऱ्याला व्यवस्थेच्या भरवशावर जगता येईल की नाही, हे सरकारने ठरवायचे आहे. दुर्दैवाने आतापर्यंतचा अनुभव त्याला निराश करणारा आहे. शेतकरी अजूनही उभा आहे, कारण त्याच्याकडे पर्याय नाही. तो उन्हात जळतो, पावसात भिजतो, कर्जात बुडतो; पण तरीही पेरणी करतो. कारण त्याच्या हातात केवळ बियाणे आहे आणि मनात उद्याच्या पावसाची आशा. पुढाऱ्यांनी आणि प्रशासनाने या आशेचा अंत होऊ देऊ नये. अन्यथा शेतकऱ्याचा प्रश्न हा केवळ कृषक संस्कृतीचा नाही, तर सामाजिक आणि आर्थिक विस्फोटाचा प्रश्न ठरेल. कृषक संस्कृती जगली, वाढली तरच मनुष्य जगेल.


## प्रासंगिक

**तरुण विजय**

# नितीनजी, नव्या भारताच्या उभारणीतील एक अग्रणी...!

भारताच्या नव्या मार्गाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे आज भारतातील सर्वांत सक्रिय आणि परिणामकेंद्रित नेत्यांपैकी एक मानले जातात. त्यांना स्नेहाने आणि आदराने 'भारताचे हायवे मॅन' म्हटले जाते, परंतु त्यांचे योगदान केवळ रस्त्यांपुरते मर्यादित नाही. त्यांचे संपूर्ण कार्य दोन प्रकारे समजून घेता येईल. पहिले, एक संवेदनशील नेता म्हणून सामाजिक सुधारणेसाठी केलेले कार्य आणि दुसरे, देशाचे रस्ते आणि महामार्ग मंत्री म्हणून केलेले त्यांचे उत्कृष्ट कार्य. नितीन गडकरी राजकारणाला केवळ एक करीअर न मानता, समाज आणि अर्थव्यवस्था सुधारण्याचे एक साधन मानतात. ते पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या तत्त्वांनुसार अन्त्योदय म्हणजेच समाजातील सर्वांत गरीब घटकांच्या विकासाच्या तत्त्वांवर कार्य करतात. आदिवासी भागांतून कुपोषण निर्मूलन करणे ही त्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वपूर्ण कामगिरी आहे. महाराष्ट्रातील त्यांच्या सुरुवातीच्या काळात, त्यांच्या असे लक्षात आले की, अमरावती जिल्ह्यातील मेळघाट-धारणी भागातील आदिवासी लोक रस्त्यांच्या अभावामुळे वैद्यकीय उपचार आणि शिधावाटपापासून वंचित राहत होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर कुपोषण वाढले होते. नितीन गडकरी यांनी ९१ दुर्गम आदिवासी गावांना पक्क्या रस्त्यांनी जोडले. या एका पावलामुळे डॉक्टर आणि शिधावाटप सहज उपलब्ध झाले; परिणामी कुपोषणात लक्षणीय घट झाली.

**कचऱ्यातून सोने :** त्यांना कचऱ्यापासून उपयुक्त वस्तू बनवण्याची प्रचंड आवड आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली, नागपूर हे भारतातील पहिले शहर बनले, जिथे महानगर पालिकेच्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते वीज प्रकल्पांना विकण्यात आले आणि त्यातून मोठा आर्थिक लाभ झाला. ते रस्ते बांधकामात प्लॅस्टिक कचरा आणि घनकचऱ्याचाही उपयोग करतात. नितीन गडकरी हे कृषी प्रदेशातील अर्थात् नागपूरचे रहिवासी असल्याने त्यांना शेतकऱ्यांच्या अडचणींची चांगलीच जाणीव आहे. त्यांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर काम केले आहे. त्यांच्या पाठिंब्याने देशातील पहिला बायो-सीएनजीवर चालणारा ट्रॅक्टर तयार झाला; ज्यामुळे शेतकऱ्यांच्या डिझेल खर्चात बचत झाली. त्यांनी ग्रामीण लोकांना रोजगार देण्यासाठी अन्त्योदय ट्रस्ट आणि सहकारी साखर कारखाने स्थापन केले.



२०१४ मध्ये जेव्हा नितीन गडकरी यांनी या मंत्रालयाचा कार्यभार स्वीकारला, तेव्हा देशात रस्ते बांधणीची गती खूपच कमी होती. भूसंपादनास होणारा विलंब आणि निधीच्या अभावामुळे सुमारे १ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प रखडले होते. गडकरींनी हे अडथळे दूर केले.

**रस्ते बांधणीचा विक्रमी वेग :** ते मंत्री झाल्यानंतर देशातील महामार्ग बांधणीचा वेग झपाट्याने वाढला. २०१३-१४ मध्ये जिथे दररोज केवळ ११ ते १२ किलोमीटर रस्ता बांधला जात होता, तिथे २०२०-२१ मध्ये कोविड-१९ महामारीच्या काळात हा वेग वाढून दररोज ३७ किलोमीटर झाला. २०१४ च्या तुलनेत भारतातील राष्ट्रीय महामार्गांची एकूण लांबी ५० टक्क्यांपेक्षा जास्त वाढली आहे.

**प्रमुख द्रुतगती मार्ग आणि प्रकल्प :** त्यांनी केवळ रस्ते रुंद केले नाहीत, तर देशाला आधुनिक आणि मोठे द्रुतगती मार्गही उपलब्ध करून दिले. भारतमाला प्रकल्पांतर्गत दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गाच्या बांधकामाला गती दिली (ज्यामुळे दिल्ली ते मुंबई प्रवासाचा वेळ २४ तासांवरून केवळ १२ तासांवर येईल). तसेच, त्यांनी झोझिला बोगद्यासारख्या गुंतागुंतीच्या प्रकल्पांचे काम पूर्णत्वास नेले. त्यामुळे पर्वत भागांत सर्व ऋतूंमध्ये प्रवास करणे शक्य होते.

**निधी उभारण्याचे नवीन स्रोत :** सरकारकडे प्रत्येक प्रकल्पासाठी निधीची कमतरता होती. त्यावर मात करण्यासाठी गडकरींनी नावीन्यपूर्ण पद्धती शोधून काढल्या. त्यांनी हायब्रीड अॅन्युईटी मॉडेल सादर केले, ज्यामध्ये सरकार रस्ते बांधणीच्या खर्चापैकी ४० टक्के खर्च उचलते, ज्यामुळे खाजगी कंपन्यांना निर्भयपणे काम करता येते. या व्यतिरिक्त सरकारने आधीच बांधलेले रस्ते भाडेतत्त्वावर देऊन नवीन निधी उभारला.

**पर्यावरणपूरक वाहने आणि इंधन :** गडकरी हे भारतात इलेक्ट्रिक वाहने (ईव्ही) आणि स्वच्छ इंधनाला प्रोत्साहन देण्याचे प्रमुख समर्थक आहेत. पेट्रोल आणि डिझेलवरील देशाचा पैसा वाचविण्यासाठी त्यांनी १०० टक्के इथेनॉलवर (ऊस आणि धान्यांपासून मिळविलेले) चालणाऱ्या फ्लेक्स-फ्यूएल इंजिनच्या वापरावर भर दिला. ते ग्रीन हायड्रोजनला भविष्यातील इंधन मानतात.

**डिजिटल परिवर्तन आणि सुरक्षा :** टोल प्लाझावरील लांब रांगांची समस्या दूर करण्यासाठी देशव्यापी मॉडेल लागू केले, ज्यामुळे लोकांचा वेळ आणि इंधन दोन्ही वाचले. याव्यतिरिक्त त्यांनी जुनी आणि प्रदूषणकारी वाहने काढून टाकण्यासाठी 'व्हेईकल स्क्रॅपेज पॉलिसी' आणले आणि रस्ते अपघातांमध्ये प्रवाशांचे प्राण वाचवण्यासाठी एअरबॅगचे नियम कडक केले.

नितीन गडकरी हे एक असे उत्साही नेते आहेत, ज्यांनी आपले कार्य आणि विचारधारा सोडून आयुष्यात इतर कशाचीही पर्वा केली नाही. ते मित्रांचे मित्र आहेत आणि आजही आपल्या जुन्या ओळखीच्या आणि मित्रांसोबत मैत्री कायम ठेवतात. त्यांचा सर्वांत मोठा गुण म्हणजे प्रत्येक कामाकडे एक आव्हान म्हणून पाहतात. रज्जूभय्यांच्या शब्दांत, ''परिपूर्णतेचा स्तर एक इंचही कमी होता कामा नये.'' एकतर काम हाती घ्यायचे नाही किंवा हाती घेतले, तर ते उत्कृष्टपणे पूर्ण करायचे. दिल्लीतील त्यांच्या मंत्रालयातील एका मोठ्या फलकावर लिहिलेल्या या ओळी खूप लोकप्रिय झाल्यात : 'अमेरिका महान आहे म्हणून तिथले रस्ते चांगले आहेत असे नव्हे, तर तिथले रस्ते चांगले आहेत म्हणून अमेरिका महान आहे.' गडकरींनी अटलजींच्या कार्यकाळात मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग बांधून हाच मंत्र प्रत्यक्षात आणला. त्यांच्या सल्ल्यानेच अटलजींना राष्ट्रीय महामार्ग मंत्रालय आणि ग्रामीण रस्ते सुलभता योजना (प्रधानमंत्री ग्राम सडक योजना) सुरू करण्याची प्रेरणा मिळाली, असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. केंद्रीय मंत्री म्हणून, त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एक समर्पित स्वयंसेवक म्हणून, कोणत्याही प्रसिद्धी किंवा माध्यमांच्या पाठिंब्याशिवाय सामान्य नागरिकांचे आशीर्वाद आणि प्रशंसा मिळवत, देशाला एकता व विकासाच्या बंधनात बांधणारे महामार्गांचे जाळे उभारले.

(लेखक राज्यसभेचे माजी सदस्य आहेत.)

## वेध

**विजय निचकवडे**

# सात-बारात 'पाणीदार' महाराष्ट्राचे प्रतिबिंब!

निसर्ग मुक्तहस्ते देत असला तरी, आम्ही ते फक्त घेतच नाही, तर ओरबाडतो! मिळते तेवढे घ्या, ओरबडून, आमचं काय जातंय, हीच मानसिकता आज झाली आहे. मग त्या वर्षानुवर्ष सावली देणाऱ्या वृक्षांच्या कटाईच्या रूपाने असो, की भूगर्भातील जलसाठ्याचे अनियंत्रित आणि अवास्तव उपशाच्या रूपाने असो! पण जेव्हा माणसाचे नियंत्रण सुटते, तेव्हा त्यांना नियंत्रित करण्यासाठी एक व्यवस्था उभारून नियम घालून दिले जातात, त्यातून बदलाची अपेक्षा केली जाऊ शकते! जलव्यवस्थापनासाठी 'पाण्याचा सात-बारा' हा अभिनव प्रयोग राबविण्याचा राज्य सरकारने घेतलेला निर्णय नक्कीच महाराष्ट्राच्या नव्या जलक्रांतीची नांदी ठरू शकेल!



बुडत्याचे पाय डोहाकडे म्हणतात, ते खोटे नसावे! भूजल पातळी खालावत चालली आहे. जलस्रोत संपत आहेत. टँकरचे प्रमाण वाढू लागले आहे. या सर्व गोष्टी विनाशाकडे नेणाऱ्या आहेत. तरीही आज आम्हाला भविष्यातील धोक्याची जाणीव होत नसेल तर आम्ही बुद्धिजीवी म्हणण्यास कितपत पात्र आहोत. प्रचंड आणि अनियंत्रित पाण्याचा उपसा करून जणू काही भूगर्भातील पाणी आमच्या मालकीचे असल्यागत वागतो. नियोजनशून्य असा पाण्याचा वापर करतो आणि शेवटी निसर्गाला दोष देऊन मोकळे होतो. पण आता या अनियंत्रित आणि बेसुमार जलउपशावर अंकुश लागावा म्हणून राज्य शासनाच्या महसूल व जलसंपदा विभागाने घेतलेला पुढाकार नक्कीच कौतुकास्पद आहे. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून साकारणारा 'पाण्याचा सात-बारा' महाराष्ट्राचा चेहरा 'पाणीदार' करणारा असाच आहे. सात-बारा हा प्रत्येक शेतकऱ्याच्या आयुष्याचा आणि अर्थकारणाचा अविभाज्य अंग समजला जातो. या सात-बारावर जमिनीची मालकी आणि पिकांची नोंदणी असते. याच धर्तीवर आता 'पाण्याचा' सात-बारा तयार होणार आहे आणि तोही डिजिटल! बदलत्या हवामानामुळे निर्माण होत असलेले पाण्याचे दुर्भिक्ष, अनियंत्रित भूजल उपसा, भविष्यातील जलसंकटाची चाहूल अशा विविध बाबींचा विचार करून ही संकल्पना मांडणारे आणि त्या दृष्टीने पाऊल टाकणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या सात-बारावर पाण्याची उपलब्धता, वापर, साठ्याचा टाळेबंद नोंदविला जाणार आहे. 'वॉटर बॅलन्सशीट' तयार करून या ताळेबंदाच्या आधारे पिण्याचे असो, की सिंचनाचे अशा दोन्ही प्रकारच्या पाण्याचे नियोजन करणे सोपे होणार आहे. भारतात ७० टक्के शेती ही पाण्यावर अवलंबून आहे. पावसाचे अनियंत्रित प्रमाण, वाढते बाष्पीभवन, अतोनात उपसा यामुळे जलसाठ्यावर पडणारा ताण पाहता पाण्याचा सात-बारा प्रभावी ठरू शकतो. आज महाराष्ट्रातील ४२ टक्के प्रदेश टंचाईग्रस्त म्हणून ओळखला जातो. अशा सर्व परिस्थितीत पाणी वापराचा ताळेबंद जोपर्यंत ठेवला जाणार नाही, तोपर्यंत नियंत्रण ठेवणे शक्य होणार नाही. हा ताळेबंदच भविष्यातील नियोजनाचा आधारही राहणार आहे. राज्य शासनाने पाणी सात-बाराच्या निमित्ताने टाकलेले हे पाऊल महाराष्ट्रात जलक्रांतीची दिशा स्पष्ट करणारे आहे. मात्र हे करताना महाराष्ट्रातील प्रत्येकाला आपल्या कर्तव्याची जाणीव होणे गरजेचे आहे. शासन सात-बारा तयार करून मोकळे होईल. ग्राम पंचायती, पाणलोट क्षेत्र अशा ठिकाणी कागदोपत्री आकडेवारी उपलब्ध राहून अनेक दस्तावेज तयार होतील. पण या मागचा हेतू जोपर्यंत आमच्यासारख्या स्वार्थाने झपाटलेल्यांना कळणार नाही, तोपर्यंत हा चांगला प्रयोग क्रांतीच्या दिशेने सहज वाटचाल करू शकणार नाही. जलपुनर्भरण व्हावे म्हणून शासनाने अनेक अटी टाकल्या आहेत. ही अट पूर्ण करण्याच्या हमीवर बांधकामाची परवानगी दिली जाते. परंतु किती लोक दिलेल्या हमीसोबत प्रामाणिक असतात, याचा विचार प्रत्येकाने करावा! शासकीय यंत्रणाही केवळ कागद रंगविण्याचे काम करते. त्यामुळे पाण्याचा सात-बारा केवळ आकडेवारीने रंगून न राहता महाराष्ट्र पाणीदार होण्यासाठी महत्त्वाचा आधार ठरेल, यासाठी प्रशासकीय यंत्रणेसह सामान्य नागरिकांनीही मनावर घेणे गरजेचे आहे. विकसित महाराष्ट्राचे स्वप्न साकारण्याच्या दृष्टीने राज्याच्या महसूल मंत्र्यांनी घेतलेली ही भूमिका धडसाची आणि दूरदृष्टी ठेवून असली तरी जोपर्यंत अधिकारी, कर्मचारी आणि सामान्य माणसांची 'दृष्टी' बदलणार नाही, तोपर्यंत महाराष्ट्राच्या चेहऱ्यावर पाणी येणार नाही.

९७६३७१३४१७

## विशेष

**कमोडोर श्रीकांत देशमुख**

# ग्रेट निकोबार प्रकल्प; भारताची धोरणात्मक गरज

१७ व्या शतकापासून पोर्तुगीज आणि फ्रेंच मिशनऱ्यांनी निकोबार बेटांवर ख्रिश्चन धर्माचा प्रचार करण्याचा प्रयत्न केला. निकोबार बेटांचे महत्त्व लक्षात घेऊन डेन्मार्कने १७५६ मध्ये त्यांचा ताबा घेतला आणि कामोर्ता बेटावर त्यांचे मुख्यालय स्थापन केले. तथापि, १८४८ मध्ये त्यांनी ते सोडून दिले. १८६९ मध्ये ब्रिटिशांनी औपचारिकपणे ही बेटे ताब्यात घेतली. १९४२ ते १९५ या काळात दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जपान्यांनी ही बेटे काबीज केली. १९४७ मध्ये या बेटांना भारतीय प्रजासत्ताकाचा अविभाज्य भाग म्हणून सामावून घेण्यात आले. ग्रेट निकोबारमध्ये भारताच्या सुरक्षिततेसाठी पायाभूत सुविधांचा विकास करण्याच्या भारताच्या दृढ निर्णयामुळे या प्रदेशाकडे जगाचे लक्ष वेधले गेले आहे. भौगोलिकदृष्ट्या ग्रेटा निकोबार हे भारतातील सर्वात दक्षिणेकडील बेट. ते ९२१ चौरस किमी क्षेत्रफळ असलेले पर्यावरणीयदृष्ट्या महत्त्वाचे क्षेत्र आहे. उष्णकटिबंधीय सदाहरित जंगले, उच्च जैवविविधता (मेगापोड पक्ष्यासह) आणि ६४२ मीटर उंच माऊंट थुलियर हे त्याची वैशिष्ट्ये आहेत. यात गॅलाथियासारख्या प्रमुख नद्या आहेत आणि मलाक्का सामुद्रधुनीजवळ एक महत्त्वपूर्ण सामरिक सागरी बिंदू म्हणून काम करते. येथे स्थानिक शोम्पेन (विशेषत: प्राचीन आदिवासी गट), निकोबारी लोक राहतात. काही स्थायिक झालेले इतर लोक राहतात. ग्रेट निकोबार हा भारतासाठी सामरिक आणि आर्थिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. मलाक्का सामुद्रधुनीजवळील हे एक महत्त्वपूर्ण सागरी प्रवेशद्वार आहे. भारताचे संरक्षण धोरण आणि ॲक्ट ईस्ट धोरणासाठी या क्षेत्राचा विकास महत्त्वाचा आहे. त्याचे मुख्य पैलू पुढीलप्रमाणे :

**स्ट्रॅटेजिक चोक पॉईंट :** हे पूर्व-पश्चिम शिपिंग मार्गापासून केवळ ४० किमी आणि मलाक्का सामुद्रधुनीपासून १०० किमी अंतरावर आहे. यामुळे भारताला सागरी वाहतुकीचे निरीक्षण आणि नियंत्रण करणे शक्य होते.

**लष्करी सामर्थ्य प्रोजेक्शन :** अंदमान समुद्र आणि विस्तीर्ण हिंद-प्रशांत क्षेत्रावर वर्चस्व गाजवण्यासाठी नौदल आणि हवाई दलासाठी हे बेट महत्त्वाचे आहे. या प्रदेशातील पहिला सुरक्षा आणि आपत्ती निवारण प्रदाता/सुविधा प्रदाता म्हणून भारताला बळकट करण्यासाठी पण हे बेट महत्त्वाचे आहे.

**चीनवर नजर ठेवणे :** हे या प्रदेशातील परकीय, विशेषत: चिनी नौदलाचा प्रभाव प्रभाव कमी करण्यास मदत करते. चाचेगिरी, अवैध व्यापार आणि सुरक्षा धोक्यांविरुद्ध भारताचे संरक्षण मजबूत करते. अंदाजे ८०,००० कोटी रुपयांचा ग्रेट निकोबार विकास प्रकल्प हा केवळ पायाभूत सुविधांचा उपक्रम नाही, तर भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी धोरणात्मक प्रकल्प आहे. जगातील सर्वात व्यस्त शिपिंग लेनपैकी एक असलेल्या मलाक्काच्या सामुद्रधुनीजवळ परदेशी बंदरांवरील अवलंबित्व कमी करणे, पाळत ठेवण्याची क्षमता वाढविणे व आर्थिक क्षमता वाढविणे ही त्याची उद्दिष्टे आहेत.



या प्रकल्पात १४.२ दशलक्ष २० फूट समतुल्य युनिट (एमटीईयू) आंतरराष्ट्रीय कंटेनर ट्रान्सशिपमेंट टर्मिनल, ग्रीनफील्ड आंतरराष्ट्रीय विमानतळ (४००० पीक अवर प्रवासी-पीएचपी), ४५० मेगा वोट गॅस-सौर ऊर्जा प्रकल्प आणि नियोजित टाऊनशिप यासारख्या प्रमुख पायाभूत सुविधांचा समावेश आहे. ईआयए अधिसूचना, २००६ आणि आयसीआरझेड अधिसूचना, २०१९ अंतर्गत ४२ अनुपालन अटींचे पालन करून आणि ९७.३० चौरस किमीवर पर्यायी वनीकरणासह बेट वन आच्छादनाच्या १.८२ टक्क्यांची भरपाई करून हा प्रकल्प नियमन पर्यावरणीय चौकटीचे अनुसरण करेल. शोम्पेन आणि निकोबार समुदायांचे कमीत कमी विस्थापन आणि पुनर्अधिसूचनेद्वारे अधिसूचित आदिवासी राखीव क्षेत्रात जास्त वाढ करून या प्रकल्पात आदिवासींचे कल्याण केंद्रस्थानी असेल हे भारत सुनिश्चित करीत आहे. हा प्रकल्प आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असून भारताला पुढील फायदे होणे अपेक्षित आहे-

**इंटरनॅशनल कंटेनर ट्रान्सशिपमेंट टर्मिनल (आयसीटीटी) :** सिंगापूर आणि कोलंबोसारख्या परदेशी बंदरांतील व्यापार हिस्सा मिळवून, जागतिक शिपिंगमध्ये भारताला एक प्रमुख देश म्हणून स्थान मिळेल.

**आर्थिक केंद्र विकास :** एक ग्रीनफिल्ड आंतरराष्ट्रीय विमानतळ, ४५० एमव्हीए ऊर्जा प्रकल्प आणि एक नवीन वसाहत या प्रदेशातील आर्थिक घडामोडींना चालना देईल.

**महसूल आणि रोजगार निर्मिती :** अंदाजानुसार हा प्रकल्प २०४० पर्यंत वार्षिक ३०,००० कोटी रुपये महसूल निर्माण करू शकेल आणि ५०,००० रोजगार निर्माण करू शकेल.

**प्रादेशिक संपर्क व्यवस्था :** ही सागरमाला उपक्रम आणि मेरीटाईम इंडिया व्हिजन २०३० शी सुसंगत परदेशी केंद्रांवरील अवलंबित्व कमी करेल.

**संरक्षण आवश्यकता :** मलाक्का सामुद्रधुनी आणि जागतिक नौवहन वाहतुकीवर प्रभावी देखरेख ठेवणे शक्य होईल. यामुळे अंदमान आणि निकोबार कमांड मजबूत होईल, ही भारतातील एकमेव तिन्ही सेवा कमांड आहे. यामुळे भारताच्या सुरक्षिततेला असलेले धोके कमी करेल आणि नैसर्गिक आपत्तींना त्वरित प्रतिसाद देण्याची क्षमता वाढवेल.

**ॲक्ट ईस्ट धोरण आणि व्यापार :** हा प्रकल्प भारताच्या ऍक्ट ईस्ट पॉलिसीला समर्थन देईल, हिंद महासागराला प्रशांत महासागराशी जोडेल, लॉजिस्टिक कनेक्टिव्हिटी वाढवेल आणि जागतिक व्यापार मार्गांमध्ये प्रमुख केंद्र म्हणून काम करेल.

### चीनची नाराजी

हा प्रकल्प चीनच्या दुखऱ्या नसेला स्पर्श करीत असल्याने ते प्रकल्पाच्या प्रगतीत अडथळा आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. चीनने या प्रकल्पाला लक्ष्य करून एक अपप्रचार मोहीम सुरू केली आहे, ज्यामध्ये तो पर्यावरण विध्वंसक आणि राजकीयदृष्ट्या वादग्रस्त असल्याचे चित्रित केले गेले आहे; चीनने मात्र पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रात स्वत:चा ब्रह्मपुत्रा मेगा धरण प्रकल्प तथा दक्षिण चिनी समुद्रात कृत्रिम बेटे निर्माण करण्याचे प्रकल्प निर्ढावलेल्या वृत्तीने पुढे नेले आहेत; ज्यामुळे त्याचा दुटप्पी चेहरा उघड झाला आहे. विश्लेषकांनी निदर्शनास आणून दिले आहे की, चीनच्या व्यापार आणि ऊर्जा पुरवठ्यासाठी एक महत्त्वाचा अडथळा असलेल्या मलाक्काच्या सामुद्रधुनीजवळ भारताच्या सामरिक क्षमतेला कमकुवत करण्याच्या बीजिंगच्या व्यापक धोरणाचा हा एक भाग आहे. चिनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ग्रेट निकोबार बेटावरील भारताच्या पायाभूत सुविधांच्या प्रकल्पाबद्दल चिनी अस्वस्थता स्पष्टपणे दर्शवित आहेत. हा भारताच्या बेटांना देशाच्या आर्थिक आणि धोरणात्मक मुख्य प्रवाहात एकत्रित करण्याच्या दिशेने एक निर्णायक पाऊल आहे, जो २१ व्या शतकात भारताला एक समर्थ सागरी शक्ती म्हणून स्थान देईल.

(लेखक निवृत्त नेव्हल एव्हिएशन ऑफिसर तथा संरक्षण आणि भू-राजकीय विश्लेषक आहेत.)

## 'नीट'ची ऑनलाईन परीक्षा हाच उपाय

देश स्तरावरील 'नीट' स्पर्धा परीक्षेतील पेपर फुटीचे प्रकरण वाढत चालले आहे. या प्रकरणाचा सखोल तपास करण्याचा चंग यंत्रणांनी बांधला आहे. वारेमाप पैसे देऊन पेपर विकत घेणारे पालक तसेच शिक्षण संस्था पेपरफुटीसाठी जबाबदार आहेत. कोणालाही दया दाखवू नये. शिक्षणाच्या मूळ हेतूवरच घाला घालण्याचा हा प्रकार आहे. शिक्षण क्षेत्राला काळिमा फासणारी ही घटना आहे. पुन्हा असे करण्याचे धाडस कोणालाही होऊ नये या दृष्टीने कठोर कारवाई करावी. पुढील वर्षीपासून 'नीट'चे पेपर सेटिंग ऑनलाईन करण्याचा निर्णय शासनाने घेतलाच आहे. त्याचप्रमाणे देश आणि राज्य स्तरावरील सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षा ऑनलाईनच घेण्याचे ठरविल्यास पेपरफुटीला वावच राहणार नाही. ट्युशनच्या नावाखाली असे करणाऱ्यांचा धंदाही बंद होईल.

**ॲड. बळवंत रानडे**/पुणे

## आंबेनळी घाटातील अपघात मन विचलित करणारा


आंबेनळी घाटात पुन्हा एकदा मृत्यूने अक्षरशः तांडव घातला. सहलीसाठी आलेल्या पर्यटकांचे स्कॉर्पिओ वाहन आंबेनळी घाटात १२०० फूट खाली कोसळले आणि वाहनातील आठ जणांचा जागीच मृत्यू झाला. या दरीमध्ये २४ तासांपूर्वी झालेल्या या अपघाताचे कोणालाच काही कळू शकले नाही. कारण जवळजवळ दीड हजार फूट उंचीवरून पडलेले वाहन कळणार कसे? आंबेनळी घाटाचा प्रश्न आता शासनाने त्वरित आपल्या अखत्यारीत घेऊन त्या घाटावर उपाययोजना करायला हवी. दोन वर्षांपूर्वी एक लक्झरी बस या दरीत कोसळली होती आणि फक्त चालक सोडून जवळजवळ ४० प्रवाशांचा मृत्यू झाला होता. कालचा अपघात २४ तासांनी कळला. शासनाने आंबेनळी घाटावर सशक्त पहारा चौकी वा सशस्त्र जवानांची नियुक्ती करावी; जेणेकरून अपघातात झाल्यास बचावकार्य सुरू करता येईल.

**शिरीष बने**/९२२४२९९२३०

## वाचक पत्रे

## सावरकरांचा आठव

२८ मे रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची १४३ वी जयंती. त्यांच्या एकूण जीवनचरित्रावर अनेक खंडात ग्रंथ निर्मिती झाली आहे तरी पण; त्यांच्यातील अष्टपैलूत्व व बहुआयामित्व यांना साद घालण्यावाचून सावरकर प्रेमीजनांना राहावत नाही. साम्राज्यवादी पाशवी ब्रिटिशांच्या जोखडातून मातृभूमीला स्वतंत्र करण्यासाठी; स्वतःच्या घरादारावर तुळशीपत्र ठेवून गृहस्थ जीवनाचा त्याग करणारे व अभिनव भारत सशस्त्र क्रांतिकारक चळवळ उभारणारे व त्यासाठी दोन दोन जन्मठेपेची शिक्षा झेलून अंदमान सेल्युलर जेलमध्ये काळ कोठडीत ब्रिटिशांचे अनन्वित अत्याचार सहन करत, काळाच्या कपाळावर स्वातंत्र्य देवतेचे काव्य काळ कोठडीच्या भिंतीवर स्वत:ची नखे किंवा कोळशाने रेखाटून हृदयात कंठस्थ करणारे महान कवी या भूतलावावर अन्य कोणीही झाल्याचे ज्ञात नाही. सतत बारा तेरा वर्षे ब्रिटिशांच्या काळ कोठडीत तेल निर्मितीचे कोलू अमानुषपणे ओढत, स्वरूधीराचे पाणी करत व ब्रिटिशांनी फेकलेले निकृष्ट अन्न सेवन करून हाडांच्या काड्या झाल्या तरी कमला व सागरा प्राण तळमळलासारखे अंगावर शहारे आणणारे महाकाव्य रचना करणारे, ब्रिटिशांच्या तावडीतून सुटण्यासाठी मार्सेलिस बंदरावर जहाजाच्या पोर्टल होलमधून समुद्रात धाडसी उडी घेऊन भारतातील स्वातंत्र्य चळवळ जगभर पोहोचविणारे धाडसी वीर केवळ सावरकरच असू शकतात. अंदमान शिक्षा भोगून सुटल्यानंतर रत्नागिरीत स्थानबद्ध असताना प्रचंड मराठी वाङ्मय निर्मिती, हजारो स्फुटलेखन, नाटके, मराठी भाषाशुद्धी व समृद्धी, इंग्रजी भाषेतील अनेक लेख, जातिभेद अस्पृश्यता निवारण, सामाजिक चळवळ चालविणारे, बुद्धिवादी, विज्ञानवादी, छत्रपती शिवाजी महाराजांवर ''हे हिंदु नृसिंहा प्रभू शिवाजी राजा'' ही आरती रचून आयुष्यभर शिवाजी जगणारे जाज्वल्य राष्ट्रभक्त 'न भूतो न भविष्यती' असे असताना त्यांना अनेक जण राज्यघटना विरोधी ठरवितात.



यापूर्वीच्या सरकारांनी त्यांना भारतरत्न सर्वोच्च नागरी सन्मान देऊन जरी गौरविले नाही; तरी सध्याच्या भाजपप्रणीत भारत सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न सन्मान देऊन त्यांचा गौरव करावा ही करोडो सावरकरप्रेमींची इच्छा आहे. तिचा आदर भारत सरकारने करावा व स्वातंत्र्यवीर सावरकर या महामानवाच्या स्मृतीस खऱ्या अर्थाने अभिवादन करावे असे वाटते.

**ॲड. प्रकाश देशपांडे**/७०५८९७५३७६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

# सोलापूर जिल्ह्यातील ९३ गुणवंत शालेय खेळाडूंना ७ लाख रुपयांची क्रीडा शिष्यवृत्ती जाहीर

**तभा वृत्तसेवा । अजितकुमार संगवे**
**सोलापूर, दि. २६ मे-**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांमध्ये सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक मिळवणाऱ्या आणि सहभाग नोंदवणाऱ्या शालेय ९३ खेळाडूंना २०२५-२०२६ या वर्षाची 'शालेय क्रीडा शिष्यवृत्ती' मंजूर करण्यात आली आहे.

या खेळाडूंनी मिळवलेल्या यशानुसार (सुवर्ण ११२५०, रौप्य ८९५०, कास्य ६७५०, सहभाग ३७५०) शिष्यवृत्तीची ही रक्कम थेट बँक खात्यात वितरित करण्यात येत असून, सोलापूर जिल्ह्यासाठी एकूण ७ लाख २० हजार ३५० रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या जिल्ह्यातील विविध शाळांमधील ज्या खेळाडू विद्यार्थ्यांची रक्कम बँक खात्यात जमा झाली नाही, अशा खेळाडू विद्यार्थ्यांनी कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा कार्यालयातील लिपिक राजदीप पाटील यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश मोहारे यांनी केले आहे.



११,२५० | ८,९५० | ६,७५०




**या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेले खेळाडू विद्यार्थी व त्यांच्या शाळा :**

**धनुर्विद्या :** आदित्य संजय पुजारी (स्टार इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज), आदित्य शिवप्रसाद पवार (संत सावता माळी विद्यालय), एंजल सुनील कोकाटे (महात्मा फुले उच्च प्राथमिक विद्यालय), गौरव राजकुमार पवार (मा. बबनरावजी शिंदे सेकंदरी अँड हायर सेकंदरी हायस्कूल), जयहिंद नारायण जगताप (अभिनव सेकंदरी अँड हायर सेकंदरी ज्युनिअर कॉलेज), कृष्णा संभाजी शिंदे (शिवरत्न ज्युनिअर कॉलेज), नमन निलेश साखरे (इंडियन मॉडेल स्कूल), ओम अमोल नरुते (गुरुकुल पब्लिक स्कूल, करमाळा), प्रगती भागवत शिंदे (श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला), साईराज दिनेश हन्मे (छत्रपती शिवाजी नाईट ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स), समीक्षा कैलास देशमुख (महात्मा फुले विद्यालय, टेंभुर्णी).

**स्विमिंग आणि डायव्हिंग :** अपूर्व सुष्मा अंधारे (इंडियन मॉडेल स्कूल), हर्षदा अंबादास गोली(वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स), कनक अशोक शंकू (ज्ञानप्रबोधिनी बालविकास मंदिर प्रशाला), मनस्वी राजशेखर माने (एस. व्ही. सी. एस. हायस्कूल ज्युनिअर कॉलेज), रणवीर राजेंद्र खाडे (डी. बी. एफ. दमाणी हायस्कूल), रितेश गुरुमूर्ती लिगाडे (शस्त्र अर्जुन इंग्लिश मीडियम स्कूल), संकेत श्रीशैल लिगाडे (जी. आर. चांडक प्रशाला), श्रावणी प्रताप सूर्यवंशी (माध्यमिक आश्रमशाळा, देगाव), श्रेया दशरथ गुरव (एस. आर. चांदक इंग्लिश हायस्कूल), सिद्धायू राजीव राजकाडे (महेश इंग्लिश स्कूल), विपुल ऋषिकेश कुडक्याल (संगमेश्वर कॉलेज).

**हँडबॉल :** आकांक्षा महेश मोरे, फिजा नवाज मुल्ला, मंजिरी सचिन जाधव, मयुरी सुभाष वाळके, प्राची गणेश लुगडे, राजनंदिनी सचिन चव्हाण, श्रेया बालसो माने, श्रुती भारत वाळके, प्रज्ञा पोपट जाधव (इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, मंगळवेढा)

**कुस्ती :** हनुमंत राजेंद्र जाधव (महालिंगेश्वर विद्यालय ज्युनिअर कॉलेज, खुडूस), केदारनाथ नंदकुमार ढोपे (वामनराव माने प्रशाला भैरवनाथ वाडी), मोरे प्रणव कृष्णंत, साहिल सुनील लिमन (शिवशंभू आर्ट्स अँड सायन्स ज्युनिअर कॉलेज, कन्हेर), ओम दीपक घोडके (अभिनव पब्लिक स्कूल, वाशिंबे), राजेश्वरी महादेव ठाकरे (अहिल्या प्रशाला, केसरवाडी), सोमनाथ विकास शिंदे (विठ्ठलराव शिंदे प्रशाला, निमगाव), विराज मच्छिंद्र कदम (मारोतराव केसर ज्युनिअर कॉलेज, केसरवाडी), विशाल दादासाहेब ठाकरे (महालिंगेश्वर विद्यालय, खुडूस).

**तलवारबाजी :** अथर्व राजेंद्र खोत (आर. एस. चांडक हायस्कूल), अथर्व काशिनाथ बारसे, ज्ञानदा विजयकुमार शिरवळ, प्रथमेश अमित कस्तुरे (बी. एफ. दमाणी हायस्कूल), समृद्धी गणेश घाले (संगमेश्वर कॉलेज), वेदांत विकास ढसाडे (इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज).

**खो-खो :** कार्तिकी मारुती यलमार, ऋतुजा मारुती सुरवसे (वसंतराव काळे प्रशाला आणि ज्युनिअर कॉलेज, वाडीकुरोली), अतार सुहान सलिम, प्राजक्ता सोमनाथ बनसोडे (इंग्लिश स्कूल ज्युनिअर कॉलेज, वेळापूर), सोहम अशोक काळे (आबासाहेब काकडे विद्यालय, शेवगाव), विक्रमसिंह रमेश राठोड (आबासाहेब काकडे विद्यालय, शेवगाव).

**सॉफ्ट टेनिस :** आर्य अण्णासाहेब पवार (व्ही. एम. मेहता हायस्कूल), मृण्मयी लगदीर गायकवाड (नागेश करजगी ऑर्किड स्कूल), ऋषिकेश संजय चव्हाण (लिटिल फ्लॉवर हायस्कूल), तनुज अजित संचेती (के. एल. ई. इंग्लिश मीडियम स्कूल), विपश्यना प्रसाद सोनावणे (शांती स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज).

**अॅथलेटिक्स :** भक्ती महेश थोरात (स्वामी विवेकानंद पोलीस पब्लिक स्कूल), ज्योती यल्लाप्पा बन्ने (सी. बी. खेडगी कॉलेज, अक्कलकोट), पूजा तुळशीराव राठोड (स्वामी विवेकानंद प्रशाला), सानिका परमेश्वर अलवाले (मातोश्री सौ. सुरुबाई माने विद्यालय आर्ट्स अँड सायन्स कॉलेज).

**सेपाक टकरा :** भक्ती दिगंबर घुले, नम्रता नानासाहेब सुळकुंडे, प्रणिती प्रभाकर नागणे, समरजित सुजित कदम (इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, मंगळवेढा).

**शूटींग :** गौरी आनंदराव ढवळे, साईप्रसाद आनंदराव ढवळे (मा. बबनरावजी शिंदे सेकंदरी अँड हायर सिल्वररी स्कूल, अकोले), श्रीकृष्णा बापू मेटकरी (इंग्लिश स्कूल, वेळापूर).

**सॉफ्टबॉल :** आझर युनुस शेख, ओम कार दादा येडे (नूतन विद्यालय हायस्कूल, कुर्डूवाडी), ओम दत्तात्रय बंडगर (भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशाला व महात्मा जोतीबा फुले ज्युनिअर कॉलेज).

**व्हॉलीबॉल :** अभिजित गिर्जप्पा खोत (उच्च माध्यमिक आश्रमशाळा, खामगाव), ध्रुव गोपाळ रोटे (विलासचंद मोतीचंद मेहता स्कूल), कार्तिकी रामदास गरगडे (नागनाथ विद्यालय, मोहोळ).

**वेटलिफ्टिंग :** अस्मिता काशिलिंग काळे-पाटील, सार्थक मिलिंद काळे (सदाशिवराव माने विद्यालय, अकलुज), इरफान यासीन बर्गीर (छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज).

**बुद्धिबळ :** मानस सुमुख गायकवाड (मॉडेल पब्लिक स्कूल), सान्वी दत्तात्रय गोरे (महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक बार्शी विद्यालय).

**कबड्डी :** गायत्री संतोश मोघे (स्वामी विवेकानंद विद्यालय ज्युनिअर कॉलेज, कोकाळगाव), संस्कृती दिपक माने (छत्रपती शिवाजी विद्यालय, कोर्टी).

**रग्बी :** प्राजक्ता सर्जेराव सोलंकर (बबनरावजी शिंदे सिल्वररी स्कूल, अकोले), सुजल जयंत रंदिवे (बबनरावजी शिंदे सिल्वररी स्कूल, अकोले खुर्द).

**तायक्वांदो :** शालिनी अण्णासाहेब चंदनशिवे (शांती इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज), सुजय अशोक नरुते (अण्णासाहेब मगर विद्या मंदिर, खुर्द).

**बेसबॉल :** साम्राज्ञी सचिनकुमार गाडेकर (सुरवसे कनिष्ठ महाविद्यालय).

**बास्केटबॉल:** विराज विकास गोडसे (शंकरराव मोहिते पाटील इंग्लिश स्कूल).

**क्रिकेट :** कृष्णराज अमरदीप देशमुख (एस. एम. पाटील स्कूल)

**हॉकी :** प्रितम नागेश बोल्डे (यशोधरा ज्युनिअर कॉलेज).

**जुडो :**पूर्वा अमोल कुटे (मा. बबनरावजी शिंदे सेकंदरी अँड हायर स्कूल, अकोले खुर्द).

**टेबल टेनिस :** वेदांत नागेश खलाटे (सिल्वर जुबली हायस्कूल).

**टेनिस :** आकृती नारायण सोनकुसरे (संगमेश्वर कॉलेज).

**वुशू :** उबेद करीम अत्तार (शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज).

### धनुर्विद्या व डायव्हिंगची आघाडी

शिष्यवृत्तीमध्ये धनुर्विद्या, स्विमिंग आणि डायव्हिंगचे प्रत्येकी ११ खेळाडू आहेत. त्याखालोखाल हँडबॉल व कुस्तीचे ९, तलवारबाजी व खो-खो ६, सॉफ्ट टेनिस ५, अॅथलेटिक्स व सेपाक टकरा ४, शूटींग, सॉफ्टबॉल, व्हॉलीबॉल व वेटलिफ्टिंग ३, बुद्धिबळ, कबड्डी, रग्बी व तायक्वांदो २, बेसबॉल, बास्केटबॉल, क्रिकेट,हॉकी, जुडो, टेबल टेनिस, टेनिस व वुशू या खेळाचे प्रत्येकी १ खेळाडूंचा समावेश आहे

# पुष्प जिमखाना, नाईट रायडर्सचे शानदार विजय





## रेल्वेची ७९वी स्कॉट मेमोरियल क्रिकेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मे-**

रेल्वेच्या ७९व्या स्कॉट मेमोरियल क्रिकेट स्पर्धेत पुष्प जिमखाना व नाईट रायडर्स९१ संघाने मंगळवारी शानदार विजय मिळविले. रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात झालेल्या या सामन्यात पुष्प जिमखाना संघाने करियर अकादमीवर २१ धावांनी मात केली. विजय शेंद्रे सामन्याचा मानकरी ठरला.

दुसऱ्या सामन्यात नाईट रायडर्स ९१ संघाने गॅरी क्रिस्टन अकॅडमी ८२ धावांनी विजय मिळविला. सागर लोंढे सामन्याचा मानकरी ठरला. वासुदेव दोरनाल, अंबादास तोरा, लियाकत शेख, विक्रांत पवार व अमोल आलमेलकर यांच्या हस्ते हे पुरस्कार देण्यात आले. पंच म्हणून सोहेल शेख, प्रवीण कुलकर्णी, महेश सोनवणे व अनिल सलगर यांनी तर गुणलेखक म्हणून सचिन गायकवाड यांनी काम पाहिले. सामनावीरचे सर्व पुरस्कार सुदेश मालप व सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत आहेत.

**संक्षिप्त धावफलक :**

**पुष्प जिमखाना :** २० षटकांत सर्व बाद १६०(जगदीश जाधव ६२, विजय शेंद्रे २३, प्रशांत काशीद १७, तनवीर शेख ३-२८, ३-३३, यशराज शिरसागर २-२७) **वि. वि. करियर अकॅडमी :** २० षटकांत ८ बाद १३९ (सुलतान शेख ३२, झैद नदाफ २५, केजर शेख २३, विजय शेंद्रे ४-२०, प्रशांत काशीद १-१८, प्रशांत घोडके १-१६, अजय माने १-२३).

**नाईट रायडर्स ९१ :** २० षटकांत ८ बाद १७३ (आकाश सुतार ५१, आदित्य तिकटे २६, प्रिन्स पटेल १७, ओंकार आयटोडे ३-३२, धीरज सोनवणे २-३३, अजिंक्य चितारे व आशिष जाधव प्रत्येकी एक बळी) **वि. वि. गॅरी क्रिस्टन अकॅडमी :** १५ षटकांत सर्व बाद ९१ (धीरज सोनवणे ३३, अजिंक्य चितारे १६, आतीक शेख ११, सागर लोंढे ४-१९, आदित्य टिकते २-१३, सुजय ओलेकर २-१८, शुभम कांबळे व राहुल बंदपट्टे प्रत्येकी एक बळी.

**आज होणारे सामने :**
**सकाळी :** एमडी रायडर्स विरुद्ध पुष्प जिमखाना
**दुपारी :** टाइम्स ११ विरुद्ध ग्लोबल क्रिकेट क्लब

# स्पार्टन्स संघाचा विजेतेपदावर कब्जा



## जीपीएल क्रिकेट स्पर्धा : रॉयल संघास उपविजेतेपद

**सोलापूर, दि. २६ मे-**

श्री गोविंदराज नगर गणेशोत्सव मंडळाच्या वतीने आयोजित डे-नाईट पद्धतीने झालेल्या पहिल्या 'जीपीएल क्रिकेट स्पर्धेत स्पार्टन्स संघाने विजेतेपद पटकाविले.

अंतिम सामन्यात प्रमोद मार्गम प्रायोजित स्पार्टन्स संघाने प्रथम फलंदाजी करत ५ षटकांत ३८ धावांचे आव्हान उभे केले. यात नयन दोंता यांनी दोन षटकारांसह झंझावाती २० धावा करत सामन्यात रंगत आणली. प्रत्युत्तरात रॉयल संघाला २५ धावांपर्यंतच मजल मारता आली आणि स्पार्टन्स संघाने दिमाखात विजेतेपद पटकावले.

या स्पर्धेचे उद्घाटन डॉ. सुर्यप्रकाश कोठे यांच्या हस्ते झाले. विजेत्या स्पार्टन्स (कर्णधार अमर कोलप्याक) संघाला नगरसेवक प्रथमेश कोठे आणि सामाजिक कार्यकर्ते अविनाश दासरी यांच्या हस्ते चषक व रोख ३ हजार रुपयांचे बक्षीस प्रदान करण्यात आले. द्वितीय पारितोषिक रॉयल संघाचे प्रायोजक अनिल गोसकी यांच्या संघाला (कर्णधार रोहित संगा) तर तृतीय क्रमांकाचा मान किंग्ज संघाचे (कर्णधार विशाल गाजूल) प्रायोजक उमेश गायकवाड यांच्या संघाने पटकावला.

स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाज म्हणून नवल दोंता, तर उत्कृष्ट गोलंदाज व सामनावीर पुरस्कारासाठी एस. एस. मोबाईल, अशोक चौकचे संचालक गणेश तुम्मा यांच्या वतीने खास भेटवस्तू उमेश गायकवाड यास देण्यात आले या स्पर्धेचे पंच म्हणून राजू आणि प्रविण सोमा यांनी तर स्कोअरिंगचे काम गणेश उकरंडे यांनी केले, तर व्यंकटेश दोंता आणि ओंकार श्रीकोंडा यांनी धावते समालोचन केले.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर मंडळ**
**सिग्नलिंगचे काम**

**ई-निविदा सूचना (पुन्हा-आमंत्रण)**
**निविदा सूचना क्र. SUR-N-T-2026-27-15**
**दिनांक :- 25/05/2026**

डीआरएम (एस अँड टी) कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने सक्षम, नामांकित संस्था/कंत्राटदारांकडून खालील काम ांसाठी रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवित आहेत: अनुक्रमांक: 1, कामाचे नाव आणि ठिकाण: मध्य रेल्वेच्या सोलापूर मंडळात जिओग्रीड आणि जिओ-टेक्स्टाईल पद्धतीने (TFTR आणि TBR) बीसीएम (BCM) कामाशी संबंधित सिग्नलिंगचे काम. निविदा क्रमांक: SUR-N-T-2026-27-15 कामाची अंदाजीत रक्कम: रु. 82,68,713.84 निविदा फॉर्म फी: निरंक (काहीही नाही) बयाणा रक्कम (EMD) जमा करणे: रु. 1,65,400 काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 25/06/2026 रोजी दुपारी 15.30 नंतर. याचा सविस्तर तपशील ireps वेबसाइटवर उपलब्ध आहे. यामध्ये काही सुधारणा/शुद्धीपत्रक असल्यास ते केवळ वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केले जाईल. फक्त ऑनलाइन निविदाच स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टाद्वारे/ई-मेल, फॅक्स किंवा प्रत्यक्ष हाताने दिलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदाकारांना विनंती आहे की त्यांनी कंपनीच्या नावाने 'क्लास III डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट' (Class III Digital Signature Certificate) मिळवावे आणि त्याची www.ireps.gov.in वर नोंदणी करावी. बयाणा रक्कम (EMD) नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटीच्या (Bank Guarantee) स्वरूपात स्वीकारली जाईल आणि मूळ बँक गॅरंटी, बिड्स (निविदा) सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजे बिड्स सादर करण्याची अंतिम तारीख वगळून), निविदा दस्तऐवजात दर्शविल्या प्रमाणे नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकडे स्वतः जाऊन जमा करावी लागेल. अधिक तपशीलासाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

**डीआरएम एस अँड टी शाखा, सोलापूर**
20

**आपली जनावरे रेल्वे लाईनपासून दूर ठेवा.**

**Public Notice**

Hereby notified to all the people, especially the people of Solapur city, that : District and Sub-District North Solapur, within the limits of the Solapur Municipal Corporation, situated at South Kasba Peth, bearing City Survey No. 706A and Municipal Nos. 656/657, admeasuring area 165.61 sq. meters, whereas as per the City Survey Record admeasuring 162.40 sq. meters, together with construction thereon consisting of basement and staircase, ground floor comprising hall, kitchen, bedroom, dining room, pooja room, toilet, W.C., bathroom and staircase, and first floor comprising hall, three bedrooms, balcony, three toilets and staircase, having total constructed area of 238.62 sq. meters. Along with the right of way and parking easement for ingress and egress from the northern side through the land bearing City Survey No. 704 to reach the municipal road situated on the eastern side. The boundaries thereof are as East: Municipal Road and property bearing City Survey No. 706B, South Property bearing City Survey No. 706B, West: Property bearing City Survey No. 705 and North: Property bearing City Survey No. 704

With reference to the above-mentioned property, 1) Smt. Shantabai Manikrao Mahindrakar 2) Manoj Manikrao Mahindrakar 3) Bharat Manikrao Mahindrakar 4) Shri. Bhushan Manikrao Mahindrakar 5) Shri. Nilesh Nandkumar Mahindrakar and 6) Smt. Indramani Nandkumar Mahindrakar have executed registered Sale Deed bearing No. 520/2009 dated 27/01/2009 in favour of Shri. Parasram Pamandas Nagdev The said Sale Deed was kept by us in our residential house. However, the original Sale has gone missing from the house. Despite making a thorough search, our clients could not find the said original Will anywhere.

In this regard, my client has lodged a report regarding the missing document before the Faujdar Chawadi Police Station, Solapur City Police, and the same has been recorded as a Found/Missing Article Report dated 25/05/2026 in respect of the original Sale Deed bearing No. 520/2009 dated 27/01/2009.

Therefore, as stated above, this cautionary public notice is being issued so that no person may misuse the missing Sale Deed in any manner whatsoever. Further, if the original Sale Deed bearing No. 520/2009 is found by anyone, they are requested to contact our clients at the address mentioned below. This public Notice of caution was issued on 26/05/2026

sd/-
**Vicky B. Ayanchi**
**B.A. LL.B. Advocate**
**Lawyers Chamber No. 14, District Court Compound, .**
**Solapur Mo. No. 7038204204**

**IDFC FIRST Bank Limited**
**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**सिक्युरिटायझेशन अँड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ च्या कलम १३ (२) अन्वये नोटीस**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक** लिमिटेड (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** या नावाने ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेले तारण कर्ज घेतले आहे. खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्ता गहाण (तारण) ठेऊन सुरक्षित करण्यात आली आहेत. ते संबंधित कर्ज कराराच्या अटी व शर्तींचे पालन करण्यास अपयशी ठरल्यामुळे आणि त्यांच्या खात्यातील व्यवहार अनियमित झाल्यामुळे, आरबीआय च्या मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे त्यांचे कर्ज खाते एनपीए (NPA - अनुत्पादक मालमत्ता) म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. त्यांच्याकडून **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** या नावाने ओळखली जाते) ला देणे असलेली थकबाकी जारी करण्यात आलेल्या संबंधित नोटिसीमध्ये नमूद केली आहे, ज्याचा तपशील खालील तक्त्यामध्ये अधिक स्पष्टपणे दिला आहे. तसेच सदर रक्कमेवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून करारातील दराप्रमाणे आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिसीसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 109543485 | गृहकर्ज | 1. बंडू बबन मिटकल<br>2. स्वाती बंडू मिटकल | 08/04/2026 | INR 4,02,547.36/- |
| **मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत नंबर ३० मधील ती सर्व जागा आणि भूखंड, एकूण क्षेत्रफळ ११२० स्केअर फूट, मौजे गाव : मिटकलवाडी, ग्रामपंचायत मितकलवाडीच्या हद्दीत, तालुका : माढा, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र - ४१३२११, आणि ज्याच्या चतु:सीमा : पूर्व - बिंटू मिटकल, पश्चिम - मारुती मितकल, उत्तर रस्ता, दक्षिण - स्वतःचे क्षेत्र. | | | | | |

याद्वारे तुम्हाला आवाहन करण्यात येते की, तुम्ही वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** या नावाने ओळखली जाते) ला त्यांच्या संबंधित तारखांपासून करारातील व्याजाच्या दरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींसह ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत रक्कम अदा करावी. तसे न केल्यास, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडची** थकबाकी वसूल करण्यासाठी वरील गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अन्वये पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यास स्वाक्षरीकर्ता बांधील असेल. तसेच, सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अन्वये तुम्हाला सदर सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्टा (लीझ) किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास प्रतिबंधित करण्यात येत आहे.

**स्वाक्षरी/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, ज्याचे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीनीकरण झाले असून सध्या ते आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 27/05/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

**महाराष्ट्र महसूल व वन विभाग**
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**
**संकलन अभिलेख कक्ष**
दूरध्वनी नं. ९४२१९६९५१६ Email- tahakkalkot@.gmail.com

जा.क्र. २०२६/जन्म-मृत्यू/कावि/९६८/२०२६ दि. २६/०५/२०२६

**जाहिर प्रसिध्दीकरण**

**श्री. शिवराज गुंडप्पा रड्डे - अर्जदार**
रा. काजीकणबस, ता. अक्कलकोट
विरुध्द
**जन्म मृत्यू नोंदणी कार्यालय, - सामनेवाला**
**ग्रामपंचायत, काजीकणबस ता अक्कलकोट**

ज्याअर्थी, यातील शिवराज गुंडप्पा रड्डे रा. काजीकणबस, ता.अक्कलकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करून त्यांची मुलगी सानिका शिवराज रड्डे हिचा जन्म दि. ०३/११/२००९ रोजी मौजे काजीकणबस, ता. अक्कलकोट येथे राहत्या घरी झाला आहे. परंतु माझ्या मुलीच्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या मुलीच्या जन्माची नोंद सानिका शिवराज रड्डे या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म-मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३(२)(३) अन्वये मा. तहसीलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि.२१/०७/२०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांच्या मुलीचा जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात आपण स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाचीही काही हरकत अथवा म्हणणे न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. २६/०५/२०२६ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

शिक्का

**सही/-**
**तहसीलदार**
**अक्कलकोट**




# हैदराबादविरुद्ध आज राजस्थानची ‘करो या मरो’ची लढत

◆ **मुल्लानपूर, २६ मे**

मागील पाच सामन्यांपासून विजयी घोडदौड करीत असलेला आणि आक्रमक फलंदाजाचा समावेश असलेल्या मजबूत सनरायझर्स संघाविरुद्ध उद्या बुधवारी राजस्थान रॉयल्स संघ ‘करो या मरो’ची लढत लढणार आहे. यंदाच्या इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेट स्पर्धेतील हा एलिमिनेटरचा सामना न्यू चंदीगडमधील मुल्लानपूरस्थित महाराजा यादवेंद्र सिंह आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर दिवस-रात्र सत्रात खेळला जाणार आहे. हा सामना खेळताना राजस्थान संघ त्यांच्यातुलनेत कमजोर वाटत असला तरी हैदराबादला १५ वर्षीय वैभव सूर्यवंशी व वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चर यांच्यापासून सावध राहावे लागणार आहे.

यंदाच्या स्पर्धेत हैदराबाद संघाची सुरुवात चांगली राहिली नाही. मात्र, प्राथमिक साखळी फेरीतील दुसऱ्या टप्प्यात या संघाला सूर गवसला. नियमित कर्णधार पॅट कमिन्स संघात परतल्यामुळे त्याचा फायदा या संघाला चांगला झाला. त्याच्या नेतृत्वात या संघाने गेल्या सात सामन्यांपैकी पाच सामन्यांमध्ये विजय संपादन केला. प्राथमिक साखळी फेरीत हैदराबाद संघाने राजस्थान संघाला दोनदा पराभूत केले. त्यामुळे कमिन्स आणि त्याच्या चमूला या महत्त्वपूर्ण व दबाव असलेल्या बाद फेरीच्या सामन्यात मानसिकदृष्ट्या चांगली सुदृढता प्राप्त झाली आहे.

पात्रता फेरी आम्ही आधीच गाठायला हवी होती. मात्र, आम्हाला त्यासाठी चांगलीच प्रतीक्षा करावी लागली. अखेर आमचा संघ हे ध्येय गाठू शकला त्यामुळे आता आम्ही आणखी पुढे जाण्यासाठी प्रयत्न करू, असे राजस्थानचा कर्णधार रियाग पराग म्हणाला. राजस्थान संघातील आघाडीचा फलंदाज सूर्यवंशी (५८३ धावा), यशस्वी जयस्वाल (३९७) व ध्रुव जुरेल (४५८) यांनी सर्वाधिक काढल्या आहेत. हैदराबाद संघाच्या फलंदाजांनीही तोडीस तोड फलंदाजी केली आहे. त्यांच्या अभिषेक शर्मा (५६३ धावा), ट्रॅव्हिस हेड (३९३) आणि ईशान किशन (५६९) यांनीही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. याच संघातर्फे चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या हेनरिक क्लासेनची कामगिरी दुर्लक्षून चालणार नाही. आतापर्यंत सर्वोत्कृष्ट फलंदाजी करताना क्लासेनने सर्वाधिक ६०६ धावांची नोंद केली आहे. दोन्ही संघांतील आघाडीच्या फलंदाजांमध्ये आक्रमक फलंदाजीची क्षमता असतानाही जयस्वाल आणि हेड यांना मात्र त्यांच्या कामगिरीत अपेक्षित सातत्य राखता आलेले नाही.

हैदराबाद संघ स्पर्धेतील सर्वाधिक आक्रमक संघ म्हणून ओळखला जातो. त्यामुळेच राजस्थानचे मुख्य प्रशिक्षक कुमार संगकारा यांना या संदर्भातील योजनेबाबत विचारण्यात आले. त्यावेळी ते म्हणाले, त्यांचा संघ खूप चांगला आहे. ते खरंच चांगली फलंदाजी करीत आहेत. त्यांना स्वत:वर मोकळ्या मनाने खेळण्याचा विश्वास आहे आणि तसे ते खेळतही आहे. आम्हाला आपले सातत्य कायम राखावे लागणार आहे. आम्हाला शिस्तीत राहावे लागेल. आम्हाला ही जाणीव आहे की आमचा प्रतिस्पर्धी संघ १२० ते १३० धावा काढणार नाही. आम्हाला आपली लाईन आणि लेग्थबाबत आक्रमक राहावे लागणार आहे.

श्रीलंकेचा एकेकाळचा दिग्गज क्रिकेटपटू असलेल्या संगकाराने विश्वास व्यक्त केला की, पॉवरप्लेमध्ये सर्वाधिक फलंदाज बाद करणारा आर्चर पुन्हा एकदा सामना विजेता कामगिरी बजावेल. अशीच कामगिरी त्याने वानखेडेवर मुंबई इंडियन्सविरुद्ध ‘करो या मरो’ सामन्यात केली होती. नांद्रे बर्गर आणि बृजेश शर्मा यांनीही वेगवान गोलंदाजीच्या विभागात आर्चरला चांगली साथ दिली आहे. युवा लेगस्पिनर यश राज पुंजा आपली पहिली आयपीएल स्पर्धा खेळताना रवी बिष्णोईच्या पुढे निघून गेला आहे आणि स्पर्धेत तो प्रमुख स्पिनर म्हणून समोर आला आहे. अनुभवी रवींद्र जडेजाकडून फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही क्षेत्रात चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे. धडाकेबाज फलंदाजी करणारा सूर्यवंशी पुन्हा एकदा कमिन्स, ईशान मलिंगा आणि साकिब हुसैनसारख्या गोलंदाजांविरुद्ध आक्रमक फलंदाजी करताना अजीबात घाबरणार नाही. जर या युवा फलंदाजाने पॉवरप्लेमध्ये चांगली सुरुवात करून दिली तर हा संघ प्रतिस्पर्धी संघाकडून सामना खेचून आणू शकतो.

मुल्लानपूरच्या या मैदानावर यंदा जे चार सामने खेळले गेले त्यावर फलंदाजांनी हुकूमत गाजविली आहे. त्यापैकी तीन सामन्यांत २२० पेक्षा अधिक धावा झाल्या आहेत. यात यजमान पंजाब किंग्ज संघाने काढलेल्या २५४ धावांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**एलिमिनेटर फेरी**
**राजस्थान रॉयल्स वि. सनरायझर्स हैदराबाद**
**स्थळ** : महाराजा यादवेंद्र सिंह आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, मुल्लानपूर, न्यू चंदीगड
**वेळ** : सायं. ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# सिंधू सिंगापूर ओपनच्या दुसऱ्या फेरीत

◆ **सिंगापूर, २६ मे**



भारताची स्टार बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू हिने मंगळवारी पाचवे मानांकन असलेल्या कुसुमा वरदानी हिला सरळ सेट्समध्ये पराभव करीत येथे सुरू असलेल्या सिंगापूर ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळविला आहे.

दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती ३० वर्षीय सिंधूने १० लाख डॉलरच्या बक्षीस राशी असलेल्या या सुपर ७५० स्पर्धेच्या पहिल्या फेरीत जागतिक क्रमवारीत सहाव्या स्थानी असलेल्या इंडोनेशियाच्या कुसुमाला २१-१७, २१-१८ असे पराभूत केले. माजी विश्व विजेत्या सिंधूची पुढच्या फेरीतील लढत जपानच्या रिको गुंजीविरुद्ध होणार आहे.

सात्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या आशियाड क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या जोडीने पुरुष दुहेरीच्या अभियानाची सुरुवात विजयाने केली. पहिल्या फेरीतील सामन्यात या जोडीने जागतिक क्रमवारीत २५ व्या स्थानी असलेल्या मलेशियाच्या चेन झी यी आणि प्रेस्ली स्मिथ या जोडीवर २६-२८, २१-१५, २१-१३ अशी मात दिली. जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर असलेल्या या भारतीय जोडीची दुसऱ्या फेरीतील लढत चीन तायपेयीच्या ली झे हुई आणि यांग पो सुआन विरुद्ध चीनच्या लियू यांग व हुआंग डी की या लढतीतील विजयी जोडीविरुद्ध होईल.

आशियाई अजिंक्यपद स्पर्धेतील अंतिम सामन्यात स्थान मिळविणारा भारतीय बॅडमिंटनपटू आयुष शेट्टी मात्र ६५ मिनिटांच्या लढतीनंतर पराभूत झाला. त्याला पुरुष एकेरीच्या लढतीत विश्व अजिंक्यपद स्पर्धेतील कांस्यपदक विजेता व्हिक्टर एक्सेलसनविरुद्धच्या लढतीत २१-११, १४-२१, १२-२१ असा पराभव स्वीकारावा लागला. युवा खेळाडू उन्नती हुडा महिला एकेरीत, कविप्रिया सेल्वम व सिमरन सिंघी, अश्विनी भट व शिखा गौतम महिला दुहेरीत पहिल्या फेरीत पराभूत झाल्यामुळे स्पर्धेबाहेर झाल्या.

लक्ष्य सेन, एच. एस. प्रणय आणि मालविका बन्सोड यांच्या स्पर्धेतील अभियानाची सुरुवात बुधवारपासून होणार आहे. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### फ्रीस्टाईलमध्ये अक्षय, विक्कीला सुवर्णपदक

**डा नेंग (व्हिएतनाम)** : २३ वर्षे वयोगटाच्या आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय कुस्तीपटूंनी आपली उत्कृष्ट कामगिरी कायम राखत सोमवारी फ्रीस्टाईल प्रकारात पहेलवान अक्षय ढेरे आणि विक्की यांनी सोनेरी यश संपादन केले. अक्षयने ५७ किलो वजनगटात कझाकिस्तानच्या येलेमान अमंगेलदी याला ४-२ असे पराभूत करीत विजेतेपद पटकाविले, तसेच विक्कीने नंतर भारतीय गोटाचा आनंद द्विगुणित केला. त्याने ९७ किलो वजनगटात उझबेकिस्तानच्या जेरजोद पोयोनोवविरुद्धची लढत ७-५ अशी जिंकून बाजी मारली. महिलांच्या ५३ किलो गटातील अंतिम लढतीत भारताच्या मुस्कानने व्हिएतनामच्या माई लिन्ह गुएनविरुद्ध ६-२ असा सोपा विजय मिळविला व सुवर्णपदक जिंकले. तपस्याने ५७ किलो गटात आपला दबदबा कायम राखत कझाकिस्तानच्या अल्टीन शागायेवाविरुद्ध ४-० अशी एकतर्फी आघाडी घेतली असताना ‘बाय फॉल’ने (पटकनी देणे) विजय संपादन केला. भाग्यश्री फेंड, पुलकित यांनीही आपापल्या प्रतिस्पर्ध्यांना पराभवाचा धक्का देत सुवर्णपदकांची मालिका कायम राखली. अमृता पुजारी हिला मात्र रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

### बुद्धिबळपटू श्रेयांश सोमय्याची विजयी दौड कायम

**मुंबई** : अग्रमानांकित श्रेयांश सोमय्याने येथे आयोजित मुंबई फिडे रेटेड अखिल भारतीय बुद्धिबळ मास्टर्स स्पर्धेतील चौथ्या फेरीत निखिल जोशीचा पराभव करीत स्पर्धेतील आपली विजयी दौड कायम राखली आहे. अन्य लढतीत रेयांश व्यंकट याने समर्थ पाटकरला पराभूत करीत आपले अव्वल स्थान कायम राखले. कुश अजय अग्रवालने सक्षम भारद्वाजविरुद्ध महत्त्वपूर्ण विजय मिळविला. राजवीर नाहर याने दीपक जाधवचा पराभव करीत आपले दावेदारी कायम राखली आहे. जान्हवी सोनेजी व आशिष जैन यांची लढत बरोबरीत सुटली, तर मयूरेश पारकरने निहाल भोसलेवर मात दिली. ओम देवरुखकर, आर्यन सिस्टा, मान्या बलानी, अधवन ओसवाल यांनीही आपापल्या प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करीत पूर्ण गुण मिळविला.

### गोळाफेकपटू गिल राष्ट्रकुल स्पर्धेसाठी पात्र

**रांची** : मध्य प्रदेशच्या समरदीप सिंह गिलने येथे आयोजित राष्ट्रीय वरिष्ठ गट फेडरेशन चषक स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी पुरुषांच्या गोळाफेक स्पर्धेत पंजाबचा अनुभवी खेळाडू तजिंदरपाल सिंह तूर याला मागे सारत सुवर्णपदक जिंकले. या विजयासह गिलने भारतीय ॲथ्लेटिक्स महासंघाद्वारे निर्धारित केलेल्या ग्लास्गो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील २०.३६ मीटरची पात्रता सिद्ध केली आणि स्पर्धेतील आपला प्रवेश निश्चित केला. आशियाई स्पर्धेतील दोनवेळेचा विजेता तूरने २०.०७ मीटर पहिला थ्रो करीत आपले अभियान सुरू केले. मात्र, २५ वर्षीय गिलने पहिल्याच प्रयत्नात २०.४६ मीटर गोळा फेकला. त्याची ही विजयी फेक शेवटपर्यंत कायम राहिली. २१.७७ मीटरचा राष्ट्रीय विक्रम करणाऱ्या तूरने नंतर प्रयत्न केले. मात्र, त्याला यश आले नाही. त्याची अंतिम नोंद २०.०६ मीटरच झाली. त्यामुळे त्याला दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. कर्नाटकचा यशस पी आणि त्रिवेंद्रमचा संतोष कुमार यांनीही ४०० मीटर अडथळा शर्यतीतील आपली राष्ट्रकुलची पात्रता सिद्ध केली. यशसने ४९.०० सेकंदची वेळ नोंदवून सुवर्ण जिंकले, तर संतोष कुमारने ४९.०६ सेकंदसह दुसरे स्थान मिळविले. पुरुषांच्या भालाफेकचे सुवर्ण महाराष्ट्राचा प्रतिभावान खेळाडू शिवम लोहकरेने पटकाविले. त्याचा सोनेरी थ्रो ८१.७१ मीटरचा राहिला. पुरुष भाला फेकची राष्ट्रकुल स्पर्धेची पात्रता फेक ८२.६१ मीटरची आहे. त्यामुळे तो पात्र होऊ शकला नाही.

### पन्नीरसेल्वमला बुद्धिबळात दुहेरी यश

**नवी दिल्ली** : भारतीय ग्रॅण्डमास्टर इनियान पन्नीरसेल्वम याने श्रीलंकेत आयोजित राष्ट्रकुल बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत दुहेरी यश संपादन केले. त्याने रॅपिड आणि ब्लिट्ज या दोन्ही प्रकारांच्या स्पर्धेत बाजी मारत डबल सुवर्ण हस्तगत केले. तामिळनाडूच्या या खेळाडूने दोन्ही प्रकारांतील सात फेऱ्यांमध्ये प्रत्येकी ६.५ गुण हस्तगत करीत दोन्ही प्रकारांत विजेता होण्याचा मान मिळविला. रॅपिडमध्ये ग्रॅण्डमास्टर श्रीहरिला रौप्य व मित्राभा याला कांस्यपदक मिळाले. ब्लिट्जमध्ये ग्रॅण्डमास्टर रोहित कृष्णाने रौप्य व श्रीहरिने कांस्य जिंकले. मित्राभाने क्लासिकलचे सुवर्ण प्राप्त केले, तर या प्रकारात श्रीलंकेचा रानिंदू लियानगे व श्रीहरि अनुक्रमे रौप्य व कांस्य पदकाचे मानकरी ठरले. या स्पर्धेत भारत, श्रीलंकेसह दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, मॉरिशस, मालदीव, पाकिस्तान, बांगलादेश, केनिया, मलेशिया, सिंगापूर, स्कॉटलॅण्ड आणि कॅनडा या देशांचे खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते.

# रजतची कर्णधाराला साजेशी फलंदाजी

## बंगळुरूच्या पाच बाद २५४ धावा

◆ **धर्मशाला, २६ मे**



३३ चेंडूंत नाबाद ९३ धावा काढणारा कर्णधार रजत पाटीदार

गुजरात टायटन्सविरुद्ध इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेतील पहिला क्वालिफायर सामना खेळताना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकांत पाच फलंदाज गमावून २५४ धावा केल्या होत्या. कर्णधाराला साजेशी फलंदाजी करीत रजत पाटीदारने केलेल्या नाबाद ९३ धावा, तसेच विराट कोहली व कृणाल पांड्या यांनी केलेल्या प्रत्येकी ४३ धावा, हे या डावाचे वैशिष्ट्य ठरले.

येथे आयोजित या महत्त्वपूर्ण सामन्यात गुजरात संघाने नाणेफेक जिंकली आणि प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. बंगळुरू संघाने प्रथम फलंदाजी स्वीकारल्यानंतर व्यंकटेश अय्यर आणि विराट कोहली यांनी डावाला प्रारंभ केला. दोघांनी सलामीला २१ धावांची भागी केली असताना कगिसो रबाडाने आपल्या पहिल्याच षटकात व्यंकटेशला झेलबाद केले. मिड ऑफवरून जाणारा चेंडू शुभमन गिलने धावांत जाऊन अचूक टिपला. व्यंकटेशने अवघे सात चेंडू खेळून काढताना १९ धावा केल्या. यात तीन चौकार व एका षटकाराचा समावेश होता. त्या आधी व्यंकटेशने पहिल्याच षटकात तीन चौकार हाणले होते. त्याची जागा देवदत्त पडिक्कलने घेतली. देवदत्तने विराटला सुरेख साथ देत धावफलक हलता ठेवला. दोघांनी दुसऱ्या गड्यासाठी ७२ धावा जोडल्या. देवदत्तनेही आल्या आल्या सलग तीन चौकार ठोकले. नवव्या षटकात जॅसन होल्डरने सामन्याचा नूरच पालटविला. त्याने आधी विराट कोहलीला त्रिफळाचित केले आणि नंतर त्याच षटकात देवदत्तला यष्टिरक्षक जोस बटलरकरवी झेलबाद केले. या षटकात अवघ्या चारच धावा निघाल्या आणि महत्त्वाचे दोन फलंदाज बाद झाले.

यावेळी संघाची धावसंख्या तीन बाद ९६ होती. विराटने २५ चेंडू खेळताना पाच चौकार व एका षटकाराच्या साह्याने ४३ धावा केल्या. देवदत्तने १९ चेंडूंत ३० धावांचे योगदान दिले. यात पाच चौकारांचा समावेश होता. दोन दिग्गज बाद झाल्यानंतर कर्णधार रजत पाटीदारने कृणाल पांड्याच्यासाथीने डाव सावरण्याचा प्रयत्न केला. या दोघांनी पाचव्या गड्यासाठी ९५ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. या दोघांनी १२ व्या षटकात आपल्या संघाच्या १२५ धावा पूर्ण केल्या. रबाडाने साई सुदर्शनच्या हाती पांड्याला बाद करून ही जोडी तोडली. कृणालनेही ४३ धावा केल्या. त्याच्या २८ चेंडूंच्या फलंदाजीत पाच चौकार व दोन षटकारांचा समावेश होता. रजतच्या साथीला टिम डेव्हिड आला. जास्तीत जास्त आक्रमक फलंदाजी करीत रजत पाटीदारने नाबाद फलंदाजी करताना ३३ चेंडूंमध्ये ९३ धावा हाणल्या. यात पाच चौकार व नऊ षटकारांचा समावेश होता. दरम्यान, टिम डेव्हिडलाही (४) प्रसिध कृष्णाने त्रिफळाचित केले. कर्णधाराच्या साथीला यष्टिरक्षक फलंदाज जितेश शर्मा आला. त्यानेही ठोकाठोकी केली. त्याने पाच चेंडूंत प्रत्येकी एक चौकार व षटकारासह नाबाद १५ धावा केल्या. या महत्त्वपूर्ण सामन्यात बंगळुरूने बाजी मारली तर त्यांचा अंतिम सामन्यातील प्रवेश निश्चित समजला जाईल. (वृत्तसंस्था)

# गुकेश, प्रज्ञानंद टायब्रेकरमध्ये विजयी

◆ **ओस्लो, २६ मे**



विश्वविजेता डी. गुकेश याने नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत चांगली सुरुवात करीत एक तगड्या आणि तणावपूर्ण मॅराथॉन लढतीत विन्सेंट कीमरविरुद्ध खेळताना विजय प्राप्त केला. तसेच अन्य भारतीय बुद्धिबळपटू आर. प्रज्ञानंद याने वेस्ली सो याला पराभूत केले. दुसरीकडे जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेला मॅग्नस कार्लसन याला मात्र पहिल्या फेरीत पराभवाचा धक्का सहन करावा लागला.

सुमारे पाच तास चाललेल्या १४४ चालींच्या सामन्यानंतर गुकेशने आर्मगेडन (मुख्य सामना बरोबरीत सुटल्यानंतरचा टायब्रेकर सामना) लढतीत विजयासह १.५ गुणांची कमाई केली. कीमरला मात्र क्लासिकल लढत बरोबरीत सुटल्यामुळे एका गुणावर समाधान मानावे लागले. या मॅराथॉन लढतीत भारतीय खेळाडू गुकेश शेवटच्या क्षणी काहीसा घाबरलेला दिसून आला. प्रतिस्पर्धी जर्मन खेळाडूने क्लासिकल लढतीत संयम कायम राखला. टायब्रेकरमध्ये मात्र सर्व दबाव झुगारून गुकेशने विजय खेचून आणण्यासाठी विलंब केला नाही.

प्रज्ञानंद आणि अमेरिकी ग्रॅण्डमास्टर वेस्ली सो यांचा क्लासिकल सामना बरोबरीत राहिला. मात्र, भारतीय खेळाडूने आर्मगेडन म्हणजे टायब्रेकरमध्ये शानदार विजय मिळविला. स्पर्धेत जास्त चर्चेत विद्यमान विजेता कार्लसनचा पराभव राहिला. क्लासिकल लढतीत कार्लसनला अलीरेजा फिरोजा याने पराभवाचा धक्का देत तीन गुणांची कमाई केली. सामन्यात बहुतांश वेळा कार्लसनचे नियंत्रण होते. मात्र, वेळेच्या अभावी त्याच्या हातून मोठी चूक झाली आणि त्याचा फायदा फिरोजाला मिळाला, सोबत त्याला आघाडीही घेता आली. फ्रान्सचा या खेळाडूने मिळालेल्या संधीचे सोने करीत विजय मिळविला आणि गुणतालिकेत आघाडीही घेतली.

अशाप्रकारे फिरोजाने दहा फेऱ्यांच्या या स्पर्धेत तीन गुणांसह आपल्या अभियानाची सुरुवात केली. गुकेश आणि प्रज्ञानंद प्रत्येकी १.५ गुणांसह संयुक्तरीत्या दुसऱ्या स्थानी आहेत. वेस्ली सो आणि कीमर यांच्या खाती प्रत्येकी एक गुण जमा आहे, तर कार्लसनला अद्याप गुणांचे खाते उघडता आले नाही. (वृत्तसंस्था)

**दिव्या देशमुखचा विजय**

स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करीत असलेल्या नागपूरची बुद्धिबळपटू दिव्या देशमुखनेही पहिल्या फेरीत टायब्रेकरमध्ये विजयाची नोंद केली. महिला विश्वविजेती ज्यू वेनुजुनविरुद्ध आर्मगेडन लढतीत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत दिव्याने हा विजय मिळविला. महिला विभागात बिबिसारा असाउबायेवाने भारतीय बुद्धिबळपटू कोनेरू हम्पीविरुद्धची क्लासिकल लढत जिंकली. विद्यमान विजेती ॲना मुझिचुक हिने झू जिनर हिला टायब्रेकरमध्ये पराभूत केले.

# वेस्ट इंडीज दौऱ्यासाठी श्रीलंका संघ जाहीर

◆ **कोलंबो, २६ मे**

श्रीलंका क्रिकेट मंडळावर असलेल्या हंगामी प्रशासनाद्वारे नियुक्त निवड समितीने सोमवारी वेस्ट इंडीज दौऱ्यावर जाऊन विविध प्रकारांच्या क्रिकेट सामन्यांच्या मालिका खेळणाऱ्या आपल्या वेगवेगळ्या तीन राष्ट्रीय संघांची घोषणा केली आहे. या दौऱ्यात श्रीलंकेचा संघ यजमान संघाविरुद्ध दोन कसोटी, तीन एकदिवसीय सामने तसेच एक टी२०चा आंतरराष्ट्रीय सामना खेळणार आहे.

कसोटी संघात धनंजय डिसिल्वा याला कर्णधारपदी कायम ठेवण्यात आले आहे, तर मधल्या फळीतील फलंदाज कामिंदु मेंडिस याला उपकर्णधार करण्यात आले आहे. मेंडिस मर्यादित षटकांच्या सामन्यांसाठीही संघाचा उपकर्णधार राहणार आहे. मर्यादित षटकांच्या सामन्यांत सहभागी होणाऱ्या संघाच्या नेतृत्वाची धुरा कुसल मेंडिसकडे सोपविण्यात आली आहे.

फलंदाज पासिंदू सूरियाबंदरा आणि डाव्या हाताचा वेगवान गोलंदाज इसिथा विजेसुंदरा या आंतरराष्ट्रीय सामन्यांचा अनुभव नसलेल्या दोन खेळाडूंचा कसोटी संघात समावेश करण्यात आला आहे. मर्यादित षटकांच्या सामन्यासाठी उंचपुरा डाव्या हाताचा फलंदाज लसिथ क्रूसपुले याला संघात स्थान देण्यात आले आहे. त्याने गेल्या महिन्यात न्यूझीलंड अ संघाविरुद्ध खेळताना काढलेल्या शतकामुळे त्याची संघात वर्णी लागली आहे. मागील टी२० विश्वचषक स्पर्धेत संघाचे नेतृत्व करणाऱ्या दासुन शनाकाला फक्त टी२० संघातच स्थान देण्यात आले आहे. तसेच चरिथ असलंका यालाही केवळ एकदिवसीय सामन्याच्या संघात समाविष्ट करण्यात आले आहे. वेगवान गोलंदाज नूवान तुषाराचा टी२० संघात समावेश करण्यात आला आहे. आयपीएल स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून खेळण्यासाठी परवानगी नाकारल्यामुळे नूवानने श्रीलंका क्रिकेट मंडळाविरुद्ध न्यायालयात धाव घेतली होती. (वृत्तसंस्था)

# योगासनाचा ऑलिम्पिक प्रवेशासाठी प्रयत्न करू : मांडविया



राष्ट्रीय योगासन स्पर्धेच्या शुभंकरचे लोकार्पण करताना केंद्रीय मंत्री मनसुख मांडविया. सोबत मान्यवर

## पहिली विश्व अजिंक्यपद स्पर्धा ४ जूनपासून

◆ **नवी दिल्ली, २६ मे**

२०३६ सालच्या ऑलिम्पिक स्पर्धेचे यजमानपद भारताला मिळावे, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. याचाच एक भाग म्हणून योगासनाला ऑलिम्पिक स्पर्धेच्या खेळांच्या यादीत समाविष्ट करण्यासाठीही आम्ही जोरदार प्रयत्न करणार असल्याची माहिती केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी आज येथे दिली. पहिल्या विश्व अजिंक्यपद स्पर्धेच्या घोषणेप्रसंगी ते बोलत होते. ही स्पर्धा येत्या ४ ते ८ जूनदरम्यान अहमदाबाद येथे खेळली जाणार आहे.

जागतिक स्तरावर योगासन या खेळाची ओळख व्हावी म्हणून आयोजित या विश्व अजिंक्यपद स्पर्धेत ६० पेक्षा जास्त देशांचे सुमारे ५२९ खेळाडू सहभागी होणार आहेत. यात भारतातील ११४ योगासनपटूंचा समावेश राहणार आहे. एका चाचणीनंतर भारतीय पथकाची निवड करण्यात आली आहे. या निवड झालेल्या योगासनपटूंचे सराव शिबिर अहमदाबादच्या वीर सावरकर क्रीडा परिसरात सुरू आहे. २०३० साली अहमदाबाद येथे आयोजित राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत योगासनाचा एक पारंपरिक क्रीडा प्रकार म्हणून समावेश केला जाणार आहे. आम्ही २०३६ च्या ऑलिम्पिक स्पर्धेची दावेदारी सादर करीत आहोत आणि या खेळाच्या ऑलिम्पिक समावेशासाठीही आम्ही प्रयत्न करणार आहोत. त्यासाठी भारत सरकार आणि योगासन राष्ट्रीय महासंघ संयुक्तरीत्या प्रयत्नरत आहेत, अशी माहितीही मांडविया यांनी दिली.

आंतरराष्ट्रीय महासंघ स्थापन करण्यासाठी कायदेशीररीत्या ७५ देशांच्या समर्थनाचे स्वाक्षरी पत्र असणे गरजेचे असते. त्यानंतरच खेळाचा समावेश करण्यासाठी आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीकडे अर्ज केला जाऊ शकतो, असेही मांडविया यांनी सांगितले. विश्व योगासनचे उपाध्यक्ष उदित सेठ यांनीही त्याला दुजोरा दिला.

आमचे लक्ष्य या खेळाचा समावेश २०३२ च्या ऑलिम्पिक स्पर्धेत प्रदर्शनी खेळ म्हणून केला जावा, असे आहे. त्यानंतर २०३६ साली त्याला पदक स्पर्धा बनविण्याचा आमचा प्रयत्न राहील, असेही सेठ म्हणाले. या विश्व अजिंक्यपद स्पर्धेत आणखी काही देशांचे स्पर्धक सहभागी झाले असते. मात्र, आखाती युद्धामुळे त्यांनी आपली नावे मागे घेतली आहे, अशी माहिती विश्व योगासनचे महासचिव जयदीप आर्य यांनी दिली. (वृत्तसंस्था)

# वावरिंकाने घेतला स्पर्धेचा भावपूर्ण निरोप

## फ्रेंच ओपनच्या पहिल्या फेरीत पराभूत



स्पर्धेच्या निरोपप्रसंगी चाहत्यांना अभिवादन करताना स्टेन वावरिंका

◆ **पॅरिस, २६ मे**

स्वित्झर्लंडचा स्टार टेनिसपटू स्टेन वावरिंका याने फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेच्या पहिल्या फेरीत पराभूत झाल्यानंतर या स्पर्धेचा भावपूर्ण निरोप घेतला. ४१ वर्षीय वावरिंकाने आधीच जाहीर केले होते की, यंदा आपण या स्पर्धेचा निरोप घेणार आहोत. त्याला पहिल्या फेरीच्या सामन्यात नेदरलॅण्डच्या जेस्पर डी जोंग याने ६-३, ३-६, ६-३, ६-४ असे पराभूत केले.

दुसरीकडे १९ वर्षीय स्पॅनिश टेनिसपटू राफेल जोदार याने आपली ही पहिलीवहिली स्पर्धा खेळताना सर्वांचे लक्ष्य वेधून घेतले. त्याने ॲलेक्झांडर कोवाचेविच याला ६-१, ६-०, ६-४ असे सहज पराभूत केले. जोदारने संपूर्ण सामन्यात केवळ पाच गेम गमावले. फ्रेंच ओपन स्पर्धेच्या पदार्पणात इतके कमी गेम नोवाक जोकोविचने २००५ साली गमावले होते. राफेल जोदारने आतापर्यंत खेळलेल्या गेल्या १९ सामन्यांपैकी १६ सामने जिंकले आहेत. तो एक वर्षांपूर्वी एटीपी रँकिंगमध्ये ७०७ व्या स्थानी होता. आज तो जागतिक क्रमवारीत २९ व्या स्थानी आहे. फ्रेंच स्पर्धेत त्याला २७ वे मानांकन मिळाले आहे.

महिला एकेरीत चार वेळेची विजेती व जागतिक क्रमवारीत तिसऱ्या स्थानी असलेल्या इगा स्वियातेक हिने पहिल्या फेरीतील सामन्यात स्पर्धेत पदार्पण करणाऱ्या इमर्सन जोन्सवर ६-१, ६-२ अशी लिलया मात दिली.

पहिल्या फेरीचा सामना जिंकल्यानंतर डी जोंग याने वावरिंकाच्या समर्थनार्थ टाळ्या वाजविण्याचा आग्रह प्रेक्षकांना केला, तेव्हा त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. वावरिंकाने २०१५ साली फ्रेंच स्पर्धेचे जेतेपद हस्तगत केले होते, तर २०१७ साली त्याला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. सामना सुरू होण्याच्या आधीही प्रेक्षकांनी उभे राहून टाळ्या वाजवत वावरिंकाचे स्वागत केले. निरोप घेण्याआधी वावरिंकाने प्रेक्षकांसोबत मॅक्सिन वेवचा आनंद लुटला. सामन्यानंतर वावरिंकाच्या स्पर्धेतील प्रवासाचा व्हिडिओ दाखविण्यात आला. या व्हिडिओत रॉजर फेडरर, राफेल नदाल, नोवाक जोकोविच, जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेला यानिक सिनर आणि विद्यमान विजेता कार्लोस अलकराज यांचे संदेश दाखविण्यात आले.

टेनिसचा निरोप घेणे सोपे नाही, असे भावपूर्ण विधान निरोपप्रसंगी वावरिंकाने केले. तो फ्रेंच स्पर्धेतून बाहेर पडला असला तरी तो आता विम्बल्डन आणि अमेरिका ओपन या ग्रॅण्डस्लॅम स्पर्धेत भाग घेणार आहे. (वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# बांधकामासोबत पर्यावरण संवर्धनावरही भर द्या; बांधकाम समितीत सूचना

## ग्रामीण भागातील विकासकामे वेळेत, गुणवत्तापूर्ण आणि लोकाभिमुख पद्धतीने पूर्ण करा; प्रत्येक इमारतीसोबत १० झाडे लावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ मे**

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव सभागृहात मंगळवारी पार पडलेल्या बांधकाम समितीच्या मासिक सर्वसाधारण सभेत ग्रामीण भागातील विकासकामे वेळेत, गुणवत्तापूर्ण आणि लोकाभिमुख पद्धतीने पूर्ण करण्यावर विशेष भर देण्यात आला. रस्ते, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्रे यांसारख्या मूलभूत सुविधांच्या कामांचा आढावा घेताना केवळ बांधकाम नव्हे, तर पर्यावरण संवर्धन आणि शासकीय मालमत्तेची गुणवत्ता टिकवण्याबाबतही महत्त्वपूर्ण सूचना सभापती तथा उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी दिल्या.



दरम्यान, या सभेत मागील बैठकीच्या कार्यवृत्तास मंजुरी देत विविध शासकीय पत्रे, परिपत्रके आणि शासन निर्णयांचे वाचन करण्यात आले. बांधकाम विभाग क्र. १ व २ यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध कामांचा एप्रिल २०२६ अखेरचा खर्च, प्रगती आणि निविदा प्रक्रियेचा विषयवार आढावा घेण्यात आला. विशेषतः ग्रामीण रस्त्यांची कामे, अंगणवाडी इमारतींचे बांधकाम आणि मंजूर विकासकामांच्या अंमलबजावणीचा वेग यावर चर्चा झाली. सभेतील सर्वाधिक लक्षवेधी निर्णय म्हणजे शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र आणि पशुवैद्यकीय दवाखान्यांची कामे पूर्ण झाल्यानंतर त्यापरिसरात किमान दहा झाडे लावण्याची सूचना. विकासकामांसोबत पर्यावरण संवर्धनाचा समतोल राखण्याचा हा प्रयत्न मानला जात आहे. याशिवाय, शाळा सुरू होण्यापूर्वी दुरुस्ती व बांधकामाची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी तडजोड होणार नाही, यासाठी उपअभियंत्यांना विशेष दक्षता घेण्यास सांगण्यात आले. मंजूर झालेल्या सर्व कामांमध्ये दर्जा राखणे, निकृष्ट कामांना आळा घालणे आणि ठरलेल्या मुदतीत कामे पूर्ण करण्याबाबतही स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

सभेत जिल्हा परिषदेचे स्वउत्पन्न वाढवण्यासाठी कोणत्या उपाययोजना राबवता येतील, यावरही चर्चा झाली. ग्रामीण विकासासाठी आर्थिक स्रोत बळकट करण्याची आवश्यकता सदस्यांनी अधोरेखित केली. या बैठकीस समितीचे सदस्य नेताजी खंडागळे, विकास बुळा, आदींसह बांधकाम विभागाचे अधिकारी, उपअभियंते आणि शाखा अभियंते उपस्थित होते. ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## महत्वाचे...

### चार दिवसात चारशे दोन केसेस, तीन लाखाचा दंड वसूल



**अक्कलकोट, दि. २६ मे**

अधिक मास हा पुरुषोत्तम मास म्हणून गणला जातो यामुळे अक्कलकोट तीर्थक्षेत्री भाविकाची वाहनांची प्रचंड संख्या आहे. यामुळे वटवृक्षस्वामी मंदिर परिसर फत्तेसिंह चौक मैंदर्गी रस्ता, भागात वाहनाची प्रचंड कोंडी होते नो पार्किंग रस्तामध्ये अडथळा ठरणारी वाहने उभी करणे अशा वाहनावर दंडात्मक कारवाईचा अक्कलकोट उत्तर पोलिसांनी पोनि दिपक भिताडे यांच्या नेतृत्वाखाली विक्रम केला आहे. चार दिवसात ४०२ केसेस दाखल करुन तीन लाख १७ हजार चारशें रुपये दंडात्मक कारवाई केली आहे. तीर्थक्षेत्र अक्कलकोटी स्वामी दर्शनार्थ गेल्या चार दिवसात प्रचंड गर्दी झाल्याचे वाहतुकीची कोंडी झाल्याचे आढळले. रस्त्यावर वाहतुकीस अडथळा नो पार्कींग जागेत वाहने लावने अशा प्रकारे २१ मे रोजी १०० केसेस ८२ हजार रुपये दंड, २२ मे रोजी ११२ केसेस ९० हजार पाचशे रुपये दंड, २३ मे रोजी ८८ केसेस ६८ हजार ७०० रुपये दंड, २४ मे रोजी १०२ केसेस करुन ७६ हजार दोनशे रुपये दंडात्मक कारवाई करण्यात आली. पोनि दिपक भिताडे यांच्या मार्गदर्शनाखाली एएसआय ईनामदार, हेड कॉन्स्टेबल मणुरे, पोलीस कॉन्स्टेबल जतकर चौधरी आदिनी चार दिवसात ही विक्रमी दंडात्मक कारवाई केली आहे .

### १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी बेपत्ता; अज्ञात व्यक्तीविरोधात तक्रार

**बार्शी, दि. २६ मे-**

बार्शी शहरातील एका परिसरातून १७ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली असून, अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याची फिर्याद बार्शी शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. मुलीची आई यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, त्या घरकाम करुन आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांना तीन मुली असून मोठी मुलगी ही बार्शी शहरातील एका महाविद्यालयात इयत्ता बारावीमध्ये शिक्षण घेत आहे. सोमवार दि. २५ मे रोजी सकाळी १०:३० वाजण्याच्या सुमारास मुलीने कॉलेजचा फॉर्म भरुन येते असे सांगून घरातून बाहेर पडली. मात्र उशिरापर्यंत ती घरी परत न आल्याने कुटुंबीयांनी तिचा शोध घेण्यास सुरुवात केली. तिच्या कॉलेजमध्ये, मैत्रिणींकडे, नातेवाईकांकडे तसेच परिसरात शोध घेतला असता ती कुठेही आढळून आली नाही. यामुळे कोणीतरी अज्ञात इसमाने फूस लावून किंवा आमिष दाखवून तिला पळवून नेल्याची खात्री झाल्याने मुलीच्या आईने बार्शी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. बेपत्ता मुलीने घरातून जाताना काळ्या-पांढऱ्या रंगाची कुर्ती, पांढऱ्या रंगाची लेगिंग, कानात सोन्याच्या रिंगा, नाकात सोन्याचे फूल, गळ्यात चांदीची चैन व पायात चॉकलेटी रंगाचे सँडल परिधान केले होते. ती हिंदी व मराठी भाषा स्पष्ट बोलते. तिच्यासोबत अंदाजे ४५ हजार रुपयांची रोकडही असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी बार्शी शहर पोलिसांकडून पुढील तपास सुरु असून, अल्पवयीन मुलीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी प्रयत्न सुरु केले आहेत.

### कामती-कुरुल मार्गावर पिकअपच्या धडकेत दुचाकी स्वार ठार

**सोलापूर, दि. २६ मे-**


भर वेगातील पिकप वाहनाच्या धडकेत कामती येथील दुचाकी स्वार जागीच ठार झाल्याची घटना मोहोळ तालुक्यातील कामती कुरुल रस्त्यावर सोमवारी रात्री आठ वाजता घडली. चेतन तानाजी पवार ( वय २४ वर्ष, रा. कामती ( बु) ता. मोहोळ) असे त्या मयत मोटरसायकल स्वाराचे नाव आहे. तो मंगळवारी रात्री मोटरसायकल वरून डबल सीट कामतीकडून कुरुल कडे निघाला असताना वाटेत तुळशीराम लॉन्स जवळ समोरून येणाऱ्या पिकप वाहनाने त्याला जोरात धडक मारली. या धडकेत तो गंभीर जखमी होऊन बेशुद्ध पडला असता त्याला उपचाराकरता येथील शासकीय रुग्णालयात मामा संजय पाटवे यांनी रात्री सव्वा दहा वाजता दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### तिऱ्हे गावातील सीना नदीमध्ये बुडून शेतमजुराचा मृत्यू

**सोलापूर, दि. २६ मे-**

पाण्यात वाहून जात असलेले कपडे काढण्यासाठी पाण्यात उतरलेल्या एका पन्नास वर्षाच्या व्यक्तीचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना तिऱ्हे गावातील सीना नदी मध्ये आज मंगळवारी सकाळी साडेनऊ वाजता घडली. धोंडीबा दगडू गायकवाड ( वय ५० वर्ष, रा. तिऱ्हे, उत्तर सोलापूर ) असे त्या मयत व्यक्तीचे नाव आहे. आज मंगळवारी सकाळी ते गावातील सीना नदी वर कपडे धुण्यासाठी गेले होते .कपडे धुताना कपडे पाण्यात वाहून जाऊ लागले असता धोंडीबा गायकवाड हे ते कपडे काढण्यासाठी पाण्यात उतरले. मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने ते पाण्यात बुडाले. घरच्यांनी व इतरांनी त्यांचा पाण्यात शोधाशोध केला असता दुपारी त्यांचा मृतदेह मिळून आला. दरम्यान भाऊ राहुल गायकवाड यांनी सदरचा मृतदेह येथील शासकीय रुग्णालयात दुपारी दोन वाजता दाखल केला असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

## कोंडी शिवारात समोरील पिकअपला धडकून दुचाकी स्वार जागीच ठार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मे-**

भर धाव वेगातील दुचाकी समोरील पिकअपला पाठीमागून धडकल्याने झालेल्या अपघातात एका बँकेत असिस्टंट मॅनेजर असलेला दुचाकी स्वार गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाल्याची घटना सोलापूर पुणे महामार्गावर कोंडी शिवारात सोमवारी रात्री साडेआठ वाजता घडली.

कौस्तुभ विनोद देशपांडे (वय ३० वर्ष, रा.मोहोळ ) असे त्या मयत दुचाकी स्वाराचे नाव आहे. ते मुरारजी पेठेतील एचडीएफसी बँकेत असिस्टंट मॅनेजर म्हणून कार्यरत होते. रोजच्या प्रमाणे तो सोमवारी रात्री ड्युटी संपवून आपल्या मोटारसायकलने मोहोळ कडे घराला निघाला होता. रात्री साडेआठ वाजता कोंडी शिवारात समोरील चार चाकी पिकप वाहनाला त्याची दुचाकी पाठीमागून धडकली. या धडकेत तो गंभीर जखमी होऊन बेशुद्ध होऊन पडला. दरम्यान त्याला एका रुग्णवाहिकेतून येथील शासकीय रुग्णालयात रात्री साडेनऊ वाजता दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले .मयत कौस्तुभ हा अविवाहित असून तो एकुलता एक होता अशी माहिती नातेवाईकांनी दिली. दरम्यान अपघाताची माहिती मिळताच बँक कर्मचारी, नातेवाईक आणि मित्रांनी येथील शासकीय रुग्णालयात मोठी गर्दी केली होती.

## रेल्वेगाड्यांच्या वेळापत्रकात व मार्गात २८, २९, ३० मे रोजी होणार बदल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मे-**

मध्य रेल्वे पुणे विभागातील 'दौंड-मनमाड दुपदरीकरण प्रकल्पा'च्या कामाच्या अंमलबजावणीसाठी, विसापूर-रांजणगाव-सरोळा स्थानकांदरम्यान दि. २८, २९ आणि ३० मे २०२६ रोजी 'ट्रॅफिक ब्लॉक' (रेल्वे वाहतूक खंडित करण्याची कामे) घेणार आहे. या ब्लॉकमुळे सोलापूर विभागातील स्थानकांमार्गे धावणाऱ्या गाड्यांच्या संचालनावर परिणाम होणार असल्याची माहिती रेल्वे प्रधासनाच्यावतीने देण्यात आली.



यामध्ये गाड्यांचा मार्ग दर्शविलेल्या मार्गांवरून वळवण्यात येनार आहे. गाडी क्रमांक १२६२७ केएसआर बंगळुरू-नवी दिल्ली कर्नाटक एक्सप्रेस, जिचा प्रवास दिनांक २७.०५.२०२६ आणि २९.०५.२०२६ रोजी सुरू होत आहे, ती सोलापूर-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी-छत्रपती संभाजीनगर-मनमाड या मार्गावरून वळवण्यात येईल.

गाडी क्रमांक २०६५७ एस.एस.एस. हुबळी-हजरत निजामुद्दीन एक्सप्रेस, जिचा प्रवास दिनांक २९.०५.२०२६ रोजी सुरू होत आहे, ती सोलापूर-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी-छत्रपती संभाजीनगर-मनमाड या मार्गावरून वळवण्यात येईल.

गाडी क्रमांक १२६२८ नवी दिल्ली-केएसआर बंगळुरू कर्नाटक एक्सप्रेस, जिचा प्रवास दिनांक २९.०५.२०२६ रोजी सुरू होत आहे, तिला सोलापूर-दौंड विभागात १ तास ३० मिनिटे उशिरा (विलंबित) केले जाईल. पायाभूत सुविधांची देखभाल आणि सुरक्षिततेसाठी ही सुधारणा कामे (अपग्रेडेशन ब्लॉक्स) करणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे प्रवाशांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल रेल्वे प्रशासन दिलगीर आहे; प्रवाशांनी कृपया या परिणामांची नोंद घ्यावी आणि त्यानुसार आपल्या प्रवासाचे नियोजन करावे, अशी विनंती करण्यात येत आहे.

## शिक्षकाचे घर फोडले

### दागिन्यांसह रोकड लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २६ मे-**

येथील अलिपूर रोडवरील सन्मित्र हाउसिंग सोसायटीत राहणाऱ्या एका शिक्षकाच्या बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरांनी सोन्या-चांदीचे दागिने आणि रोकड असा एकूण ४० हजारांचा ऐवज चोरुन नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यशवंत म्हाप्पा दोरकर (वय ५८, रा. सन्मित्र हाउसिंग सोसायटी, अलिपूर रोड, बार्शी) हे शिक्षकी पेशात असून आपल्या कुटुंबासह येथे राहतात. शाळांना उन्हाळ्याची सुट्टी लागल्यामुळे ते गत ४ मे रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास आपल्या घराला कुलूप लावून कुटुंबासह मूळ गावी मंगळवेढा येथे गेले होते.

तब्बल २० दिवसांनंतर, म्हणजेच रविवारी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास दोरकर हे बार्शी येथील आपल्या घरी परतले. यावेळी त्यांना घराच्या मुख्य चॅनेल गेटचे कुलूप उघडे असल्याचे दिसून आले. त्यांनी घरात जाऊन पाहिले असता, बेडरुममधील लोखंडी कपाट उघडून आतील सामान अस्ताव्यस्त टाकलेले होते. कपाटात ठेवलेले सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. अज्ञात चोरट्याने बंद घराची रेकी करुन कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि चोरी केल्याची त्यांची खात्री झाली.

## पत्नीच्या खून प्रकरणातील आरोपी पतीस चार दिवसांची पोलीस कोठडी

### फिंगरप्रिंट, डॉग स्कॉड व फॉरेन्सिक पथकाच्या मदतीने वैज्ञानिक पद्धतीने तपास

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २६ मे-**

बार्शी-परांडा रोडवरील प्रविण हॉटेलजवळ भरदिवसा पत्नीचा निर्घृण खून करुन फरार झालेल्या आरोपी पतीस बार्शी तालुका पोलिसांनी तात्काळ अटक करुन गुन्ह्यात वापरण्यात आलेले धारदार हत्यार जप्त केले आहे. या प्रकरणातील आरोपीस न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

मंगळवार दि. २६ मे रोजी बार्शी तालुका ग्रामीण पोलिसांनी आरोपीस न्यायालयासमोर हजर केले. पुढील तपासासाठी पोलिसांनी पाच दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली होती. यावर सुनावणी करताना न्यायमूर्ती एच. यू. यू. पाटील यांनी आरोपीस चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. सोमवार दि. २५ मे रोजी सकाळी सुमारे १०:१५ वाजण्याच्या सुमारास विवाहित महिला धनश्री ऋषीकेश पाटील या बचतगटाचे काम करुन लक्ष्याचीवाडी गावाकडून बार्शीकडे ज्युपिटर दुचाकी (क्र. चक १३ ऋ ४०१६) वरुन परत येत होत्या. त्या बार्शी-परांडा रोडवरील प्रविण हॉटेलजवळ आल्या असता आरोपी पती ऋषीकेश संभाजी पाटील (रा. नागणे प्लॉट, परांडा रोड, बार्शी) याने त्यांना अडवून त्यांच्या चारित्र्यावर संशय घेत धारदार हत्याराने गळा, मान व पोटावर सपासप वार केले. घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक महेश माने व त्यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमी धनश्री पाटील यांना उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय, बार्शी येथे दाखल केले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले.

या प्रकरणी फिर्यादी जितेंद्र विश्वनाथ गायकवाड (वय ५६, रा. कासारवाडी, ता. बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) प्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेनंतर आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तात्काळ दोन विशेष पथके तयार करुन रवाना केली होती. तपासादरम्यान आरोपीस ताब्यात घेऊन सखोल चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान आरोपीने गुन्ह्यात वापरलेले धारदार हत्यार एका ठिकाणी लपवून ठेवल्याची माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी दोन पंचांच्या उपस्थितीत फिंगरप्रिंट पथक, डॉग स्कॉड आणि फॉरेन्सिक पथकाच्या मदतीने वैज्ञानिक पद्धतीने तपास करुन संबंधित हत्यार जप्त केले.या गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक महेश माने हे करीत आहेत.

## भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे महागाई विरोधामध्ये आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २६ मे-**

आयटक कामगार केंद्र व भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्यावतीने आज पेट्रोल, डिझेल स्वयंपाकाचा गॅस व जीवनावश्यक वस्तूंच्या भाववाढी विरोधामध्ये तीव्र निदर्शने आंदोलन तहसील कार्यालय बार्शी येथे करण्यात आले. त्यासोबतच शेतकरी व कामगारांच्या मागण्या या आंदोलनात करण्यात आल्या. हे अंदोलन कॉम्रेड प्रा. तानाजी ठोंबरे व आयटक जिल्हा सचिव कॉम्रेड ए. बी. कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. यावेळी केंद्र सरकारच्या विरोधामध्ये घोषणाबाजी करण्यात आली.

आंदोलनाचे निवेदन नायब तहसिलदार यांनी स्वीकारले. निवेदनामध्ये खत बी बियाणे यांची साठेबाजी करणारांवर कारवाई करा, कर्जमाफी करा, हॉस्पिटल कर्मचारी, अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचार, शालेय पोषण आहार कर्मचारी, ग्राम पंचायत कर्मचारी, बार्शी नगरपालिका कंत्राटी कर्मचारी यांना तीस हजार रुपये किमान वेतन करा, सर्वांना पेन्शन द्या, कामगार कायद्याची मोडतोड थांबवा, शक्तिपीठ महामार्ग कुंभमेळा यावरील खर्च थांबवा, नीट परीक्षेमधील पेपर फुट करणाऱ्यांवर कारवाई करा, बेरोजगारांना हाताला काम द्या, धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करा, छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी करणाऱ्यांवर कारवाई करा या मागण्या करण्यात आल्या.

यावेळी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सचिव कॉ. डॉ. प्रवीण मस्तुद, ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे कॉ. सतीश गायकवाड, अखिल भारतीय किसान




सभेचे लहू,आगलावे, डॉ. जगदाळे मामा हॉस्पिटल श्रमिक संघाचे आनंद गुरव, भारत भोसले, भारती मस्तुद , संपत खताळ , निर्मला सरवदे, बिभीषण हरकुडे, बांधकाम कामगार संघटनेचे कॉ. अनिरुद्ध नखाते, बालाजी शितोळे, भारत चव्हाण, नानासाहेब ठाकरे, परशुराम यादव, विनोद गायकवाड, अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचर संघटनेचे प्रमिला शिंदे, सुवर्णा नेंदाने, शितल करडे, सविता नागटिळक, तोळाबाई ओव्हाळ शालेय पोषण आहार कर्मचारी संघटनेचे सुनील भोसले, भारत लोखंडे, दुर्गा गवळी, अनुराधा मंडलिक, बार्शी नगरपालिका कंत्राटी कामगार संघटनेचे विजय ढवारे, केशव गायकवाड उपस्थित होते.

## ३ लाख १५ हजारांच्या गॅस टाक्या नेल्या चोरुन

**मंगळवेढा, दि. २६ मे-**

ब्रम्हपुरी येथे भारत गॅस एजन्सी आवारातून ३ लाख १५ हजार रुपये किंमतीचे ४५० किलो वजनाचे २ एलपीजी गॅस सिलेंडर व ५ लाखाचे महिंद्रा कंपनीचे पिकअप चोरुन नेण्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी आनंद तानाजी पाटील यांचे ब्रम्हपुरी येथे गॅस एजन्सी दुकान असून दि.२२ मे रोजी गॅस विक्री करता आवश्यकता असल्याने भारत पेट्रोलियम कंपनी लि.,सोलापूर येथून एलपीजी गॅसचे दोन नग प्रत्येकी ४५० किलो वजनाचे सिलेंडर मागणी केली होती. सदरचे सिलेंडर हे महिंद्रा पिकअप गाडी क्रमांक एम.एच.१३ ई.पी.१०७४ मध्येच ठेवले होते.

सदरचे वाहन गॅस कंपनीचे समोर पार्कींग करण्यात आले होते. रविवारी सुट्टी असल्याने गॅस एजन्सी बंद होती. सोमवार दि.२५ मे रोजी सकाळी १० वाजता नेहमीप्रमाणे फिर्यादी हे दुकान उघडण्याकरिता आल्यावर एजन्सीच्या समोर पार्किंग करण्यात आलेली पिकअप गाडी व दोन सिलेंडर गॅस दिसून आले नसल्याने त्याचा सर्वत्र शोध घेतला मात्र ते मिळून आले नसल्यामुळे कोणी तरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या संमतीवाचून चोरुन नेले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

दरम्यान सध्या गेल्या अनेक महिन्यापासून युध्द सुरु असल्यामुळे घरगुती गॅस मिळण्यास अडचणी निर्माण होत आहेत. ग्रामीण भागात गॅसला पर्याय म्हणून चुलीही पेटू लागल्या आहेत. येथे चक्क चोरट्याने गॅस पळवून नेल्यामुळे या परिसरात तो एक चर्चेचा विषय ठरला आहे.

## पाठलाग करून तरुणीकडे केली शरीर सुखाची मागणी

### बाप-लेकावर विनयभंगाचा गुन्हा

**सोलापूर, दि. २६ मे-**

पाठलाग करून तरुणीकडे शरीरसुखाची मागणी केल्याप्रकरणी एका बाप-लेकाविरुद्ध सदर बझार पोलिस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रफिक सलीम शेख (रा. कुमठा नाका, सोलापूर) आणि अमन रफीक शेख (रा. सदर ) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या बाप लेकराचे नाव असून याबाबत पीडित तरुणीने खुद्द फिर्याद दिली आहे.

यातील फिर्यादी तरुणी ही ९ मे रोजी रात्री १०.३० ते ११ वाजण्याच्या दरम्यान कुमठा नाका परिसरातून जात होती. तेव्हा आरोपी रफिक शेख याने तिचा पाठलाग केला. त्यानंतर त्याने तरुणीला अडवून तिच्याकडे शरीरसुखाची मागणी केली. मात्र, तरुणीने स्पष्ट नकार दिल्यानंतर रफिक संतप्त झाला. यानंतर त्याने तरुणीला अश्लील भाषेत शिवीगाळ करत दमदाटी केली. तसेच तिचा गळा दाबून तोंडावर व डोळ्याजवळ मारहाण केली . यावेळी रफिक शेख याचा मुलगा अमन यानेही वडिलांना साथ देत तरुणीला शिवीगाळ व मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. फौजदार राजगुरू हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

**महाराष्ट्र महसूल व वन विभाग**
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**
**संकलन अभिलेख कक्ष**
दूरध्वनी नं. ९४२१९६९५१६ Email- tahakkalkot@.gmail.com

जा.क्र.२०२६/जन्म-मृत्यू/कावि/९७७/२०२६ दि. २६/०५/२०२६

### जाहिर प्रसिध्दीकरण

प्रति,
**श्रीम. अंबिका कलप्पा कोळी** - **अर्जदार**
रा. कलकर्जाळ, ता. अक्कलकोट
विरुद्ध
**जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय** - **सामनेवाला**
**ग्रामपंचायत, कलकर्जाळ, ता अक्कलकोट**

ज्याअर्थी, यातील श्रीम. अंबिका कलप्पा कोळी यांनी त्यांची सवत कै. अन्नाचा कलप्पा कोळी यांचा मृत्यू दि.१८/१०/२०२० रोजी मौजे कलकर्जाळ, ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झालेला आहे. परंतु त्यांच्या सवत मृत्यूची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे, अंबिका कलप्पा कोळी यांनी त्यांच्या सवत मृत्यूची नोंद करून घेऊन मृत्यू दाखला मिळण्याकामी जन्म-मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मा. तहसीलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. ०८/०४/२०२५ अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी त्यांच्या सवत नावे अन्नाका कलप्पा कोळी यांचा मृत्यू दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाचीही काही हरकत अथवा म्हणणे न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल. हे आज दि. २६/०५/२०२६ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिद्ध केले असे.

(शिक्का)

सही/-
तहसीलदार,
अक्कलकोट

### सावधानतेची जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, खाली नमूद 'परिशिष्ठ अ' मधील मिळकती या श्री. संभाजी अंबादास भोसले यांच्या मालकी वहिवाटीच्या आहेत. तसेच 'परिशिष्ठ ब' मधील मिळकती या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मिळकती असून त्यामध्ये श्री. संभाजी अंबादास भोसले यांचा भाडेकऱ्याचा हक्क आहे. आमचे अशिलाने सोलापूर येथील मा. दिवाणी न्यायालयात, स्पेशल मुकदमा क्र. ३३१/२०२६ हा दावा दाखल करून रक्कम रु. ७४,१६,४८५/- ही दावा दाखल तारखेपासून द.सा.द.शे. १०% व्याजासह दराने मिळण्यासाठी श्री. संभाजी अंबादास भोसले यांचेकडून वसूल होऊन मिळणेकामी दाद मागितलेली आहे. त्या रकमेचा बोजा सदर 'परिशिष्ठ अ' व 'परिशिष्ठ ब' मधील मिळकतीवर ठेवणेबाबत मागणी सदर दाव्यात केलेली आहे. त्याचप्रमाणे 'परिशिष्ठ अ' व 'परिशिष्ठ ब' मधील मिळकती अव्वल जप्त करण्यासंदर्भात अर्ज ही आमचे अशिलाने दिलेला आहे. असे असताना आमचे अशिलांना त्रास देण्याच्या उद्देशाने व मे. न्यायालयात दाखल दाव्यामध्ये गुंतागुंत वाढवण्याचे उद्देशाने संभाजी अंबादास भोसले हे 'परिशिष्ठ अ' व 'परिशिष्ठ ब' नमूद मिळकतींचे तिहाईत इसमांना विक्री, हस्तांतरण, तबदील करणेचे तयारीत असलेचे आमचे अशिलांना खात्रीलायकरित्या समजलेले आहे. त्यामुळे तमाम जनतेस सदर वस्तुस्थितीची माहीती होणेकामी सदरची सावधानतेची नोटीस आमचे अशिलाने दिली आहे. सदर परिशिष्ठ अ व ब मध्ये नमूद मिळकती या दाव्याचा विषय असल्याने त्या मिळकतींमध्ये आमचे अशिलांचा रक्कम वसूल होईपावेतो कायदेशीर हक्क व अधिकार असून त्याबाबत आमचे अशिलांनी उपरोक्त नमूद केलेप्रमाणे सोलापूर येथील मा. दिवाणी न्यायालयात दाद मागितलेली असल्यामुळे सदर दाव्यातील प्रतिवादी म्हणजेच श्री. संभाजी अंबादास भोसले यांचेसोबत कोणीही कोणत्याही स्वरूपाचा व्यवहार करू नये. संभाव्य फसवणूक टाळण्याकरीता ही सावधानतेची जाहिर नोटीस दिली.

**परिशिष्ठ अ**

१. जिल्हा व उपजिल्हा सोलापूर तालुका मोहोळ मौजे कामती बुद्रुक येथील बागायत शेतजमीन गट नं. २७३ यापैकी पश्चिम दिशेची शेतजमीन यासी क्षेत्र ०.२०.०० आर आकार ०.१४ रु. पै. अशी मिळकत

२. जिल्हा व उपजिल्हा सोलापूर तालुका मोहोळ मौजे कामती बुद्रुक येथील बागायत शेतजमीन गट नं. २७३ यांसी क्षेत्र हे. १.०५ आर यापैकी पश्चिम दिशेची शेतजमीन यासी क्षेत्र ०.२०.०० आर आकार ०.१४ रू.पै. येणेप्रमाणे मिळकत.

अशी वर नमूद 'परिशिष्ठ अ' मधील कलम १ व २ मधील मिळकती वर २० गुंठेचा जागेत १२ दुकान गाळे व मंगल कार्यालयाची जागा असे असलेले बांधकाम.

**परिशिष्ठ ब**

१. जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकि शहर सोलापूर येथील महानगर पालिका हद्दीतील श्री सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर च्या आवारातील दुकान गाळे नं. जी १२३ यांसी क्षेत्र अंदाजे १५० चौ. फुट अशी येणेप्रमाणे मिळकत

२. जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकि शहर सोलापूर येथील महानगर पालिका हद्दीतील श्री सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूरच्या आवारातील दुकान गाळे नं. एल १२ यांसी क्षेत्र अंदाजे १५० चौ. फुट अशी येणेप्रमाणे मिळकत.

येणेप्रमाणे सावधानतेची जाहीर नोटीस दिली ता. २६/०५/२०२६

सही/-
**ॲड. निशिकांत आर. देगांवकर**
**ॲड. अरुंधती एन. देगांवकर**
५०२, युनिटी शरद पॅराडाईस
प्लॉट नं. ११, रेल्वे लाईन, सोलापूर
मो. ९८८१९०३९९५

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# निधी नियोजन, खर्चाचा लेखाजोखा आणि विकासकामांवर अर्थ समितीची चर्चा

● विकासकामांच्या आर्थिक आढाव्यासह शिवस्मारक सुशोभीकरणाच्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ मे-**

जिल्हा परिषद सोलापूर येथे मंगळवारी अर्थ समितीची महत्त्वपूर्ण सभा पार पडली. जिल्हा परिषदेच्या विविध योजनांतील निधीचा वापर, खर्चाचा आढावा आणि आगामी विकासकामांचे नियोजन यावर सखोल चर्चा करण्यात आली. पारदर्शक प्रशासन आणि विकासकामांची प्रभावी अंमलबजावणी यावर सभेत विशेष भर देण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी दिली.



बैठकीच्या सुरुवातीला दि.२९ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या मागील सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला. त्यानंतर महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त नवीन शासन निर्णयांचे वाचन करून संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

सभेतील महत्त्वाचा मुद्दा मार्च २०२५ अखेरच्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या हस्तांतर, अभिकरण आणि सेस योजनांच्या जमा-खर्चाचा सविस्तर आर्थिक आढावा यावेळी घेण्यात आला.

यावेळी विविध योजनांवरील निधी खर्चाची सद्यस्थिती, शिल्लक निधी आणि प्रलंबित कामांबाबत अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली. विकासकामांसाठी उपलब्ध निधीचा योग्य व पारदर्शक वापर करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

जिल्हा परिषद परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या सुशोभीकरणाबाबतही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. पुतळा चारही बाजूंनी भव्य व सुस्पष्ट दिसावा, तसेच परिसर अधिक आकर्षक करण्यात यावा, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. या निर्णयामुळे जिल्हा परिषद परिसराचे सौंदर्य वाढण्यास मदत होणार आहे.

या सभेला जिल्हा परिषद सदस्य तथा अर्थ समितीचे सदस्य पृथ्वीराज शिवाजी सावंत, पुनम सुदर्शन इंगवले, रेश्मा देवेंद्र डोके, केराप्पा महादेव पांढरे, वित्त व लेख अधिकारी मिनाक्षी वाकडे, भाजपा उत्तर तालुका अध्यक्ष संभाजी दडे, भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष विनायक सुतार यांच्यासह विविध विभागांचे खातेप्रमुख उपस्थित होते.

### शाळा तेथे वृक्षलागवड

सोलापूर जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या ग्रामीण भागातील विविध आरोग्य केंद्र, उपकेंद्र तसेच शाळा तेथे वृक्ष लागवडीचा निर्धार करण्यात आला.

### जिल्ह्याचा सर्वांगीण विकास

पारदर्शक कारभार आणि जिल्ह्याचा सर्वांगीण विकास हा आमचा मुख्य संकल्प असून, प्रत्येक योजनेचा निधी जनतेच्या हितासाठी प्रभावीपणे वापरला जाईल, असे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तथा अर्थ समितीचे सभापती इंद्रजीत पवार यांनी सांगितले.

## महत्वाचे...

### 'तुझ्या बापाने माझ्याविरुध्द तक्रार का दिली,' असे म्हणत बालकास आपटले

**सोलापूर, दि. २६ मे-**

तुझ्या बापाने माझ्याविरुद्ध तक्रार का दिली असे म्हणत एका सात वर्षाच्या मुलास उचलून खाली आपटल्याची घटना मोदी भागातील मधुकर उपलप वस्ती येथे घडली. सदर बालक हा रविवारी रात्री साडेआठ वाजता राहत्या घराजवळ असताना त्याला नरसिंग अलजेंडे यांनी उचलून खाली आपटले. यात मुकामार लागून त्रास होऊ लागल्याने त्याला उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### हाणामारीच्या दोन घटना, आठ जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.२६ मे-**

स्टेटस ठेवल्यावरून होणारे भांडण सोडविताना आणि पूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन झालेल्या हाणामारीप्रकरणी सदर बाजार पोलिस ठाण्यात परस्पर विरोधी आठ जणांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पहिल्या घटनेतील समीर इनामदार, मलिक इनामदार, अमन इनामदार, अहमद इनामदार (सर्वजण रा.इमामवाडा, लष्कर, सोलापूर ) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहे याबाबत अफान मुस्ताक शेख (रा-उत्तर सदर बझार, लष्कर सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादीचा भाचा अब्दुल शेख याचे स्टेटस ठेवण्याचे कारणावरुन रविवारी रात्री घरासमोर भांडण झाले होते. भांडण सोडविण्यासाठी फिर्यादी व भाऊ गेले असता वरील आरोपींनी लोखंडी रॉड, काचेची बाटली डोक्यात मारली. फायटरने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, असे फिर्यादीत म्हटले आहे. पोलिस हवालदार सुरवसे हे पुढील तपास करीत आहेत. दुसऱ्या घटनेतील वस्ताद शेख, यासीन शेख, अजहर शेख, अयान शेख (रा.इमामवाडा, लष्कर, सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत मलीक समीर इनामदार (वय-२०, रा-उत्तर सदर बझार, इमामवाडा सोलापूर) यांनी फिर्याद दिली. यातील फिर्यादी दि.२५ मे रोजी दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास बहिणीस नर्सिंग कोर्सला सोडण्याकरीता जात असताना मागील भांडणाचा राग मनात धरुन वरील आरोपींनी फिर्यादीस व त्याच्या भावाला शिवीगाळ करत लाकडी काठीने हातावर, पोटावर, पाठीवर मारले, असे फिर्यादित म्हटले आहे.

### अधिकारी-कर्मचारी इलेक्ट्रिक बाइक व सायकलवरुन कार्यालयात

**सोलापूर, दि. २६ मे-**

जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूरने पर्यावरण संवर्धन व इंधन बचतीसाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलत प्रत्येक आठवड्यातील मंगळवार हा दिवस नो व्हेईकल डे म्हणून घोषित केला आहे. त्याअनुषंगाने आज जिल्हाधिकारी कार्यालय व महसूल विभागाच्या विविध शाखा अंतर्गत ३० कर्मचारी इलेक्ट्रिक बाईकवरून तर १२ अधिकारी-कर्मचारी सायकल चालवत कार्यालयात आले. तर अनेक कर्मचारी सार्वजनिक वाहतूक आणि खाजगी वाहतूक व्यवस्थेचा वापर करून कार्यालयात आले, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व शाखा, उपविभागीय कार्यालये व तहसील कार्यालयांतील अधिकारी व कर्मचारी यांना या दिवशी खाजगी दुचाकी व चारचाकी वाहने कार्यालयात आणण्यास बंदी घालण्यात आली आहे. अपरिहार्य कारणाशिवाय शासकीय वाहनांचा वापरही टाळण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहाय्यक शंकर कांबळे आणि विजय वाळा हे इलेक्ट्रिक बाइकने कार्यालयात आले. प्रधानमंत्री महोदय यांच्या आव्हानाला जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी डिझेल व पेट्रोलच्या गाड्यांचा वापर कमी करून उत्स्फूर्त प्रतिसाद देत आहेत.

# इंधन दरवाढ, पीकविमा प्रश्नांवर काँग्रेसचा जनआक्रोश

## सोलापूर-पुणे आणि सोलापूर-हैद्राबाद महामार्गावर करण्यात आला रास्ता रोको

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ मे-**

पेट्रोल, डिझेल व गॅस दरवाढीबरोबरच शेतकऱ्यांच्या पीकविमा आणि विविध प्रलंबित प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी सोलापूर शहर जिल्हा काँग्रेस समितीच्या वतीने खासदार प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी जनआक्रोश आंदोलन करण्यात आले. सोलापूर-पुणे आणि सोलापूर-हैद्राबाद महामार्गावर रास्ता रोको करण्यात आला. या सरकारचा करायचा काय, खाली मुंडी वर पाय, फडणवीस सरकार मुर्दाबाद, मोदी सरकार मुर्दाबाद, सरकार मस्त... शेतकरी त्रस्त... अशा जोरदार घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.




आंदोलनात सहभागी झालेल्या शेतकऱ्यांनी गळ्यात कांद्याच्या माळा घालून सरकारच्या धोरणांविरोधात निषेध नोंदवला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. या आंदोलनामुळे सोलापूर-पुणे आणि सोलापूर-हैद्राबाद महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

खासदार प्रणिती शिंदे याप्रसंगी बोलताना म्हणाल्या, राज्यातील शेतकरी आज अत्यंत संकटात असून भाजप महायुती सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे बळीराजावर मुद्दाम संकट आणले जात आहे. पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या दरवाढीमुळे सर्वसामान्य जनतेचे जगणे कठीण झाले आहे. डिझेलचे वाढते दर आणि इंधन तुटवड्याचा थेट परिणाम शेतीवर होत असून शेतकऱ्यांना शेती मशागत करणेही अवघड झाले आहे.

सत्ताधाऱ्यांच्या वाळू तस्करीमुळे आणि नदीपात्रातील वाळू उपशामुळे शेतीपर्यंत पाणी पोहोचण्यात विलंब होत असल्याचा गंभीर आरोप करत त्यांनी सांगितले की, यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. हे सरकार केवळ उद्योगपतींसाठी काम करत असून सामान्य माणूस आणि शेतकरी यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जात आहे, अशी टीकाही खासदार प्रणिती शिंदे यांनी केली.

यावेळी सोलापूर पूर्व जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार, शहराध्यक्ष चेतन नरोटे, नगरसेवक नरसिंह आसादे यांच्यासह भारत जाधव, भीमाशंकर जमादार, संदीप पाटील, प्रशांत साळे, सुलेमान तांबोळी, किशोर पवार, अँड. राहुल घुले, शाहिन शेख, अँड. रवीकरण कोळेकर, अशपाक बळोरगी, सुशिला आबुटे, रियाज हुंडेकरी, मनोज यलगुलवार, अँड. अर्जुनराव पाटील, प्रा.सिद्राम सलवदे, सुरेश शिवपुजे, अँड. संजय गायकवाड, सचिन गुंड, मुस्तफा बळोरगी, काकासाहेब पाटील, राहुल वर्धा, प्रमिला तूपलवंडे, गणेश डोंगरे, अनंत म्हेत्रे, जुबेर कुरेशी, गजानन जक्कीकोरे, राघवेंद्र बिराजदार, संदीप शिंदे, प्रा.भोजराज पवार, बाबुराव म्हेत्रे, शिवशंकर अंजनाळकर, परशुराम सतारेवाले, शिरीष चव्हाण, तिरुपती परकीपंडला, महेश लोंढे, शरद गुमटे, सुभाष वाघमारे आदी उपस्थित होते.



# डाईंगचे पाणी नाल्यात सोडणाऱ्यांवर कारवाई करावी : महापौर कोंड्याल

## मान्सूनपूर्व कामाचा वेग संथगतीने

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२६ मे-**

शहरात काही ठिकाणी मान्सूनपूर्व कामाचा वेग संथ असल्याचे निदर्शनास आले आहे. संबंधित कंत्राटदारांनी पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करावे. मुद्रासन सिटी परिसरात काही ठिकाणचे डाईंगचे पाणी नाल्यात सोडले जात असल्याचे आढळले. डाईंगचे पाणी नालयात सोडण्यांवर कारवाई करावी, असा आदेश महापौर विनायक कोंड्याल यांनी दिले आहे.

महापौर विनायक कोंड्याल यांनी शहरातील विविध नाल्यांची पाहणी केली. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगर अभियंता सारिका अकुलवार यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी-कर्मचारी, नगरसेवक उपस्थित होते.

नाल्यामध्ये मिश्रित होणारे सांडपाणी, दूषित पाणी अथवा अन्य पाण्याचे स्रोत याबाबत सखोल चौकशी करून आवश्यक ती कारवाई करण्यात यावी. मान्सूनपूर्व कामे सुरुवातीला ७-८ टक्के असलेले कामाचे प्रमाण आता १५ टक्के पर्यंत आले असून, मजूर वाढवून काम अधिक जलद करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

जुना कारंबा नाका, प्रभाकर महाराज मंदिर परिसरात नाला खोलीकरण, गाळ काढण्याचे काम सुरू आहे. तिथे स्थानिक नागरिकांकडून आलेल्या तक्रारी सोडवण्यासाठी काही दिवस काम थांबवून पुढील नियोजन केले जाईल, असेही त्यांनी सांगितले.

गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे सोलापूरच्या अनेक भागांतील घरांमध्ये पाणी शिरले होते. यंदा तशी परिस्थिती उद्भवू नये म्हणून महापालिका प्रशासन सतर्क असून सर्व नाले वेळेत स्वच्छ करण्यावर भर दिला जात आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### याठिकाणी केली प्रत्यक्ष पाहणी

अक्कलकोट रोडवरील पंजवाणी मार्केट परिसरातील नाला, मुद्रा सनसिटी येथील नाला, घरकुल परिसरातील पोगुल नाला , कारबा नाका, बाळे परिसर तसेच एम.आय.डी.सी. परिसरातील नाल्यांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

### विधानपरिषद स्थानिक प्राधिकारी मतदार संघ निवडणूक वेळापत्रक जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मे-**

भारत निवडणूक आयोगाने दिनांक १८ मे अन्वये महाराष्ट्र विधानपरिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदार संघाच्या द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून, त्यानुसार आदर्श आचारसंहिता दिनांक १८ मे पासून लागू करण्यात आलेली आहे. सोलापूर स्थानिक प्राधिकारी मतदार संघाच्या निवडणुकीसाठी नाम निर्देशन पत्र दाखल करण्याचा कालावधी दिनांक २५ मे २०२६ ते ०१ जून २०२६ असा निश्चित करण्यात आला आहे. यामध्ये दिनांक २८ मे रोजी बकरी ईद व दिनांक ३१ मे रोजी रविवारची सार्वजनिक सुट्टी असल्याने हे दोन दिवस वगळून दिनांक २५, २६, २७, २९, ३० मे तसेच १ जून रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत नामनिर्देशन पत्र स्वीकारण्यात येणार आहेत. जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी सर्व संबंधितांना वरील वेळापत्रकानुसार आवश्यक कार्यवाही करण्याचे आवाहन केले आहे.

# जिल्ह्यासाठी पेट्रोल, डिझेलचा बफर स्टॉक ठेवा : जिल्हाधिकारी

## प्रशासनाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारची बंधने घालू नयेत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मे-**

सोलापूर जिल्ह्याला पेट्रोल, डिझेल व गॅस पुरवठा करणाऱ्या बीपीसीएल, एचपीसीएल व आयओसीएल या सर्व कंपन्यांनी सोलापूर जिल्ह्याला प्राधान्य देऊन मोठ्या प्रमाणात बफर स्टॉक उपलब्ध ठेवावा. तसेच दैनंदिन मागणीप्रमाणे जिल्ह्याच्या शहरी व ग्रामीण भागात इंधनपुरवठा सुरळीतपणे ठेवणे आवश्यक असल्याचे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात (दि. २५)पेट्रोल, डिझेल व गॅस पुरवठा करणाऱ्या कंपन्यांच्या प्रतिनिधी समवेत आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी कार्तीकेयन मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, गॅस कंपनीचे जिल्हा समन्वयक श्री. रघुकुमार, बीपीसीएलचे वरिष्ठ अधिकारी प्रवीण यादव, संजयकुमार, एचपीसीएलचे सागर चव्हाण, निकीत रेड्डी व आयओसीएलचे सागर गौतम, तन्मय आनंद, आयएमसील कंपनीचे नंदकिशोर अडसुळे, अनिल करीर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तीकेयन पुढे म्हणाले की, काही पेट्रोल विक्रेत्याकडून कंपनीने दररोज काही मर्यादेतच पेट्रोल, डिझेल विक्री करावी असे बंधने घातल्या बाबतच्या तक्रारी आलेल्या आहेत. तरी सर्व संबंधित कंपन्यांनी जिल्हा प्रशासनाच्या परवानगीशिवाय पेट्रोल विक्रेत्यावर इंधन विक्रीचे कोणत्याही प्रकारची बंधने घालू नयेत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊ शकते. यापुढे अशा कोणत्याही प्रकारच्या तक्रारी येऊ नये, तसेच इंधनपुरवठा सोलापूर शहरासह ग्रामीण भागात ही सुरळीतपणे सुरू राहील याबाबत दक्षता घ्यावी, असे त्यांनी सुचित केले.

जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी पेट्रोल डिझेल पुरवठ्याच्या अनुषंगाने काळजी करू नये जिल्ह्यात मुबलक प्रमाणात इंधन साठा उपलब्ध असून कंपन्यांना दररोज नियमित मागणीप्रमाणे पेट्रोल डिझेल उपलब्ध केले जात आहे. विशेषत: जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील नागरिकांनी पेट्रोल, डिझेलचा अतिरिक्त साठा करून ठेवू नये, असेही आवाहन जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी केले आहे. तसेच उछ्रृ गॅस पुरवठ्यात ही कंपनीने मागणीप्रमाणे वाढ करावी.

प्रारंभी जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांच्याकडून सर्व पेट्रोल डिझेल व गॅस पुरवठा करणाऱ्या कंपन्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या कंपन्यांची रोजची पेट्रोल व डिझेलची मागणी व त्याप्रमाणे कशा पद्धतीने पुरवठा होत आहे याविषयी माहिती घेण्यात आली. तसेच गॅस पुरवठा कशा पद्धतीने केला जात आहे व त्यात मोठ्या प्रमाणात वाढ करावी अशा सूचनाही त्यांनी दिल्या. तसेच कंपन्यांकडून किमान सात दिवसाचा पेट्रोल व डिझेलचा बफर स्टॉक ठेवण्यात आल्याचे सांगण्यात आले तसेच सोलापूर शहर व ग्रामीण भागात मागणीप्रमाणे पेट्रोल व डिझेल पुरवठा रोजचा रोज उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे सांगितले.



जिल्ह्यातील सर्व डीलर व विक्रेते यांच्या पेट्रोल व डिझेलच्या अनुषंगाने अडीअडचणी जाऊन घेतल्या. व ग्राहकांना इंधन पुरवठा सुरळीत करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यांनी काही पेट्रोल पंप चालकाकडून ड्रम व मोठ्या प्रमाणात एकाच व्यक्तीला इंधन पुरवठा होत आहे, अशा तक्रारी ग्रामीण भागातून येत आहेत. तसेच अक्कलकोट करमाळा बार्शी या तालुक्यात इंधनपुरवठा विस्कळीत झाल्याबाबत ही तक्रारी येत असल्याने या भागातील पेट्रोल पंप सुरू राहतील या दृष्टीने कंपन्यांनी त्या ठिकाणच्या विक्रेत्यांना पुरवठा करावा अशा सूचना त्यांनी दिल्या.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## उद्या शासकीय रुग्णालयांची 'ओपीडी' बंद

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे : काही दिनदर्शिकांमध्ये बुधवार, २७ मे २०२६ रोजी बकरी ईदची सुट्टी दर्शवण्यात आली असली, तरी महाराष्ट्र शासनाने बकरी ईदची सार्वजनिक सुट्टी गुरुवार, २८ मे २०२६ रोजी निश्रि्चत केली आहे. त्यामुळे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग गुरुवार, २८ मे २०२६ रोजी बंद राहील.

शासकीय रुग्णालयांचा बाह्यरुग्ण विभाग बुधवार, २७ मे २०२६ रोजी नियमित वेळेप्रमाणे पूर्णवेळ सुरू राहील, तर गुरुवार, २८ मे रोजी सुट्टी असल्याकारणाने पूर्णपणे बंद राहणार आहे.

शासकीय रुग्णालयातील ओपीडी विभाग गुरुवारी बंद असला, तरी रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास अविरत सुरू राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. संतोषकुमार डोपे यांनी कळविले आहे.



# विविध वृत्त...

## लातूर-कळंब राज्य मार्गावरील पुलांचे काम अर्धवट

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे : लातूर - कळंब राज्यमार्गावर मोठया प्रमाणात हजारो वाहनांची ये-जा असते. या मार्गाचे काम गेल्या ४ ते ५ वर्षापासून संथ गतीने सुरू आ-हे. तांदूळजा ते लातूर एमआयडीसी पर्यंत ८० टक्के रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. मात्र रस्त्याचे काम क-ांही ठिकाणी निकृष्ट दर्जाचे झाले आहे. या नव्या रस्त्यावरून जाताना वाहने कांही ठिकाणी जम्पींग करत आहेत. बेसावध असणाऱ्या प्रवांना याचा फटका बसत आहे. तसेच या मार्गावर बांधलेल्या पुलांचे काम अजूनही अर्धवट अवस्थेत आ-हे. कांही ठिकाणी रस्त्याच्या साईड पट्टया फाटत आहेत. त्यामुळे वेगात असलेले वाहन आचनक खड्यात जावून आपघात होण्याची शक्यता आहे.

## कन्हेरी चौकातून दुचाकी चोरली

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे : शहराच्या कन्हेरी चौकातील टायर पंक्चरच्या दुकानासमोर लावलेली काळ्या रंगाची होंडा शाईन मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना रविवारी (दि. २४) सकाळी १० ते ११.३० च्या सुमारास घडली.

फिर्यादी पाशासाब गनीसाब शेख हे टायर पंक्चर दुकानदार रविवारी सकाळी त्यांच्या कामात व्यस्त होते. त्याच वेळी अज्ञात चोरट्यांनी दुकानापुढे लावलेली होंडा शाईन कंपनीची मोटारसायकल (एमएच २४ एक्स ३२९१) चोरून नेली. शेख यांच्या लक्षात येताच त्यांनी सर्वत्र मोटारसायकलीचा शोध घेतला. परंतु शेजाऱ्याकडे व नातेवाईकांकडेही ती नसल्याची खात्री झाल्यानंतर त्यांनी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात धाव घेतली. शेख यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरोधात गु.र. नं. ३८३/२६, कलम ३०३ (२) बीएनएस नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील करीत आहेत.

## अकरावी प्रवेशासाठी कॉलेज पसंतीक्रम कार्यक्रम

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे : अकरावी प्रवेशासाठी उत्सुक असलेल्या विद्यार्थ्यांना कॉलेजला पसंतीक्रम देण्याचा कार्यक्रम सुरू झाला आहे. आता पसंतीक्रम दिला की, संबंधित महाविद्यालयात विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेश मिळणार आहे. सध्या अकरावी प्रवेशाची सर्वत्र चर्चा सुरू आहे. यावर्षी गतवर्षीसारखी परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून प्रवेश प्रक्रिया लवकर सुरू झाली.

यावर्षी दहावी, बारावी बोर्ड परीक्षेचे निकालही लवकर लागले.

त्यामुळे अकरावी प्रवेशाची प्रक्रिया लवकर सुरू झाली. आता विद्यार्थी कमी आणि अकरावी प्रवेशाच्या जागा अधिक, असा विषम हिशेब समोर येत असला तरी प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतरच कोणत्या उच्च माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयांत प्रवेश किती झाले, हे कळणार आहे.

सध्या पसंतीक्रम देऊन महाविद्यालय निवडीची प्रक्रिया सुरू आहे. पसंती दिल्यास उच्च माध्यमिक विद्यालये व कनिष्ठ महाविद्यालयांत किती प्रवेश होणार हे समोर येईल.

## खंडापूर पादुका दर्शन सोहळा आर्थिक व्यवहारातील दोषींवर कारवाईच्या मागणीसाठी

# अ .भा. भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्यावतीने पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे : लातूर तालुक्यातील खंडापूर येथे दि. २२ फेब्रुवारी ते २ मार्च २०२६ या कालावधीत पार पडलेल्या उत्सव संतांचा, कुंभमेळा वारकऱ्यांचा पादुका दर्शन सोहळ्यासाठी देणगी स्वरूपात आलेल्या रकमेमध्ये कोट्यवधी रुपयांच्या अपहार प्रकरणी दोषी असणाऱ्या किशोर जाधव शिवणीकर व त्याच्या सहकाऱ्यांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याच्या मागणीसाठी आज , मंगळवारी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांच्या नेतृत्वाखाली लातूरच्या एमआयडीसी पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले.

या पादुका दर्शन सोहळ्यात कोट्यवधी रुपयांचा अपहार करण्यात आल्याची तक्रार अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती एवं ब्रिक्स ह्युमन राईट मिशनचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी एका लेखी निवेदनाद्वारे लातूरच्या पोलीस अधीक्षकांकडे केली आहे. खंडापूर येथे पार पडलेल्या पादुका दर्शन सोहळ्यासाठी महाराष्ट्रातील अनेक संत आले होते. सोहळ्यामध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, तेलंगणा आदी भागातून वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या सोहळ्याचा जवळपास ६० लाखांहून अधिक भाविकांनी आनंद घेतला होता. सोहळ्यासाठी अंदाजे ३७०० देणगी



पुस्तिका छापण्यात आल्या होत्या. प्रत्येक देणगी पावती पाच हजार रुपयांपेक्षा जास्त रकमेची आहे. या सोहळ्यासाठी छोटे कदम माऊली महाराज व तोतया भामटा किशोर जाधव शिवणीकर याने आपल्या सहकाऱ्यांसह संपूर्ण मराठवाड्यात फिरून लोकांकडून मदत, पैसे जमा केले. या कामी विशेष सहकार्य खंडापूरच्या नागरिकांचे राहिले आहे. खंडापूरच्या लोकांनी स्वतःच्या खर्चाने परिसर स्वच्छ करून दिला. कार्यक्रमासाठी भाविकांनी स्वयंस्फूर्तीने सहकार्य केल्याचे सर्वांनी पाहिलेही आहे.

या अध्यात्मिक सोहळ्यासाठी वेगवेगळ्या भागातून भाकरी, चपात्या, पुरणपोळ्या, दूध, तूप, भाज्या आदी साहित्य पुरवले गेले. या सोहळ्यासाठी सामान्य नागरिकांसह विविध संस्था, राजकीय पुढाऱ्यांनीही मोठ्या रकमा देणगी स्वरूपात दिल्या आहेत. तसेच दानपेटीच्या माध्यमातूनही अंदाजे ५ कोटी रुपयांची रक्कम जमा झाली आहे. पावती पुस्तकांच्या माध्यमातूनही कोट्यवधी रुपये जमा झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या रकमा ज्या बँक खात्यावर जमा झाल्या, त्या कोणाच्या खात्यात जमा केल्या व कोणाच्या परवानगीने याची चौकशी होणे गरजेचे आहे. तसेच भक्ती शक्ती पावन धाम सेवाभावी संस्था या संस्थेचे बँक खाते गोठवून संस्थेची चौकशी व्हावी, संस्थेच्या सर्व संचालकानाची बँक खाती व मालमत्ता शासनाने तात्काळ ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत,अशी मागणीही यावेळी करण्यात आली. जनतेने अत्यंत विश्र्वासाने, आस्थेने दिलेल्या दानाचा अशा प्रकारे अपहार करणाऱ्या तथाकथित किशोर जाधव शिवणीकर याच्यावर व त्याच्या या प्रकरणातील दोषी सहकाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करून त्यांची सखोल चौकशी करण्यात यावी,अशी आग्रही मागणीही या ठिय्या आंदोलनादरम्यान करण्यात आली.

या ठिय्या आंदोलनात स्वातंत्र्य सैनिक प्रदीप पाटील खंडापूरकर , पृथ्वीराज सिंह पाटील खंडापूरकर , अमोल नानजकर, एड. राणीताई स्वामी, रामभाऊ पवार, नेताजी जाधव, काशीबाई हांडे, रामेश्र्वर डोणे ,नागेश जाधव, जयश्री भुत्तेकर, सुरेखा गाडेकर, महेश चामे, तुषार रेड्डी, मोक्षदा भंडारकवटे, अमोल भालेराव, महेश पाटील, वैभव घोबाळे, पृथ्वीराज पवार आदिंसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शासन योजना सामान्यांपर्यंत पोहोचवा : खा. महाडिक

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे : केंद्र व राज्य सरकारने सामान्यांच्या हिताचे शेकडो निर्णय घेतले आहेत. त्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी भाजपच्या पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन कोल्हापूरचे खासदार धनंजय महाडिक यांनी केले.



भाजपच्यावतीने तालुक्यातील हरंगुळ येथील जनकल्याण निवासी विद्यालयात आयोजित दोन दिवसीय पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियानचा शुभारंभ झाला. यावेळी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. यावेळी माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड, आ. संजय केणेकर, भाजपाच्या प्रदेश उपाध्यक्षा डॉ. अर्चना पाटील चाकूरकर, माजी खा. सुधाकर श्रृंगारे, ॲड. शैलेश लाहोटी, जिल्हा सरचिटणीस संजय गीर, नगरसेविका रागिणी यादव, प्रवीण कस्तुरे, निखिल गायकवाड, तुकाराम गोरे उपस्थित होते.

खा. महाडिक म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने गरीब, शेतकरी, महिला, युवक आणि सर्वसामान्यांसाठी अनेक योजना सुरू केल्या आहेत. परंतु, त्याची जनजागृती झाली नाही, ते काम पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी करावे, असे आवाहन त्यांनी केल डॉ. भागत कराड यांनी जनसंघापासून आजच्या भाजपचा प्रवास सांगितला.

सोशल मीडियावर 'एआय'चा वापर करा अजित कव्हेकर पक्ष वाढीसाठी व पक्षाच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजना सामान्यांपर्यंत पोहोचाव्यात, यासाठी सोशल मीडिया हे प्रभावी माध्यम आहे. यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून 'एआय'चे तंत्रज्ञान आत्मसात करावे. सोशल मीडियाच्या कामाला गती द्यावी, असे आवाहन अजित पाटील कव्हेकर यांनी केले.

## पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे : विद्यार्थ्यांना शाळेची ओढ लागावी व शाळेविषयी आस्था निर्माण व्हावी म्हणून शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे शाळेत प्रभावी स्वागत व प्रवेशोत्सव कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये इयत्ता पहिली ते बारावीतील सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेशोत्सवाच्या प्रसंगी जोरदार स्वागत करण्यात येणार आहे. यासंदर्भात, शासनाने शाळा प्रवेशोत्सव आयोजनाबाबत परिपत्रक जारी केले आहे. शाळा प्रवेशोत्सवाची माहिती स्कूल पोर्टलवर नोंदविण्यासही सांगण्यात आले आहे. शाळा परिसरातील वयोगट सहा ते १४ वर्षांच्या सर्व मुलांचे प्रवेश झाले का? याची खात्री करण्यास शिक्षकांना सूचित केले असून, शाळाबाह्य झालेली किंवा असलेल्या बालकांचा शोध शाळापूर्व तयारीच्या कालावधीत घेण्यात येणार आहे. शोधून काढलेल्या मुलांना शाळेत प्रवेश देण्याची तयारी शिक्षकांना करावी लागणार आहे. नजीकच्या परिसरातील दगडखानी, वीटभट्टी, बांधकामाचे ठिकाण, उद्याने, बाजारपेठा, पदपथ, सिग्नल, कुटीर उद्योग, कामगार वस्त्या यासारख्या ठिकाणांचे सर्वेक्षण करून तेथे मुले आढळल्यास त्यांना शाळेत आणण्याचे कष्ट शिक्षकांना घ्यावे लागणार आहेत.

## 'मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम' योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे : राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण-२०१९ अंतर्गत राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक-युवतींची वाढती संख्या व उद्योग, व्यवसाय क्षेत्रात उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगाराच्या व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी व सृजनशिलतेला कालानुरुप वाव देणारी सर्वसमावेशक 'मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम' योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर व्यापक प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी सुक्ष्म व लघु उपक्रमांना विशेष चालना दिली जात आहे.

या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत जिल्हा उद्योग केंद्राकडून बँकेच्या कर्ज मंजुरीनंतर अर्जदाराच्या जात प्रवर्ग आणि उद्योग क्षेत्रानुसार १५ ते ३५ टक्के अनुदान दिले जाते, ज्यामध्ये सेवा उद्योग, उत्पादन उद्योग तसेच कृषी पूरक व्यवसाय, कृषीवर आधारित उद्योग, एकाच नाममुद्रेवर (ब्रँड) आधारित संघटित साखळी विक्री केंद्र, फिरते विक्री केंद्र, खाद्यान्न केंद्र, कुक्कुट पालन, अंडी उबवणी केंद्र, मधुमक्षिका पालन, मत्स्यपालन, रेशीम उद्योग, शाकाहारी व मांसाहारी पदार्थ विक्रीचे हॉटेल किंवा ढाबा व्यवसाय, होम स्टे, क्लाऊड किचन, जलक्रिडा, मासेमारी आणि प्रवासी वाहतुकीकरिता बोट व्यवसाय यांचा प्रामुख्याने समावेश करण्यात आला आहे.

या योजनेमधून फिरते फळे व भाजीपाला विक्री करणारे तसेच फिरते हॉटेल व्यवसाय करणारे वाहनासाठी सुद्धा लाभ घेता येत असल्याने, लातूर जिल्ह्यातील इच्छुकांनी तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या इलेक्ट्रिक वाहनांच्या शोरूमला भेट देऊन अशा वाहनांची चौकशी करावी आणि या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी लातूर जिल्ह्यातील स्थानिक रहिवासी असलेल्या व किमान १८ वर्षे वय पूर्ण केलेल्या स्वयंरोजगार करू इच्छिणाऱ्या उमेदवारांना पात्र मानले जाईल; ज्यामध्ये सेवा उद्योगासाठी ५ लाख रुपयांवरील प्रकल्पासाठी आणि उत्पादन उद्योगासाठी १० लाख रुपयांवरील प्रकल्पासाठी उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता आठवी पास असणे आवश्यक आहे.

तसेच अर्जदाराने यापूर्वी कोणत्याही शासकीय अनुदान योजनेचा लाभ घेतलेला नसावा आणि या योजनेंतर्गत प्रक्रिया व निर्मिती प्रकल्पासाठी १ कोटी रुपये (जास्तीत जास्त ५० लाख रुपयांच्या अनुदान मर्यादित) तर सेवा उद्योग प्रकल्पासाठी ५० लाख रुपये (जास्तीत जास्त २० लाख रुपयांच्या अनुदान मर्यादित) अशी मर्यादा निश्र्चित करण्यात आली आहे.

## काँग्रेसकडून जिल्हा उद्योग केंद्राच्या पत्राची होळी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे : शहराच्या उद्योग भवनमध्ये ट्यूशन क्लासेस चालतात, त्या क्लासेसला उठविण्याचा प्रयत्न करू नये, जिल्हा उद्यो केंद्राच्यावतीने काढण्यात आलेले पत्र चुकीचे आहे, असा आरोप करीत काँग्रेसच्यावतीने सोमवारी (दि.२५) येथील उद्योग भवनसमोर त्या पत्राची होळी केली. लातूर पॅटर्नला बदनाम करण्यात येत असल्याचा निषेध करण्यात आला.



जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापकांनी प्लॉटमालकांना नोटीस काढून ज्या उद्देशासाठी जागा घेतली होती, त्याऐवजी पूरक व्यवसाय सुरू असल्याची आठवण करून दिली होती. तेथे सध्या शिकवणी वर्ग, वसतिगृह, खानावळ आणि अभ्यासिका बंद

करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या फर्मानामुळे ट्यूशन एरियात शिकणाऱ्या हजारो विद्यार्थी आणि पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके म्हणाले, गुणवत्तेचा लातूर पॅटर्न बावनकशी सोने आहे. हा पॅटर्न जनमानसात रुजलेला आहे. आमचे टॅलेंट सिद्ध झालेले आहे, ते कोणालाही बदनाम करता येणार नाही, या नीट पेपर फुटी प्रकरणाच्या आड लातूर पॅटर्नला बदनाम करण्याचे षडयंत्र सुरू आहे, हे खपवून घेतले जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष डॉ. शिवाजी जवळगेकर, उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे, किरण जाधव उपस्थित होते.

## इंधनाअभावी शेतकऱ्यांची कामे थांबू नयेत
## आ. अमित देशमुख यांचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

तभा वृत्तसेवा



लातूर दि. २६ मे : सध्या सर्वत्र सुरू असलेल्या इंधन टंचाईच्या पार्श्र्वभूमीवर, खरीप हंगामाच्या पूर्वतयारीची व बागायती शेतीच्या मशागतीची कामे इंधनाअभावी थांबू नयेत, यासा ठी शेतकऱ्यांना सुलभतेने पेट्रोल व डिझेलचा पुरवठा करण्यात यावा; तसेच गरज पडल्यास शेतकऱ्यांसाठी इंधन पुरवठ्याची स्वतंत्र व्यवस्था निर्माण करावी, अशी आग्रही मागणी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आ. अमित देशमुख यांनी केली आहे.

या संदर्भात त्यांनी सोमवारी, दि. २५ मे रोजी जिल्हाधिकारी भारत बास्टेवाड यांना पत्र पाठवून तातडीने पावले उचलण्याची विनंती केली आहे. शेतकरी बांधवाकडून खरीप हंगामाच्या तयारीची तसेच ऊस व बागायती शेतीच्या मशागतीची सध्या कामे सुरु आहेत. शेती मशागतीच्या या कामासाठी ट्रॅक्टर तसेच इतर वाहनांचा व तांत्रीक अवजारांचा वापर करण्यात येतो आहे. यासाठी पेट्रोल डिझेलची या इंधनाची नितांत आवश्यकता भासते आहे. या अनुषंगान, आ. अमित देशमुख यांनी जिल्हाधिकारी भारत बास्टेवाड यांना पत्र पाठवले आहे.

या पत्रात नमूद केले आहे की, आमदार अमित देशमुख यांनी इंधन टंचाईची सर्वत्र चर्चा सुरु असताना अनेक पेट्रोल पंपावर गाड्यांच्या रांगा लागल्याचे दिसून येत आहे. याठिकाणी शेती मशागतीच्या यंत्रासा ठी लागणारे पेट्रोल /डिझेल घेऊन जाण्यासाठी शेतकरी कॅन बॅरल घेऊन येत आहेत. या शेतकऱ्यांना काही पेट्रोल पंपावर इंधन नाकारले जात असल्याच्या तक्रारी येत आहेत. इंधन पुरवठ्यात अडचणी येत असल्यामुळे अनेक ठिकाणी पेट्रोल/डिझेलची टंचाई भासत आहे ही वस्तुस्थिती आहे. हे जरी खरे असले तरी सद्यस्थितीत शेतीची कामेही होणे आवश्यक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनाही शेती कामासाठी इंधन उपलब्ध होणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांची समस्या, अडचण आणि त्यांची गरज लक्षात घेऊन, त्यांना सुलभ पद्धतीने आवश्यकतेनुसार पेट्रोल/डिझेल उपलब्ध करुन देण्यासंदर्भात जिल्ह्यातील सर्व पेट्रोल-डिझेल पंप धारकांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात. शेती कामासाठी इंधन उपलब्ध करुन देण्यासंदर्भात वेगळी व्यवस्था निर्माण करता येते का हेही पहावे. एकाही शेतकऱ्याची शेती कामे इंधनाअभावी रखडली जाऊ नयेत याची दक्षता घ्यावी, अशी विनंती या पत्राद्वारे आ. अमित देशमुख यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

## लोकशाही दिन स्थगित

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे : लातूर जिल्ह्यात दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन स्थगित करण्यात आला आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्र विधान परिषदेच्या उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक-२०२६ ची आदर्श आचारसंहिता लागू आहे. या आचारसंहितेच्या अंमलबजावणीमुळे आगामी सोमवार, १ जून २०२६ रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित केला जाणार नाही, अशी माहिती लातूरचे प्रभारी उपजिल्हाधिकारी (सामान्य) गणेश पवार यांनी दिली आहे.

## गुणवत्तेचा लातूर पॅटर्न बावन्नकशी सोनेच राहणार
## आ. अमित देशमुख यांची फेसबुक पोस्ट

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे : नुकत्याच झालेल्या नीट परीक्षेचा पेपर फुटला, त्याचे धागेदोरे लातूरपर्यंत आले आहेत. यातील संशयितांची सीबीआय चौकशी करीत आहे. ते दोषी आढळले तर न्यायालयाने त्यांना कठोर शिक्षा द्यावी. परंतु, त्यांच्या आडून गुणवत्तेच्या लातूर पॅटर्नला बदनाम करण्याचे सुरू असलेले षढयंत्र थांबणे गरजेचे आहे. लातूरची गुणवत्ता ही बावनकशी सोनेच आहे, हे पुन्हा एकदा सिध्द होईल. सोशल मीडियात सत्ताधारी मंडळींकडून शिळ्या कढीला ऊत आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. अशा संवेदनशील प्रकरणात राजकारण करणाऱ्या सत्ताधाऱ्यांची कीव येते, अशी फेसबुक पोस्ट माजीमंत्री आ. अमित देशमुख यांनी व्हायरल केली. सोमवारी (दि.२५) दिवसभर त्या पोस्टवर वेगवेगळ्या अंगाने चर्चा सुरू होती.

आपल्या फेसबुक पोस्टमध्ये आ. देशमुख यांनी म्हटले आहे, मागील चार दशकांपासून लातूरच्या गुणवंतांनी पॅटर्न निर्माण केला आहे. या गुणवत्तेवर यापूर्वीही अनेकदा संशय व्यक्त करण्यात आला होता. परंतु, पुन्हा लातूरकरांनी गुणवत्ता सिध्द करून हा पॅटर्न अबाधित ठेवला आहे. नुकत्याच झालेल्या नीट परीक्षेत पेपरफुटीचे धागेदोरे लातूरपर्यंत आले आहेत. त्यात एका प्राध्यापकासह एका शिकवणी चालकावर गुन्हा दाखल आहे. हे प्रकरण आता न्यायालयात गेले आहे. परंतु, जुने व्हिडीओ काढून माझा आणि आरोपीचा सबंध असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न काही पक्षांच्या कार्यकर्त्यांकडून होत आहे.

अशा संवेदनशील प्रकरणात राजकारण करणाऱ्या त्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची कीव आल्याशिवाय राहत नाही. नीट प्रकरणात दोषी आढळणाऱ्या सर्व आरोपींना न्यायालय कठोर शिक्षा देणारच आहे. परंतु, विरोधकांकडून होणारे राजकारण योग्य नाही, असे आ. देशमुख यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

### उदगीरात उद्या ह.भ.प. सायली कुलकर्णी यांचे नारदीय किर्तन

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २६ मे : वंदे मातरम् गीत शतकोत्तर सुवर्ण महोत्सव, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी वर्ष व स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १४३ व्या जयंतीचे औचित्य साधून दि. २८ मे रोजी आयोजित ह. भ. प. सायली उमाकांत कुलकर्णी हिच्या नारदीया कीर्तनातून स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या विचाराचा जागर घातला जाणार आहे.

गुरुवार दि. २८ मे २०२६ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता शुभंकर फॅक्शन हॉल येथे 'स्वातंत्र्यवीर सावरकर : धगधगते यज्ञकुंड' (नारदीय कीर्तन ) होणार आहे. यावेळी संस्कार भारतीच्या देवगिरी प्रांत अध्यक्षा प्रा. स्नेहलताई पाठक यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कार भारती उदगीर शाखेचे अध्यक्ष सतीश उस्तुरे हे राहणार आहेत.

या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन संस्कार भारती समिती , शाखा उदगीरच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

### प्राथमिक शाळांना पाच दिवसांचा आठवडा करावा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे :राज्यातील प्राथमिक शाळांना पाच दिवसांचा आठवडा लागू करावा, अशी मागणी शिक्षक संघटनांकडून होत आहे. प्रशासकीय कामकाजाचा पाच दिवसांचा आठवडा केला. परंतु, शाळा, महाविद्यालयांना कामकाजाचे सहा दिवस ठेवले आहेत. केंद्र सरकारच्या विविध विभागांना पूर्वीपासूनच पाच दिवसांचा आठवडा लागू आहे. प्राथमिक शाळांनाही प्रशासकीय कार्यालयाप्रमाणे पाच दिवसांचा आठवडा करावा, अशी मागणी जोर धरत आहे.

विविध शिक्षणतज्ज्ञ, बालमानसशास्त्रज्ञ, मानसोपचारतज्ज्ञांनी विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमातील बोजा आणि पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना सुचवल्या आहेत. सततच्या अभ्यासाचा ताण आणि दप्तराच्या ओझ्याने मुलांचे बालपण कोमेजून जात आहे.

शिक्षणातील वाढत्या स्पधात्माक राणावाने अनेक विद्यार्थी टोकाचे पाऊल उचलत आहेत. अनेक पालकांना शनिवार, रविवार सुट्टी असते. शिक्षकांवर शाळेच्या नियमित अध्यापनाबरोबरच बीएलओ, जनगणना, विविध ऑनलाईन कामे आणि इतर शासकीय कामे सोपवली गावातही बहुतांश कामे शाळेच्या वेळेनंतर तसेच शनिवार, रविचारी करावी लागतांत, नवीन मतदार नोंदणी कैम्प, मतदान वाद्यांची कामे व विविध प्रशिक्षणे शनिवार-रविवार आयोजिली जातात. शनिवारी विद्यार्थ्यांना अर्धा दिवस सुट्टी असते, या अध्यों दिवसाऐवजी पूर्ण सुट्टी मिळाल्यास शिक्षक व. विद्यार्थी दोघांच्याही शारीरिक, मानसिक आरोग्यासाठी उत्तम ठरेल. बालकांचे बालपण हरवणार नाही. अभ्यासाचा ताण कमी होईल आणि पालकांसोबतचे कौटुंबिक संबंध सुधारतील, अशी शिक्षकांची भूमिका आहे.

# बेलकुंड उपसा सिंचनासह जलसंपदा विभागाच्या कामांना गती

## आ. अभिमन्यू पवारांच्या पाठपुराव्याला अखेर यश

तभा वृत्तसेवा

औसा दि. २६ मे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार मुख्यमंत्री कार्यालयाचे खाजगी सचिव विद्याधर महाले यांनी मुंबई येथे जलसंपदा विभागाच्या स्थानिक प्रश्नांसंदर्भात सोमवार दि. २५ रोजी महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेतली. या बैठकीत लातूर व धाराशिव जिल्ह्यातील अनेक प्रलंबित विकासकामांवर सकारात्मक चर्चा होऊन संबंधित विभागांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आमदार अभिमन्यू पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे बेलकुंड उपसा सिंचन व जलसंपदा विभागातील विकासकामांना गती मिळणार आहे.



या बैठकीतील सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे निम्न तेरणा प्रकल्प, माकणी येथून औसा तालुक्यातील बेलकुंड येथे प्रस्तावित उपसा सिंचन योजनेस तत्वतः मान्यता देण्यात आली आहे. या योजनेसाठी आवश्यक संकल्पना व नकाशे तातडीने तयार करून प्रकल्पाचा प्रशासकीय मान्यता प्रस्ताव ३० जून २०२६ पर्यंत शासनाकडे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.या योजनेमुळे बेलकुंडसह परिसरातील तब्बल १५ ते १६ गावांना थेट लाभ मिळणार आहे. तर अनेक वर्षांपासून पाण्याच्या समस्येला तोंड देणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. या योजनेमुळे शेकडो हेक्टर जमीन ओलिताखाली येऊन परिसरात जलक्रांती घडणार असून या भागातील शेतकरी, मजूर व व्यवसायिकांना नवी दिशा मिळणार आहे.

मांजरा नदीवरील नागझरी बॅरेजस्थळी ५० टक्के विश्र्वासार्हतेने पाणी उपलब्धतेचा प्रस्ताव शासनाकडे यापूर्वीच सादर करण्यात आला आहे. या योजनेस त्वरित तत्वतः मान्यता देऊन पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या. या निर्णयामुळे मांजरा नदी परिसरातील पाणी तावरजा प्रकल्पात उपलब्ध करून देण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.तावरजा नदीवरील सेलू को.प. बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रुपांतर करण्याच्या योजनेस त्वरित प्रशासकीय मान्यता देण्याचे निर्देशही देण्यात आले. या कामामुळे परिसरातील जलसाठा क्षमता वाढून शेतीसाठी आवश्यक पाण्याची उपलब्धता अधिक मजबूत होणार आहे.

औसा तालुक्यातील याकतपूर येथील जलसंपदा विभागाची वसाहत तालुका क्रीडा अधिकारी कार्यालयाकडे हस्तांतरित करण्यात आली आहे.त्या ठिकाणी आधुनिक क्रीडा संकुल उभारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील युवकांना क्रीडा सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.याचबरोबर लातूर जिल्ह्यातील जलसंपदा विभागाची सर्व विभागीय कार्यालये लाभक्षेत्र विकास प्राधिकरण लातूर या कार्यालयाशी जोडण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ, गतिमान आणि समन्वयपूर्ण होण्यास मदत होणार आहे.

निम्न तेरणा प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे जवळपास १ टीएमसी पाणीसाठा कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे. हा साठा पुनर्स्थापित करण्यासाठी प्रकल्पातील गाळ काढण्याची कार्यवाही तातडीने हाती घेण्याच्या सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.

बेलकुंड उपसा सिंचन योजनेच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेमध्ये किल्लारी, एकोंडी, किल्लारी राजेगाव, कोकळगाव आदी भागांतील पाण्यात गेलेल्या रस्ते व पुलांच्या कामांचाही समावेश करण्याबाबत सकारात्मक निर्देश देण्यात आले. त्यामुळे स्थानिक नागरिकांच्या दळणवळणाच्या समस्याही मार्गी लागणार आहे.महाराष्ट्रातील सर्व कालव्यांलगतचे रस्ते 'शेतरस्ता' म्हणून विकसित करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली असून त्यासंदर्भात पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या वाहतुकीच्या सुविधा अधिक सक्षम होणार आहेत.

मराठवाडा, विशेषतः लातूर जिल्ह्यातील जलसंपदा प्रकल्पांना गती देण्यासाठी विशेष कार्यकारी कक्ष स्थापन करण्याचाही निर्णय बैठकीत घेण्यात आला. संबंधित प्रकल्प जलदगतीने पूर्ण करण्यासाठी विशेष बैठका घेऊन कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. स्थानिक जनतेच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या प्रश्र्नांवर मुख्यमंत्री कार्यालयाने सकारात्मक भूमिका घेतल्यामुळे लातूर, औसा आणि परिसरातील विकासकामांना आता निश्र्चितच वेग मिळणार असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

## श्रीगुरु हावगीस्वामी मठ येथे रुद्र संस्कार शिबिराची सांगता



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २६ मे : श्रीगुरु हावगीस्वामी मठ संस्थान व आद्य गुरु रेणुकाचार्य जंगम संस्कार प्रतिष्ठान यांच्या वतीने श्रीगुरु हावगीस्वामी मठ येथे ०१ मे पासुन सुरु असलेल्या संपूर्ण पुजा विधी व रुद्र संस्कार शिबीराचा समारोप गुरुवार दि. ३१ मे २०२६ रोजी श्रीगुरु हावगीस्वामी मठाचे मठाधिश डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांच्या हस्ते जंगम बाल शिबीरार्थीना शिवदिक्षा देवून शिबीराची सांगता झाली. वीरशैव लिंगायत समाज बरोबरच संपूर्ण हिंदू समाजात पुजा विधी व रुद्र संस्कार पुढील पिढीला अवगत व्हावे. पुजा विधी करण्यासाठी योग्य व अभ्यासु जंगम उपलब्ध व्हावा या उद्देशाने डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांच्या संकल्पनेतुन व प्रेरणेने जंगम समाजातील मुलांना जंगम समाजाच्या संस्काराची व

आपल्या धर्म संस्कृतीची जाणीव व्हावी यासाठी रुद्र संस्कार शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात ला तूर मराठवाडयासह आंध्र, कर्नाटक, तेलंगणा ८४ सिमाभागातील मुलांनी या रुद्र संस्कार शिबीरात सहभाग नोंदविला. शिबीरातील विद्यार्थ्यांना अजय शास्त्री महराज व विरभद्र महार- ाज यांनी श्रीगणेश पुजा, गंगा पुजा, पंचाचार्य पुजा, इष्टलिंग पुजा, रुद्र पुजा, नवगृह पुजा, पंचांगणाची प्राथमिक माहिती, जन्मनाव, राशी, नक्षत्र इत्यादी माहिती जनन शांती, वास्तु शांती, विवाह संस्कार विधी, वर्धा शंकर व सत्यनारायण पुजा विधी शिवपाठ, साखरपुडा, देवकार्य, गुगळ विधी, गादी पुजा, मंगल अष्टीका विविध देव देवतांच्या आरत्या रुद्र पुजा इत्यदी या शिबीरात देण्यात शिक्षण आले. शिबीरात या सहभागी झालेल्या जंगम समाजातील ८४ विद्यार्थ्यांना महाराजांच्या न प्रमाणपत्राचे वाटप हस्ते शिवदिक्षा देव-करण्यात आले. यावेळी सकल जंगम समाजाचे अध्यक्ष विजयकुमार स्वामी, शांतवीर स्वामी बटनपुरकर, मल्लिकार्जुन स्वामी चांदेगावकर, नागेश स्वामी जवळगेकर, डॉ. शिवराज स्वामी, विरभद्र महाराज सताळकर, सिद्राम स्वामी, शिवसांब स्वामी, अजय शास्त्री इत्यादी उपस्थित होते. शिबीर यशस्वी करण्यासाठी जंगम समाज बांधवाने विशेष परिश्रम घेतले.

## पीक विम्यासाठी रमेश पाटील यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

तभा वृत्तसेवा




चाकूर दि. २६ मे : तालुक्यातील शेतकऱ्यांना २०२५-२०२६ खरीप हंगामातील पिकांच्या नुकसानीबाबत मिळणारा पीक विमा भरपाई अद्याप मिळालेला नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याबाबत भाजप युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष रमेश पाटील यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन प्रलंबित पीक विमा दावे तात्काळ निकाली काढण्याची मागणी रमेश पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एका निवेदनाद्वारे केली आहे.

लातूर जिल्ह्यात सोयाबीन, कापूस व तूर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून संबंधित पंचनामे व पीक कापणी प्रयोग पूर्ण झाले आहेत. जिल्ह्यात सुमारे ७०० पीक कापणी प्रयोग झाले असून जवळपास ५० तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत. तरी देखील विमा कंपन्यांकडून विविध तांत्रिक कारणे पुढे करून शेतकऱ्यांचे दावे प्रलंबित ठेवले जात आहेत.तसेच लातूर जिल्ह्यातील सर्व प्रलंबित पीक विमा दावे तात्काळ निकाली काढावेत, विमा कंपन्यांना कठोर निर्देश द्यावेत, प्रकरणे निश्र्चित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी विशेष यंत्रणा कार्यान्वित करावी व अपील प्रक्रियेमुळे होणारा विलंब टाळण्यासाठी शासनस्तरावर तातडीने निर्णय घ्यावा,अशी मागणी रमेश पाटील यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## आ. अमित देशमुख यांची परमपूज्य राष्ट्रसंत मोरारी बापूंच्या रामकथेस उपस्थिती

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळातील काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सोमवार, दि. २५ मे २०२६ रोजी औसा तालुक्यातील किल्लारी येथील निळकंठेश्र्वर शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या प्रांगणात आयोजित परमपूज्य राष्ट्रसंत श्री. मोरारी बापू यांच्या रामकथेस उपस्थिती दर्शवली.



ईश्र्वरप्रसाद डागा आणि ओमप्रकाश डागा यांनी आयोजित केलेल्या या रामकथेचा आमदार अमित देशमुख यांनी सुमधूर वाणीतून लाभ घेतला. त्यानंतर त्यांनी प्रभू श्रीरामाची आरती केली आणि महाप्रसादाचा लाभ घेतला.

यावेळी माजी आमदार वैजनाथ शिंदे, शैलेश पाटील चाकूरकर, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, ईश्र्वरप्रसाद डागा, ओमप्रकाश डागा, 'ट्वेंटीवन शुगर्स'चे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, हुकूमचंद कलंत्री, राजेंद्र मालपाणी, चंद्रकांत बलदवा, किल्लारीचे जिल्हा परिषद सदस्य सुभाष पवार, औसा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण बाबळसुरे, बालाप्रसाद बिदादा, संतोष तोष्णीवाल, राजेश्र्वर बुके, बळवंत पाटील, ड. बाबासाहेब गायकवाड, हमीद शेख, डॉ. अरविंद भातांबरे, प्रकाश मिरगे, वागंबर कांबळे, चक्रधर शेळके यांच्यासह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने श्रीराम भक्त उपस्थित होते.

## किरण बापूरे यांच्या 'दिलकश रुबाईयां' काव्यसंग्रहाचे प्रकाशन'

तभा वृत्तसेवा



उदगीर दि. २६ मे : येथील बिदर गेट परिसरातील हॉटेल आनंद येथे कवी हावगीराव उर्फ किरण बापूरे लिखित 'दिलकश रुबाईयां' या हिंदी काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. आनंदी मॉर्निंग ग्रुप आणि जयवंतराव पाटील ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सोहळ्यास साहित्य, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी गट शिक्षण अधिकारी के. आर. शिंदे होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे माजी विस्तार शिक्षण संचालक डॉ. अनिल भिकाने, ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक शंकर बोईनवाड, जमहूर ज्युनियर कॉलेजचे प्रा. महेमूद अली जहागिरदार तसेच आनंदी गुड मॉर्निंग ग्रुपचे अध्यक्ष शरद कुलकर्णी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कवी किरण बापूरे यांचा काव्यसंग्रह प्रकाशित झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. तसेच ज्येष्ठ कला शिक्षक, पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते श्रीधर दिगंबर जाधव यांना राज्य आदर्श महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२६ जाहीर झाल्याबद्दल गौरविण्यात आले. बारावी परीक्षेत ९८ टक्के गुण आणि जेईई परीक्षेत ९९.५ टक्के गुण मिळवणाऱ्या विद्यार्थी अलोक अनिल मालू याचाही विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रा. महेमूद अली जहागिरदार यांनी 'दिलकश रुबाईयां' या काव्यसंग्रहावर अभ्यासपूर्ण व मार्मिक समीक्षा सादर केली. कवी किरण बापूरे यांनी आपल्या रुबायांमधून मानवी भावना, प्रेम, सामाजिक वास्तव आणि समकालीन विषयांचे प्रभावी चित्रण केल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रमुख पाहुणे डॉ. अनिल भिकाने यांनी कवी किरण यांच्या साहित्यिक कार्याचे कौतुक करताना, त्यांचे लेखन समाजाला विचारप्रवृत्त करणारे असून नशिबापेक्षा कर्तृत्वावर विश्र्वास ठेवण्याचा आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश देणारे आहे, असे प्रतिपादन केले.

कवी किरण बापूरे यांनी मनोगतातून या काव्यसंग्रहाच्या निर्मितीमागील भावविश्र्व आणि साहित्यप्रवास उलगडून सांगितला. त्यांनी सर्व आयोजक, साहित्यप्रेमी आणि उपस्थितांचे आभार मानले. यावेळी श्रीधर जाधव व माधवराव फावडे यांनीही मनोगत व्यक्त केले. शरद कुलकर्णी यांनी प्रेमात डोळस माणूसही आंधळा होतो, अशी मिश्किल टिप्पणी करत उपस्थितांची दाद मिळवली.

अध्यक्षीय समारोपात के. आर. शिंदे यांनी 'दिलकश रुबाईयां' हा उत्कृष्ट काव्यसंग्रह असून साहित्यप्रेमींनी तो आवर्जून वाचावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव मुरलीधर जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन रमेश कोरे यांनी मानले.

या सोहळ्यास अनिल पत्तेवार, मिर्झा वहीदली, झुंगा स्वामी, राम विलास नावंदर, अमृतराव पाटील, माणिकराव शिंदे, विश्र्वनाथराव बिरादार, विश्र्वनाथराव मुडपे, रमाकांत बनशेळकीकर, प्राचार्य विजयकुमार पाटील, बाबुराव माशाळकर, प्रा रमाकांत मध्वरे, दीपक बलसुरकर, लहूदास याचावाड, हकिमसाहेब , व्यंकटराव बिरादार, विष्णू लोया, रमेश गोरे, शेषराव इंगोले, प्रकाश बिरादार, रंगराव मोरे , बंडू बेद्रे, अब्दुल हकिम, गणपतराव नकाते यांचे सह जयवंतराव पाटील मित्र मंडळ,आनंदी गुड मॉर्निंग ग्रुप, जिव्हाळा ग्रुप, अंधश्रद्धा निर्मूलन समिती तसेच विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, साहित्यिक, पत्रकार, वाचक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत नेटकेपणाने करण्यात आले.

## संत गाडगेबाबा पूर्णाकृती पुतळ्याचे रखडलेले काम तात्काळ चालू करा



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २६ मे : शहरातील राष्ट्रीय संत कर्मयोगी गाडगेबाबा महाराज चौक येथे उभारण्यात येत असलेल्या पूर्णाकृती पुतळ्याचे काम मागील पाच ते सहा महिन्यांपासून रखडल्याने शहरातील समाज बांधवांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्र्वभूमीवर प्रहार जनशक्ती पक्षाचे उपजिल्हा प्रमुख तेलंगे विनोद व संत गाडगेबाबा सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अमोल गाजरे यांनी उदगीर नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन काम तात्काळ सुरू करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संत गाडगेबाबा महाराज हे स्वच्छता, समाजप्रबोधन आणि मानवसेवेचे प्रतीक असून त्यांच्या विचारांचा आदर्श समाजासमोर कायम राहावा या उद्देशाने चौकात पूर्णाकृती पुतळ्याचे काम सुरू करण्यात आले होते. चौथऱ्याचे बहुतांश काम पूर्ण झाले असताना अचानकपणे पुढील काम बंद करण्यात आल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

सदर काम तात्काळ सुरू करून लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच येत्या चार दिवसांत काम सुरू न झाल्यास सर्व समाज बांधव व गाडगेबाबा महाराजांच्या अनुयायांच्या वतीने लोकशाही मार्गाने आमरण उपोषण आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

या निवेदनावर समाज बांधव तथा प्रहार उपजिल्हा प्रमुख तेलंगे विनोद, संत गाडगेबाबा सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अमोल गाजरे, गजेंद्र पिपळे, सामाजिक कार्यकर्ते बालाजी तेलंगे, प्रशांत शिंदे, संतोष गाजरे, विजय तेलंगे, बालाजी भालेराव, माधव गाजरे, नागराळकर रामराव यांच्यासह अनेक समाज बांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# परळीत नपा च्या हलगर्जीपणामुळे दिवसाढवळ्या स्ट्रीट लाईटचा झगमगाट

## विजेचा अपव्यय; संतप्त नागरिकांकडून प्रशासनाला सवाल

**परळी वैजनाथ |** परळी नगरपालिकेचा अजब आणि ढिसाळ कारभार पुन्हा एकदा नागरिकांसमोर आला असून दिवसाढवळ्या सूर्याच्या लख्ख प्रकाशात शहरातील स्ट्रीट लाईट सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. चांदापूर रोडलगतच्या हनुमान नगर परिसरातील रस्त्यावरील कोनीकॉल खांबांवरील स्ट्रीट लाईट दिवसा सुरू असल्यामुळे विजेचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.



एकीकडे राज्यात वाढते वीज संकट, तर दुसरीकडे नागरिकांना वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याचा त्रास सहन करावा लागत असताना देखील अशा परिस्थितीत नगरपालिकेकडून विजेच्या वापराबाबत आवश्यक ती दक्षता घेतली जात नसल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. भर उन्हाळ्यात तीव्र उकाडा आणि वाढत्या तापमानामुळे नागरिक हैराण झाले असताना दिवसाढवळ्या स्ट्रीट लाईट सुरू ठेवणे म्हणजे प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा कळस असल्याचे अनुभवयास येत आहे.

यापूर्वीही शहरातील अनेक भागांमध्ये अशा प्रकारे स्ट्रीट लाईट दिवसा सुरू असल्याचे वारंवार दिसून येते. संबंधित विभागाकडून योग्य नियोजन, नियमित तपासणी आणि देखभाल केली जात नसल्यामुळे अशा घटना घडत आहेत. त्यामुळे नगरपालिकेच्या कामकाजावर एक प्रकारे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, विजेचा अपव्यय रोखण्यासाठी नगरपालिकेने तत्काळ उपाययोजना कराव्यात, संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांनी स्ट्रीट लाईट व्यवस्थेवर नियंत्रण ठेवावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. तसेच या अक्षम्य निष्काळजीपणाकडे नगरपालिका पदाधिकारी, आणि प्रशासनातील जबाबदार अधिकारी लक्ष देणार का, असा सवालही नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.

### लग्नानंतर अवघ्या 12 दिवसांत दुर्दैवी घटना : तलाठ्याची आत्महत्या

अंबाजोगाई : अंबाजोगाई शहरालगतच्या मोरेवाडी परिसरात एका नवविवाहित तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना सोमवारी दुपारी उघडकीस आली. गणेश दत्तू कोळी (मूळ रा. नांदुर्गा, ता. औसा) असे मृत तरुणाचे नाव असून ते चंद्रपूर महसूल विभागात तलाठी म्हणून कार्यरत होते. त्यांच्या आत्महत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

माहितीनुसार, गणेश कोळी यांचा विवाह 13 मे 2026 रोजी बीड येथील दिपाली यांच्याशी झाला होता. दिपाली या अंबाजोगाई येथील अपर पोलीस अधीक्षक कार्यालयातील फॉरेन्सिक विभागात कंत्राटी स्वरूपात कार्यरत आहेत. विवाहानंतर हे दाम्पत्य मोरेवाडी परिसरात भाड्याच्या घरात वास्तव्यास होते.

सोमवारी दुपारी पत्नी कामानिमित्त बाहेर गेल्यानंतर गणेश यांनी राहत्या खोलीत गळफास घेतल्याचे समोर आले. घटना लक्षात आल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. स्थानिक नागरिकांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्याची प्रक्रिया सुरू असून मंगळवारी शवविच्छेदनानंतर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. आत्महत्येमागील कारणांचा पोलीस तपास सुरू आहे.

# २०१७ मधील बीड जि.प.सदस्यांना मतदानाचा अधिकार द्या-अशोक लोढा

## अन्यथा निवडणूक स्थगीत करा !

बीड (प्रतिनिधि): राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार संघातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणुका घोषित झाल्या आहेत.या निवडणुकीत पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महानगरपालिकां मधील निवडून आलेले सदस्य मतदार म्हणून सहभागी होतात. यामधून विधान परिषदेचे सदस्य निवडले जातात. परंतु न्यायालयीन प्रक्रियेमुळे बीड जिल्हा परिषदेची निवडणूक न झाल्याने बीड ग्रामीण जिल्ह्याचे प्रतिनिधित्व अबाधित राखण्यासाठी २०१७ मधील जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती यांना मतदानाचा हक्क बजावण्याची संधी द्यावी, अन्यथा धाराशिव- बीड लातूर- निवडणुक स्थगित करण्यात यावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे जिल्हा परिषद सदस्य तथा शहर अध्यक्ष अशोक लोढा यांनी केली आहे.

महाराष्ट्रात द्विगृह विधानमंडळ व्यवस्था असुन विधान परिषद हे राज्य विधिमंडळाचे उच्च सभागृह आहे.स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणूक ही राज्याच्या लोकशाही व्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया मानली जाते.मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मुंबई विभागातील अनेक महत्त्वाच्या मतदारसंघांचा समावेश आहे. मराठवाड्यातील धाराशिव- बीड- लातूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ राजकीय दृष्ट्या महत्त्वाची मानली जाते. बीड मध्ये नगरपालिकेच्या निवडणुका झाल्या परंतु जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुका होऊ शकल्या नाही. धाराशिव- बीड- लातूर मतदार संघाची मतदार यादी संविधानिक दृष्ट्या अपूर्ण आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागाचे प्रतिनिधित्व नाकारले जाणार आहे.

भारतीय राज्यघटनेने मतदानाचा मूलभूत अधिकार व्यापक दृष्टिकोनातून दिलेला आहे. बीड मतदार संघाचा अविभाज्य भाग असेल आणि या मतदारसंघातील जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य संविधानिक दृष्ट्या मूळ मतदार असतील तर त्यांना मतदानाचा अधिकार दिलाच गेला पाहिजे. अन्यथा घटना आणि कायद्याची पायमल्ली होऊ शकते. मूळ मतदारांना हक्क बजावण्यासाठी २०१७ मधील जिल्हा परिषद सदस्य,पंचायत समिती सभापती यांना मतदानाचा अधिकार द्यावा किंवा धाराशिव-बीड-लातूर मतदार संघाची निवडणूक स्थगित करावी. शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन बीड जिल्ह्याला न्याय द्यावा अशी आग्रहाची मागणी अशोक लोढा यांनी केली आहे.

# श्री.योगेश्वरी मंदिरात 'ज्ञानप्रसादालय' ग्रंथालयाचे उद्घाटन

## रोटरी क्लब व श्री.योगेश्वरी देवल कमिटी यांचा उपक्रम

अंबाजोगाई : "बुके नको, पुस्तक द्या" या अभिनव संकल्पनेतून अंबाजोगाईत साकारलेल्या 'ज्ञानप्रसादालय' या ग्रंथालयाचे उद्धाटन शनिवारी श्री योगेश्वरी मंदिर परिसरात मोठ्या उत्साहात संपन्न झाले.



अंबाजोगाई पुस्तकांचं गावं या उपक्रमात सहभाग नोंदवत रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व श्री. योगेश्वरी देवल कमेटी यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरीचे प्रांतपाल सुधीर लातुरे होते.तर उद्धाटक म्हणून देवल कमिटीचे सचिव गिरधारीलालजी भराडिया, रोटरीचे उपप्रांतपाल प्रवीण देशपांडे, प्रांतसचिव डॉ. राजगोपाल तापडिया,

देवल कमिटीचे विश्वस्त कमलाकर चौसाळकर,उल्हास पांडे, हंसराज देशमुख, प्रवीण दामा, पूजा कुलकर्णी,गौरी जोशी, रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा.रोहिणी पाठक,सचिव मंजुषा जोशी, प्रकल्प प्रमुख अविनाश मुडेगावकर, सहप्रकल्प प्रमुख धनराज सोळंकी,सौ. संगीता लातुरे, शर्मिष्ठा देशपांडे, मंचावर उपस्थित होते.

यावेळी बोलताना गिरधारीलाल भराडिया म्हणाले की मंदिरात येणाऱ्या भक्तांसाठी महाप्रसाद व ज्ञानप्रसाद या दोन्ही गोष्टी मिळणार आहेत. हे ग्रंथालय सुसज्ज व अत्याधुनिक करून भक्तांना इथे अंबाजोगाईच्या इतरही पर्यटन स्थळांची माहिती देण्यात येणार आहे.

आपल्या अध्यक्षीय समारोपात बोलताना सुधीर लातुरे म्हणाले की वाचन संस्कृती टिकली तरच खऱ्या अर्थाने प्रगतीची दिशा साध्य होईल. हा मंदिरात सुरू झालेला उपक्रम प्रेरणादाई असल्याचे ते म्हणाले. यावेळी प्रवीण देशपांडे, प्रा. रोहिणी पाठक,यांनी मनोगत व्यक्त केले.

दीपप्रज्वलन व फित कापून 'ज्ञानप्रसादालय' या ग्रंथालयाचे उद्धाटन झाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकल्प प्रमुख अविनाश मुडेगावकर यांनी केले. संचलन सुरेखा काळे, शिल्पा सेलुकर यांनी तर उपस्थितांचे आभार धनराज सोळंकी यांनी मानले. या कार्यक्रमास महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**बुकेऐवजी पुस्तकांच्या भेटीतून साकारले ज्ञानप्रसादालय:**

पत्रकार अविनाश मुडेगावकर यांच्या वाढदिवसानिमित्त व रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या पुढाकाराने वाढदिवसा निमित्त बुके नको बुक द्या. या राबवलेल्या उपक्रमातून १ हजार पुस्तके जमा झाली होती. या ग्रंथसंपदेचे रूपांतर आता ज्ञानप्रसादालयात झाले आहे.

# शरीर सुदृढ असेल तरच राष्ट्र सक्षम बनते : प्रा. बाबासाहेब देशमुख

## हनुमान व्यायाम शाळेच्या संस्कार शिबिराचा उत्साहात समारोप

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) : "शरीर सुदृढ असेल तरच राष्ट्र सक्षम बनते. अशा शिबिरांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास आणि राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण होते," असे प्रतिपादन श्री वैजनाथ देवस्थान ट्रस्टचे सचिव प्रा. बाबासाहेब देशमुख यांनी केले. ते श्री. हनुमान व्यायाम शाळेच्या उन्हाळी व्यायाम व संस्कार शिबिराच्या समारोप समारंभात बोलत होते.

हनुमान व्यायाम शाळा व वैद्यनाथ बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचा समारोप रविवारी उत्साहात संपन्न झाला. महिनाभर चाललेल्या या शिबिरात शहरातील विद्यार्थी, युवक व युवतींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकासासाठी योगासन, प्राणायाम, सूर्यनमस्कार, मल्लखांब, कुस्ती, कराटे, बॉक्सिंग, जलतरण, लेझीम, मार्चपास, तलवारबाजी आदी विविध प्रकारांचे मोफत प्रशिक्षण देण्यात आले. समारंभास प्रसिद्ध शल्य चिकित्सक डॉ. हरिश्चंद्र वंगे, वैद्यनाथ बँकेचे उपाध्यक्ष रमेश कराड, विजयकुमार मेनकुदळे, उमाताई समशेट्टे, अभयकुमार ठक्कर, राजाभैया पांडे, डॉ. अंकुश जबदे, डॉ. रवींद्र ईटके यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. दत्ताप्पा ईटके गुरुजी यांनी युवकांनी मोबाईल आणि आभासी दुनियेपेक्षा व्यायाम व संस्कारांना प्राधान्य देण्याचे आवाहन केले. यावेळी शिबिरात उत्कृष्ट सहभाग नोंदविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. जिमनॅस्टिकमध्ये सुवर्णपदक मिळविणाऱ्या सान्वी सौंदळे हिचा विशेष गौरव करण्यात आला. "अशा शिबिरांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व शिस्त निर्माण होते," असे सान्वीने सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी हनुमान प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन प्रा. बाबासाहेब देशमुख यांच्या हस्ते तर ध्वजारोहण रमेश कराड यांच्या हस्ते करण्यात आले. विदेह संगीतालयाच्या कलाकारांनी स्वागतगीत सादर केले. तसेच ४० शिक्षक व २० महिला प्रशिक्षकांचा गौरव करण्यात आला.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी दत्तात्रय ईटके (गुरुजी), वैजनाथ ईटके, सुभाष नानेकर, त्र्यंबक काटकर, अमर देशमुख, विलास आरगडे, प्र. अतुल दुबे, सुरेश टाक यांच्यासह सर्व प्रशिक्षक व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आर्या मॅडम व अरगडे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन सुरेश टाक यांनी केले. समारोप कार्यक्रमास पालक, विद्यार्थी आणि नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

# आदित्य कृषी महाविद्यालयात २६० विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन

## बँकिंग परीक्षांची भीती सोडा, यशाचे मार्ग सोपे होतील : सिद्धेश्वर कोगे

**बीड |** शहरातील आदित्य कृषी महाविद्यालयात 'बँकिंग क्षेत्रातील करिअर संधी आणि कृषी पदव्युत्तर शिक्षणाचे महत्त्व' या विषयावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी विद्यार्थांना मार्गदर्शन करताना 'अल्फा कोचिंग' (छत्रपती संभाजीनगर) चे संचालक व बँक ऑफ इंडियाचे माजी सहाय्यक व्यवस्थापक सिद्धेश्वर कोगे म्हणाले विद्यार्थांनो बँकिंग परीक्षांची भीती सोडा, यशाचे मार्ग सोपे होतील. त्यांनी बँकिंग क्षेत्रातील विविध पदे, स्पर्धा परीक्षांची रचना आणि तयारीची रणनीती यावर सविस्तर प्रकाश टाकला. यावेळी २६० विद्यार्थी उपस्थित होते.

आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यक्तिमत्व विकासासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवले जातात. संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली हा शैक्षणिक आलेख उंचावत आहे. याचाच भाग म्हणून, स्पर्धा परीक्षांची अचूक रणनीती हा विद्यार्थांसाठी विशेष कार्यक्रम राबवण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून 'अल्फा कोचिंग' (छत्रपती संभाजीनगर) चे संचालक व बँक ऑफ इंडियाचे माजी सहाय्यक व्यवस्थापक सिद्धेश्वर कोगे (एम.एस्सी. ॲग्री इकॉनॉमिक्स) आणि मॅनेजर संजीत कदम उपस्थित होते. कोगे यांनी विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी सर्वप्रथम मनातील अभ्यासाची, विशेषतः गणित व इंग्रजी विषयांची भीती काढून टाकणे आवश्यक आहे. ही भीती नष्ट झाल्यास यश मिळवणे कसे सोपे होते, हे त्यांनी विविध उदाहरणांसह स्पष्ट केले. त्यांनी थेट विद्यार्थ्यांशी संवाद साधत गणिताचे प्रश्न सोडवून घेतले आणि त्यांचा आत्मविश्वास वाढवला. विद्यार्थ्यांनी बँकिंगसह कृषी क्षेत्रातील इतर स्पर्धा परीक्षांनाही प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा यांनी मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयात विद्यार्थ्यांना कशा पद्धतीने स्पर्धात्मक वातावरणात घडवले जाते, याचा आढावा घेतला. भविष्यातही येथील विद्यार्थी विविध उच्च पदांवर चमकतील असा विश्वास व्यक्त करत त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या शिबिराला सहाव्या व आठव्या सत्रातील तब्बल २६० विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना बँकिंग आणि कृषी क्षेत्रातील उच्च शिक्षणाच्या संधींची स्पष्ट दिशा मिळाली.

# सिरसाळ्यात पूज्य भन्ते व भिक्खू संघाच्या उपस्थितीत धम्मक्रांतीचा उत्साह; धनंजय मुंडे यांच्या हस्ते भव्य बुद्ध विहाराचे लोकार्पण

परळी (प्रतिनिधी):

परळी तालुक्यातील सिरसाळा येथे रविवार, २४ मे २०२६ रोजी एक ऐतिहासिक सुवर्णक्षण साजरा झाला. चक्रवर्ती सम्राट अशोक बुद्ध विहारामध्ये तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या बुद्धरूपाचे अनावरण आणि विहाराच्या देखण्या इमारतीचा लोकार्पण सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. पूज्य भंते आणि भिख्खू संघाच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्याने संपूर्ण परिसर धम्ममय झाला होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भंते डॉ. धम्मदीप महाथेरो (अध्यक्ष, भीम जन्मभूमी, महू) आणि भंते प्रज्ञापिओ (बोधगया) यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे व पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर सिरसाळा गावातील प्रमुख मार्गांवरून भगवान बुद्धांच्या मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. "बुद्धं शरणं गच्छामि"च्या जयघोषाने वातावरण भारून गेले होते. मिरवणुकीनंतर भंतेजींसह सुमनबाई अश्रुबा किरवले व मनीषा महादेव किरवले यांच्या हस्ते बुद्धरूपाचे अनावरण करण्यात आले.

दुसऱ्या सत्रात भिक्खू संघाने गाथा पठण करून मूर्तीचे विधिवत अनावरण केले. यावेळी भिक्खुणी आर्याजी रूपनंदा यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, श्रीलंकेप्रमाणेच येथेही बुद्धपूजेला श्रद्धा आणि शिस्तीचे महत्त्व असावे. सिरसाळा येथील विहार हे केवळ इमारत नसून ते संस्कार केंद्र बनावे, जिथे धम्म स्कूल आणि भिक्खू निवास सुरू व्हावा.

भंते डॉ. धम्मदीप महाथेरो यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या "गाव तिथे




बुद्ध विहार आणि ग्रंथालय" या स्वप्नाचा उल्लेख करत सिरसाळ्यातील कार्याचे कौतुक केले. तर भंते प्रज्ञापिओ यांनी "शील हाच खरा अलंकार आहे" असे सांगत, मानवी कल्याणासाठी धम्माचे आचरण करण्याचे आवाहन केले.

तिसऱ्या सत्रात परळीचे आमदार तथा माजी सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते विहाराच्या आकर्षक इमारतीचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी स्मार्ट सिटीचे आयुक्त रवींद्र जोगदंड, प्रशांत बलवाड (स्वीय सहाय्यक, राज्यपाल राजस्थान), उमेश सोनवणे (उपआयुक्त), प्रभाकर वंजारे (सेवानिवृत्त डेप्युटी कमिशनर), सिद्धार्थ धनंजकर (तहसीलदार), सुमित बनसोडे (आकाशवाणी) यांसह ॲड. दिलीप उजगरे, बालाजी गायकवाड, समाधान किरवले,तानाजी व्हावळे, भगवान साकसमुद्रे, मिलिंद चोपडे , गणेश गावंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी रामदादा किरवले व अच्युत बप्पा किरवले यांचा त्यांच्या सामाजिक योगदानाबद्दल सपत्नीक सत्कार करण्यात आला. तसेच मुंबईचे उपजिल्हाधिकारी महादेव किरवले यांनी बुद्धमूर्ती दानस्वरूपात देऊन समाजासमोर एक आदर्श ठेवला. कार्यक्रमाची सांगता प्रसिद्ध भीमशाहीर आनंद शिंदे यांच्या पहाडी आवाजातील भीमगीतांनी झाली. हा भव्य सोहळा यशस्वी करण्यासाठी सम्राट अशोक बौद्ध विहार समिती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती व यशोधरा महिला मंडळाच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# सौर ऊर्जा योजनेत राज्यात बीड जिल्हा प्रथम ; बीड जिल्ह्यात गेवराई प्रथम

## अनिल बोर्डे व शाम मोरे यांच्या अथग प्रयत्नांना यश

गेवराई ( प्रतिनिधी) महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वकांक्षी सौर ऊर्जा योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून बीड जिल्हाने संपूर्ण राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच बीड जिल्ह्यात गेवराई तालुका यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यामुळे शेतकरी ग्राहका मध्ये आनंदाचे वातावरण आहे. या मध्ये बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष अनिल बोर्डे आणि योजनेचे गेवराईचे समन्वयक श्याम मोरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे यश प्राप्त झाले आहे.

बीड जिल्ह्यातून ५५ ६१८ अर्ज दाखल झाले असून सर्वच अर्ज निकाली निघाले आहेत. गेवराई तालुक्यातील चालू महिन्यात १०३ अर्ज राहिले आहेत. त्यामुळे गेवराई तालुका बीड जिल्हात प्रथम आला आहे. जिल्ह्यात चालू महिन्यात सध्या फक्त ५०३ अर्ज शिल्लक आहेत. गेल्या महिन्यात ३२४ ०५ सौर ऊर्जा पंप बसविण्यात आले आहेत. या यशाबद्दल संपूर्ण जिल्ह्यातून कौतुक होत आहे. बीड जिल्ह्याला सौर ऊर्जा लाभ मिळण्यासाठी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन, मुख्य अभियंता, महासंचालक महाऊर्जा पुणे, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उप कार्यकारी अभियंता गेवराई यांच्याकडे वारंवार दिनांक ९ /१/२०२४ पासून जिल्ह्याला सौर ऊर्जा योजनेचा जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्यासाठी अनिल बोर्डे यांनी विविध प्रशासकीय पातळीवर तीव्र संघर्ष केला आहे. केवळ पत्रव्यवहार न थांबता त्यांनी प्रत्यक्ष भेटी घेऊन वेळोवेळी अधिकाऱ्यासोबत सविस्तर चर्चा केल्या व सौर ऊर्जाचा पूर्ण अभ्यास केला. आणि जिल्ह्यातील शेतकरी ग्राहकाची गरज महाराष्ट्र शासन व प्रशासनासमोर वेळोवेळी मांडली. प्रशासन विषय मार्गी लावण्यात कमी पडत असल्यामुळे बोर्डे यांनी थेट मुख्यमंत्री राज्याचे ऊर्जामंत्री यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. बीड जिल्हाला उत्पन्न स्त्रोत कमी असल्यामुळे बीड जिल्ह्यासाठी विशेष निधी आणि मंजुरी मिळवून घेण्यासाठी त्यांनी शासनावर दवाब गट निर्माण केला. त्यांच्या या अथांग प्रयत्नामुळेच बीड जिल्हा ला योजनेत अग्रस्थान मिळवून देण्यात यश आले. या ऐतिहासिक यशाच्या पार्श्वभूमीवर गेवराई तालुक्यात सौर ऊर्जा योजनेचे श्याम मोरे यांनी एक विशेष पत्रकार परिषद घेतली. यावेळी बोलताना मोरे यांनी अत्यंत आनंद व्यक्त केला आणि "आमच्या सामूहिक प्रयत्नांना अखेर मोठे यश आले आहे " असे संबोधित केले गेवराई तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यातून ५५६१८ अर्ज प्राप्त झाले आहेत. हा आकडा इतर जिल्ह्याच्या तुलनेतून सर्वाधिक आहे. एवढ्या मोठ्या संख्येने अर्ज येणे हे जिल्ह्यात झालेल्या जनजागृतीचे आणि लोकांच्या बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र पदाधिकारी विश्वासाचे प्रतिक आहे. असे त्यांनी नमूद केले. बीड जिल्हा ने सौर ऊर्जा सारख्या पर्यावरण पूरक आणि शाश्वत विकास योजनेत मिळवलेल्या या प्रथम क्रमांका मुळे जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या कामगिरी बद्दल अनिल बोर्डे, श्याम मोरे, प्रा. भानुदास फलके ग्राहक पंचायत चे सर्व पदाधिकारी, यांचे सर्व स्तरावरून भरभरून कौतुक होत आहे. या योजनेमुळे जिल्ह्यातील हजारो शेतकरी ग्राहकांना उन्हाळ्यात हक्काची आणि दिवसा वीज मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. याप्रकरणी जिल्ह्यातील सर्व मा.संपादक व प्रतिनिधी यांनी वेळोवेळी बातमी प्रसिद्ध करून ग्राहक पंचायत कार्यात मोलाचे सहकार्य केले आहे. या यशात त्यांचा देखील सहभाग आहे.

# पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते मुंबईत 'वृक्षारोपण मोहिम' ; अभिनेत्री शिल्पा शेट्टीही उपस्थित

## हरित व प्रदूषणमुक्त मुंबईसाठी वृक्षारोपण मोहिमा महत्वाच्या

मुंबई : डी. वाय. पाटील इंटरनॅशनल स्कूल, वरळी आणि भामला फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आज 'वृक्षारोपण मोहिमेचे' आयोजन करण्यात आले. या उपक्रमात राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजाताई मुंडे यांनी सहभागी होत विद्यार्थ्यांसोबत वृक्षारोपण केले.

या मोहिमेप्रसंगी जलसंपदा मंत्री जयकुमार रावल, मुंबईच्या महापौर रितू तावडे, प्रसिद्ध सिने अभिनेत्री शिल्पा शेट्टी, भामला फाउंडेशनचे अध्यक्ष असिफ भामला, सेहर भामला, शाळेचे प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व मोठ्या संख्येने पर्यावरणप्रेमी उपस्थित होते.



वृक्षारोपणानंतर बोलताना मंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या, "वाढत्या शहरीकरणात आपल्या शहराला हिरवेगार आणि प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी अशा मोहिमा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. एक झाड म्हणजे हजारो लोकांना ऑक्सिजन. डी. वाय. पाटील स्कूल आणि भामला फाउंडेशनने घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद असल्याचे त्या म्हणाल्या.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## निराधार व श्रावणबाळ लाभार्थ्यांसाठी ऑनलाइन हयात प्रमाणपत्र सुविधा

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२६ मे -**
राज्यातील संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांना आता 'बेनिफिशियरी सत्यापन ॲप' (बीएसए) द्वारे ऑनलाइन हयात प्रमाणपत्र सादर करता येणार आहे.

केंद्राच्या धर्तीवर राज्य शासनाने या सुविधेला मान्यता दिल्याने वृद्ध, विधवा व दिव्यांग लाभार्थ्यांना तहसील, बँक किंवा पोस्ट कार्यालयात जाण्याची गरज उरणार नाही.

लाभार्थ्यांनी मोबाईलमध्ये "Beneficiary Satyapan pp' आणि "adhar Face RD' ॲप डाउनलोड करून आधार व मोबाईल क्रमांकाद्वारे नोंदणी करायची आहे. त्यानंतर संबंधित योजना निवडून चेहरा ओळख किंवा बायोमेट्रिक पडताळणीद्वारे डिजिटल हयात प्रमाणपत्र मिळवता येणार आहे.

या निर्णयामुळे लाभार्थ्यांचा वेळ व आर्थिक खर्च वाचणार असून प्रशासनाने जिल्हा व तालुका स्तरावर मास्टर ट्रेनर्स नियुक्त करण्याचे निर्देश दिले आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### अभिषेक पूजेसह आहिल्यादेवी होळकर जयंती उत्सवाचा प्रारंभ

**धाराशिव, दि.२६ मे -**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त चोराखळी येथील तीर्थक्षेत्र पापनाश मंदिरात अभिषेक महापूजा करून जयंती उत्सवाला प्रारंभ करण्यात आला. अहिल्या सखी मंच धाराशिवच्या वतीने आयोजित कार्यक्रमात भाविकांना प्रसाद म्हणून फळांचे वाटप करण्यात आले. यावेळी अध्यक्षा डॉ. शैलजा कुलकर्णी, उपाध्यक्षा ॲड. जयश्री तेरकर, सचिव उषा लांडगे, कोषाध्यक्ष प्रमिला बावकर यांच्यासह अर्चना मैंदाड, लक्ष्मी देवकते, सुप्रिया दूधभाते, रेखा जेवळीकर, शीलादेवी काकडे, भागीरथी शिंपले आदी उपस्थित होत्या. अहिल्या सखी मंचच्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक करत चोराखळी ग्रामस्थांनी उपस्थित महिलांचा सन्मान केला. यावेळी मल्हारी नवले यांनी पापनाश मंदिर व अहिल्यादेवींच्या आजोळाबाबत माहिती दिली.



### श्रीकांत कदम यांची निवड

**तुळजापूर, दि.२६ मे -**
नागरिकांच्या आरोग्यविषयक प्रश्नांवर जनजागृती करून तालुकास्तरावरील आरोग्य सेवा सक्षम करण्याच्या उद्देशाने स्थापन होणाऱ्या तालुका आरोग्य संपन्न कृतीदल समितीत तुळजापूर तालुक्यासाठी पत्रकार श्रीकांत कदम यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल लोकमंगल समूहाच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ व पेढा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सचिन आडगळे, विनोद देवकर, रविंद्र इंगळे, राहुल साळवे, आशुतोष लबडे, मधुकर शेळके व ज्ञानेश्वर गवळी उपस्थित होते.

### मकरंद कदम यांचे निधन

**तुळजापूर, दि.२६ मे -**
तुळजापूर येथील शुक्रवार पेठ, सिद्धार्थ नगर परिसरातील रहिवासी तथा तुळजापूर आगाराचे वाहक



मकरंद विजयराव कदम (वय ४७) यांचे मंगळवारी (दि.२६) हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. राहत्या घरी त्रास जाणवल्यानंतर कुटुंबीयांनी त्यांना तातडीने उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, दोन बहिणी, भाऊ व भावजय असा परिवार आहे. आपसिंगा रोड येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मकरंद कदम हे तुळजापूर आगार कास्ट्राईब संघटनेचे संघटन सचिव म्हणून कार्यरत होते.

### स्व. विलासराव देशमुख यांना काँग्रेसकडून अभिवादन

**धाराशिव, दि.२६ मे -**
देशाचे माजी केंद्रीय मंत्री तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री लोकनेते स्व. विलासराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने काँग्रेस भवन येथे अभिवादन करण्यात आले. अखिल भारतीय काँग्रेस पार्टीचे नूतन जिल्हाध्यक्ष उमेश राजेनिंबाळकर यांच्या हस्ते स्व. देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमास राजेंद्र शेरखाने, खलील सय्यद, अग्निवेश शिंदे, मिलिंद गोवर्धन, सरफराज काझी, धनंजय राऊत, प्रभाकर लोंढे, भारत काटे, वसंत मडके, अंकुश पेठे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

## इंधन दरवाढीविरोधात काँग्रेस सेवादल आक्रमक

### तुळजापुरात तहसील कार्यालयावर निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ मे -**
केंद्र सरकारकडून पेट्रोल, डिझेल आणि सीएनजीच्या दरात करण्यात आलेल्या वाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांसह शेतकरी वर्ग आर्थिक संकटात सापडल्याचा आरोप करत काँग्रेस सेवादल तुळजापूर तालुका कमिटीच्या शिष्टमंडळाने नायब तहसीलदार प्रियांका कारंडे-काळे यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर केले.




इंधन दरवाढीमुळे वाहतूक खर्चात मोठी वाढ झाली असून खरीप हंगामाच्या पूर्वतयारीत गुंतलेल्या शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

शेती मशागतीपासून ते बाजारपेठेतील दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीपर्यंत दरवाढीचा परिणाम जाणवत असल्याने केंद्र शासनाने तातडीने ही दरवाढ मागे घ्यावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

यावेळी विलास शाळू, शिवाजी गायकवाड, तानाजी जाधव, सत्तार मुलानी, रमेश बनसोडे, संजय गुंजुटे, सय्यद मुशताक, फरिद शेख, नारायण जाधव, इस्माईल हारुण, विकास मोरे, गोविंद डोंगरे, रसिक महामूद वाले, रावसाहेब भगवान शेंडे, प्रा. मोहनराव सिद्धराम चमू, बाबासाहेब नामू इंगळे, मोईश सय्यद शेखापूरकर यांच्यासह तालुक्यातील शेतकरी व काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

## मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेतून पशुपालनाला चालना

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२६ मे -**
पशुसंवर्धन विभागामार्फत मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना राबविण्यात येत असून ग्रामीण भागात पशुपालनाला व्यावसायिक स्वरूप देण्याचा शासनाचा उद्देश आहे. या योजनेंतर्गत दुग्ध व्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन तसेच वैरण विकास प्रकल्पांना अनुदान दिले जाणार आहे.



पूर्वी योजनांसाठी जमीन आवश्यक होती, मात्र आता ती अट शिथिल करण्यात आली आहे. नव्या योजनेत १७ योजना एकत्र करण्यात आल्या असून महिला व दिव्यांग लाभार्थींना आरक्षण देण्यात आले आहे. सर्वसाधारण प्रवर्गासाठी ५० टक्के तर अनुसूचित जाती-जमातींसाठी ७५ टक्के अनुदान मिळणार आहे.

योजनेत १० दुभत्या गाई-म्हशी, १०० शेळ्या व ५ बोकड, ४० शेळ्या व २ बोकड, तसेच १ हजार मांसल पक्ष्यांचे कुक्कुटपालन प्रकल्प उभारता येणार आहेत. प्रकल्पासाठी १० ते २५ टक्के रक्कम लाभार्थ्यांना भरावी लागणार असून उर्वरित निधी शासन अनुदान व बँक कर्जातून उपलब्ध होणार आहे.

## संस्कार भारतीमुळे देशात सांस्कृतिक वातावरण निर्माण होईल : मुख्यमंत्री प्रमोद सावंत

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ मे -**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या संस्कार भारतीच्या कार्यामुळे भारतीय संस्कृतीच्या माध्यमातून देशात उत्तम सांस्कृतिक वातावरण निर्माण होईल, असे प्रतिपादन गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी केले.

गोव्यातील फोंडा येथील नागेशी देवस्थान परिसरात २२ ते २४ मे २०२६ दरम्यान संस्कार भारतीच्या अखिल भारतीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र, गुजरात व गोवा येथील १२५ कलासाधक प्रतिनिधी या शिबिरात सहभागी झाले होते. यावेळी देवगिरी प्रांत निर्मित 'वंदे मातरम् १५० वर्ष व राष्ट्रीय संघ शताब्दी वर्ष' विषयावरील दैनंदिनी मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांना प्रांत महामंत्री डॉ. जगदीश देशमुख, सह महामंत्री डॉ. सतीश महामुनी व दृश्य कला संयोजक शेषनाथ वाघ यांच्या हस्ते भेट देण्यात आली. शिबिरात संस्कार भारतीची संघटनात्मक रचना, कला विभाग, हिंदुत्व व भारतीय कला दृष्टी, कार्यकर्त्यांची निवड, वित्तीय व्यवस्थापन तसेच भविष्यातील कार्यदिशा यावर विविध सत्रांत मार्गदर्शन करण्यात आले. ज्येष्ठ पत्रकार अरुण करमरकर, अखिल भारतीय महामंत्री अश्विन दळवी, अभिजीत गोखले, देवेंद्र रावत, आशुतोष अडोणी आदींनी विविध विषयांवर विचार मांडले.

या शिबिरात धाराशिव जिल्ह्यातून डॉ. सतीश महामुनी, शेषनाथ वाघ, पद्माकर मोकाशे, मार्तंड कुलकर्णी, सुनिता घाटे, गीता रावतोळे व प्रमोद वझे यांचा सहभाग होता.

## अधिक मासात तुळजाभवानी दर्शनासाठी भाविकांची गर्दी

### तुळजापूर नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ मे -**
श्री तुळजाभवानी मंदिर येथे अधिक मास, दुर्गाष्टमी तसेच शनिवार-रविवारच्या सलग सुट्ट्यांच्या पार्श्वभूमवर भाविकांची प्रचंड गर्दी उसळल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. राज्यासह परराज्यातील हजारो देवीभक्तांनी आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी तुळजापूरकडे धाव घेतल्याने संपूर्ण तुळजाई नगरी भक्तिमय वातावरणाने भारावून गेली आहे.

मंदिर परिसर, दर्शन रांगा, प्रमुख रस्ते तसेच शहरातील बाजारपेठा भाविकांनी फुलून गेल्या असून, जय भवानी... जय तुळजाभवानी...च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला आहे. अधिक मासातील दुर्गाष्टमीला विशेष धार्मिक महत्त्व असल्याने अनेक कुटुंबांनी आपल्या कुलदेवतेचा कुलधर्म आणि कुलाचार मोठ्या भक्तिभावाने पार पाडला. महिला भक्तांनी अनारसे, बतासे, दिवे, पुरणाचे धोंडे यांसारखे पारंपरिक नैवेद्य अर्पण करून देवीची मनोभावे पूजा केली.

अधिक मासात देवीचे दर्शन घेतल्यास विशेष पुण्य प्राप्त होते, अशी श्रद्धा असल्याने यंदा भाविकांचा ओढा मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येत आहे. अधिक मास सुरू झाल्यापासून दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येत असून, विशेषतः मंगळवार, शुक्रवार, शनिवार आणि रविवार या दिवशी गर्दीचा उच्चांक होत आहे.

वाढत्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर मंदिर प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि स्वयंसेवकांकडून भाविकांच्या सोयीसाठी विशेष नियोजन करण्यात येत आहे.

दर्शन रांगा सुरळीत ठेवणे, सुरक्षा व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि वाहतूक नियंत्रण यासाठी प्रशासनाकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. भाविकांनीही संयम आणि शिस्त राखत दर्शन घेतल्याचे समाधानकारक चित्र दिसून आले.

वाढती गर्दी लक्षात घेता प्रशासनाने रेफरल पास सेवा तात्पुरती बंद केली असून, सध्या २०० रुपये आणि ५०० रुपयांचे दर्शन पास सुरू ठेवण्यात आले आहेत. तरीही सर्वसामान्य भाविक मोठ्या श्रद्धेने तासन्तास रांगेत उभे राहून आई तुळजाभवानीचे दर्शन घेत आहेत.



अधिक मास संपेपर्यंत तुळजापूरमध्ये भाविकांचा ओघ कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी आलेल्या भक्तांमुळे संपूर्ण तुळजापूर नगरी पुन्हा एकदा भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाने उजळून निघाली आहे.

## पीक विमा अर्जांना दिलासा; ४१०२ अपात्र अर्जांची पुन्हा छाननी सुरू



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ मे -**
प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०२५ अंतर्गत विमा भरलेल्या अनेक शेतकऱ्यांचे अर्ज किरकोळ त्रुटींमुळे विमा कंपनीमार्फत अपात्र ठरविण्यात आले होते.

मात्र जिल्हा प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतला असून, जिल्हास्तरीय समन्वय समितीच्या बैठकीत संबंधित विमा कंपनीला अपात्र अर्जांची पुनश्च छाननी करण्याचे निर्देश देण्यात आले होते. या निर्णयानंतर केंद्र शासनस्तरावरून तब्बल ४१०२ अर्ज त्रुटी पूर्ततेसाठी परत प्राप्त झाले आहेत. संबंधित शेतकऱ्यांची यादी तालुकास्तरावर तसेच आपले सरकार सेवा केंद्र आणि महा ई-सेवा केंद्रांकडे उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांना आता पीक विमा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याची सकारात्मक भावना व्यक्त होत आहे. प्राप्त अर्जांमध्ये आधार क्रमांकातील तफावत, बँक खात्याची अपूर्ण माहिती, सातबारा उताऱ्यावरील विसंगती, पीक पेरणी तपशीलातील चुका तसेच आवश्यक कागदपत्रांची अपूर्णता आढळून आली आहे. प्रशासनाने संबंधित शेतकऱ्यांना तातडीने आवश्यक कागदपत्रांसह सेवा केंद्रात जाऊन त्रुटींची पूर्तता करण्याचे आवाहन केले आहे. त्रुटी दुरुस्त करताना आधारकार्ड, बँक पासबुक, सातबारा उतारा, पेरणी स्वयंघोषणापत्र आणि इतर आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत, असे स्पष्ट करण्यात आले आहे. वेळेत पूर्तता न झाल्यास अर्ज प्रलंबित राहण्याची किंवा विमा मंजुरीस विलंब होण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे. जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी सर्व संबंधित शेतकऱ्यांनी तातडीने आवश्यक कार्यवाही पूर्ण करून प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ वेळेत मिळवावा, असे आवाहन केले आहे.

तसेच अधिक माहितीसाठी सहायक कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी किंवा संबंधित विमा कंपनी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, धाराशिव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार

### धाराशिवच्या अविनाश गडदेला अटक...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ मे -**
टिंडर पवर ओळख झालेल्या तरुणीला लग्नाचे खोटे आमिष दाखवून तब्बल सहा वर्षे शारीरिक व मानसिक अत्याचार केल्याप्रकरणी धाराशिव शहरातील अविनाश पाश्वनाथ गडदे याला पोलिसांनी अटक केली आहे. पीडित ३२ वर्षीय तरुणी सोलापूर येथे शासकीय सेवेत कार्यरत आहे.



आरोपीने आपण घटस्फोटित असल्याचे खोटे सांगून तरुणीचा विश्वास संपादन केला. लग्नाचे आश्वासन देत तिच्याशी वारंवार शारीरिक संबंध ठेवले. या काळात पीडितेला दोन वेळा गर्भवती झाल्यानंतर गर्भपात करण्यास भाग पाडल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.


तसेच आरोपीने आत्महत्येच्या धमक्या, बदनामीची भीती, मारहाण व ब्लॅकमेलिंग करत पुणे, मुंबई, सोलापूर येथील हॉटेल व लॉजमध्ये जबरदस्तीने संबंध ठेवल्याचेही तक्रारीत नमूद आहे. नंतर आरोपी विवाहित असून त्याचा घटस्फोट झालेला नसल्याचे समोर आल्यानंतर पीडितेने पोलिसांत धाव घेतली.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी अविनाश गडदे याला अटक केली आहे.

## १४ वर्षांपासून रखडलेल्या महामार्गाचा बोजवारा; अणदूर उड्डाणपूल उद्घाटनापूर्वीच पाडण्याची नामुष्की

- विकासाला गतिरोध
- टोल वसुली जोमात
- रस्ते मात्र कोमात
- अधिकारी गुत्तेदार यांचे साटेलोटे







**श्रीकांत अणदूरकर**
**अणदूर, दि.२६ मे -**
सोलापूर ते उमरगा राष्ट्रीय महामार्गावरील अणदूर बसस्थानकासमोरील उड्डाणपूलाचे काम निकृष्ट व दर्जाहीन झाल्याने उद्घाटनापूर्वीच तो पाडण्याची वेळ महामार्ग प्रशासनावर आल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. तब्बल १४ वर्षांपासून रखडलेल्या या महामार्गाच्या कामामुळे या हायवेला वाली आहे की नाही? असा टोकदार सवाल जनतेतून उपस्थित केला जात आहे.

सोलापूर-उमरगा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ हा प्रशासकीय अनास्था आणि कंत्राटदारांच्या मनमानीमुळे अडगळीत पडल्याचे चित्र दिसत आहे. मुदत संपूनही रस्ता आणि उड्डाणपूलांची कामे अपूर्णच असून, विकासाला गतिरोध निर्माण झाला आहे.

टोलवसुली मात्र जोमात सुरू असताना रस्ते आणि पुलांची कामे कोमात असल्याची तीव्र भावना वाहनधारकांतून व्यक्त होत आहे. गेल्या काही वर्षांत या महामार्गावर २०० हून अधिक भीषण अपघात झाले असून सुमारे १५० निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागल्याचे सांगितले जात आहे. तरीही रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून अनेक ठिकाणी रस्ते खचले आहेत, छोटे पूल रखडले आहेत आणि सर्व्हिस रोडची कामे अर्धवट अवस्थेत आहेत. परिणामी वाहनधारकांना रोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

अणदूर, आष्टा मोड, येणेगूर मोड, डाळिंब आणि उमरगा चौक परिसरातील उड्डाणपूलांची कामे अत्यंत संथ गतीने सुरू असून अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाचे बांधकाम झाल्याचा आरोप होत आहे.

अणदूर येथील उड्डाणपुलाच्या तटभिंतीला भेगा पडल्या असून सुरक्षा कठडे बाहेरील बाजूस झुकल्याने कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूंनी माती, खडी आणि डांबर टाकून रस्ता तयार करण्यात आला असला तरी सर्वत्र खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे वाहनधारकांना अक्षरशः नाक दाबून प्रवास करावा लागत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

कनिष्ठ व सहाय्यक अभियंत्यांच्या देखरेखीखाली ही कामे होत असतानाही दर्जाहीन काम कसे झाले, याबाबत नागरिकांकडून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

दरम्यान, अणदूर मुख्य रस्त्यावर पावसाळ्यात पाण्याचा निचरा होण्यासाठी कोणतीही सक्षम व्यवस्था नसल्याने महामार्गावर पाणी साचून चिवरी पाटील, मधुशाली नगर आणि शिक्षक कॉलनी परिसरात तळ्याचे स्वरूप निर्माण होत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. याकडे लोकप्रतिनिधी आणि संबंधित कंत्राटदार दुर्लक्ष करत असल्याचीही भावना व्यक्त केली जात आहे.

### पावसाळ्यापूर्वी गटारीचे काम पूर्ण करण्याची मागणी

चिवरी पाटी ते अणदूर स्टँडदरम्यान सर्व्हिस रोडचे काम अद्याप रखडले असून नाल्याचे कामही सुरू झालेले नाही. गतवर्षी पावसाळ्यात शिक्षक कॉलनी, मधुशाली नगर आणि चिवरी पाटी परिसरातील घरांमध्ये गुडघाभर पाणी शिरले होते. यंदाही तीच परिस्थिती निर्माण होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. अनेक बैठका आणि पाहण्या होऊनही कामाला सुरुवात न झाल्याने स्थानिकांमध्ये नाराजी आहे. बसस्टँड ते गुरु कबाडे यांच्या घरापर्यंतची गटार तातडीने पूर्ण करावी, अन्यथा ऐन पावसाळ्यात नागरिकांना मोठा फटका बसू शकतो, असा इशारा शिक्षक कॉलनी परिसरातील नागरिकांनी दिला आहे.